नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

**कॅलेंडर २०२५**
आजच्या अंकासोबत नूतन वर्ष २०२५ चे आकर्षक कॅलेंडर देण्यात येत आहे. आपल्या वितरकांकडून कॅलेंडर प्राप्त करून घ्यावे.
त्यामुळे अंकाची मुळ किंमत
३ रु + ५ रु (कॅलेंडर) = एकूण ८ रु असे राहील.
व्यवस्थापक

* वर्ष ५४ * अंक २७६ * * नागपूर * शुक्रवार, दिनांक ३ जानेवारी २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रु + ५ रु (कॅलेंडर) = एकूण ८ रु

अग्राग्रलेख
खरीखरी..

## एनडीएच्या जाळ्यात इंडिया

सध्या देशात एनडीए आणि इंडिया या दोन आघाड्या कार्यरत आहेत. यापैकी एनडीए केंद्र सरकारमध्ये मजबुतीने विराजमान आहे. अनेक राज्यात डबल इंजिनचे सरकार आहे. त्यात काही ठिकाणी भारतीय जनता पार्टी दुय्यम स्थितीत असली तरी त्यांचे महत्त्व नाकारता येणार नाही. तिकडे इंडिया आघाडी जी कालपर्यंत भक्कम वाटत होती. त्यात अरविंद केजरीवाल यांचा आप, ममता बॅनर्जी यांच्या तृणमूलचा ताप आणि उत्तर प्रदेशच्या अखिलेशचा प्रताप काय काय करू शकतो, याचा विचार केल्याशिवाय काही पर्याय उरलेला नाही. इंडिया आघाडीतील या तीन पक्षांनी समजा जर काँग्रेसशी पंगा घेणे ठरवले. तर भारतीय जनता पक्षाचे निशाण दुमदुमून उंच फडकेल यात शंका नाही. भारतीय जनता पक्षाला कोणे एकेकाळी उत्तर प्रदेशात मायावतीच्या बहुजन समाजवादी पार्टीचा चांगलाच आसरा होता. आता बसपा घसरत घसरत एवढी घसरली आहे की. त्यांच्या मतदारांचा आकडा 40% ही उरलेला नाही. आजच्या घडीला इंडियातील हे तीन प्रमुख पक्ष शिवाय शरद पवार आणि इतर काही सत्ताधारी अदानीचे चरण चुंबन करीत आहेत. बांगला देशला होणारा अदानीच्या विजेचा पुरवठा पश्चिम बंगाल मधून जातो. इतरही अनेक आमिषे ममता बाईंसमोर अदानी यांनी ठेवली असावीत. पुढच्या महिन्यात होणाऱ्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत आम आदमी पक्षाला जिंकायचे असेल. तर आता दिल्लीतही चांगलाच मजबूत झालेला काँग्रेस पक्ष पूर्वीसारखा उरलेला नाही. तिकडे उत्तर प्रदेशात अखिलेशचे काका रामगोपाल यादव यांनी काँग्रेसशी पंगा घेण्याचे ठरवलेले दिसते आहे आणि इतर दोन-तीन लहान पक्ष अशा सर्वांच्या खासदारांची संख्या जवळजवळ 110 आहे. इंडिया आघाडीतील 238 खासदारांपैकी हे 110 खासदार काढल्यावर काँग्रेसचे शंभर आणि तामिळनाडूचे स्टालिन, झारखंड मुक्ती मोर्चा अशासारख्या पक्षांच्या खासदारांची संख्या मिळून जवळपास 128 होते. केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने म्हटल्याप्रमाणे इंडिया आघाडीतून काँग्रेस पक्षाला बाद केले. तर या आघाडीची बरबादी निश्चित आहे. आता या प्रकारची वक्तव्ये काँग्रेस आणि आप दिल्लीमध्ये करत आहेत. आपचे दिल्लीतील नेते आणि काँग्रेसचेही दिल्लीतील नेते परस्परांना लाथा मारण्यात दंग आहेत. या दोघांच्या लढाईत भारतीय जनता पक्षाचे फावणार असे दिसते आहे. एकूणच आता सध्याच्या सत्ताधारी केंद्र सरकारला इंडिया आघाडीत फूट पाडणे अत्यावश्यक आहे. यासाठी अदानी नावाचा जो सांड सध्या मोकाट सुटलेला आहे. तो कधी कोणाला गोंजारेल, कधी कुणाला लालूच देईल. कधी कुणाची काडी करेल म्हणजेच कधी काय होईल, हे कुणालाही सांगता यायचे नाही. आजच्या घडीला काँग्रेस जवळ मुस्लिम मतांचा मोठा कोटा आहे. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत उत्तर प्रदेशातील मुसलमान नेत्यांनी अखिलेश यादवला काँग्रेसशी पंगा घेऊ नका, असे स्पष्ट सुनावले होते. याशिवाय दलित समाजातील मोठा वर्ग काँग्रेस सोबत आहे. हे सर्व मिळून 30 ते 32 टक्के मतदार होतात. याशिवाय काँग्रेसची परंपरागत मते आणि इंडिया आघाडीतील पक्षांची मते यांची बेरीज केली. तर एनडीएची वजाबाकी निश्चित आहे. पण आपल्या सारख्यांनी हे मनाचे मांडे कितीही खाल्ले. तरी आपल्या देशातील विरोधी पक्षात जन्मात कधीच एकोपा राहिलेला नाही. यापूर्वी याचा फायदा काँग्रेसने उचलला, आता भारतीय जनता पक्षाला त्याचा भरघोस लाभ मिळत आहे. आताच्या घडीला भारतीय जनता पक्षाने आपली आर्थिक समृद्धी प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढवलेली आहे. देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात पंचतारांकित कार्यालय, तसेच तालुक्यासह छोट्या छोट्या गावांमध्येही भारतीय जनता पक्षाने अत्यंत हुशारीने आपला झेंडा रोवलेला दिसतो. भाजपला काही जागा कमी असल्या तरी नाराज होऊन इंडिया आघाडीतील कोणत्याही पक्षाला बाहेर पडता येणार नाही, अशी स्थिती आहे. एकूणच अदानीच्या जाळ्यात इंडियातील घटक पक्षांचे किती नेते आणि त्यांचे पक्ष सापडतात. याचा शोध घेतला तर आज 'अदानीशाही' आपल्या लोकशाहीच्या रक्षणासाठी अक्षरशा जीवाचे रान करणार आहे. तिकडे निवडणूक आयोगाचा आशीर्वाद आणि गरीब जनतेला केंद्र आणि राज्य सरकारकडून भरभरून मिळणारी मदत याचा फायदा एनडीएला मिळणारच आहे. अशा सर्व गुंतागुंतीच्या प्रयोगात आज तरी एनडीएचे पारडे जड दिसते. त्यात शहा सारख्या हरहुन्नरी चाणक्य, मोदींसारखा वक्ता दशसहस्त्रेषु यांच्या तुफान भडिमारापुढे हे बिचारे इंडिया वाले तगूनतगून किती तग धरतील, हे आपल्याला बघायचे आहे. म्हणूनच तुम्हीही बघा आम्ही बघू. बाकी नियतीच्या मनात काय आहे, हे कोणाला ठाऊक असेल, असे आम्हाला वाटत नाही. म्हणूनच, तुम्हारी भी जयजय, हमारी भी जयजय!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## आता मुंबई बँकेत होणार सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनानंतर मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक मुंबईमध्ये पार पडली. बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली होती. या हत्येवरून राज्य सरकारवर सर्व पक्षीय आमदारांकडूनच टीका होत आहे. यावर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत वैयक्तिक खाते उघडण्यास मंत्रिमंडळाने मंजूरी प्रदान केली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 च्या कलम-220 मध्ये आकारी पड जमिनीच्या संदर्भात असलेल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला . तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीस प्राधिकृत करण्यास मंजुरी देण्यात आली .

राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकार ४ हजार ८४९ एकर जमिनी शेतकऱ्यांना परत करणार आहे, याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घोषणा केली आहे. सरकारच्या या निर्णयाचा राज्यातील ९६३ शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.



**महिलांच्या मनोधैर्य योजनेची व्याप्ती वाढवली**

बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यातील महिलांसाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या मनोधैर्य योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. त्यानुसार बाधितांना १० लाखांची मदत दिली जाणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय महिला व बालविकास विभागाने जारी केले आहे.

बलात्कार, बालकांवरील लैगिंक अत्याचार, ॲसिड हल्ला, पोलीस धाडीत सुटका केलेल्या १८ वर्षांखालील पिडीत मुला-मुलींसाठी मनोधैर्य योजना राबवली जाते. त्यांचे पुनर्वसन आणि अर्थसहाय्य करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण मानली जाते. शासनाने मनोधैर्य योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. रसायनयुक्त पदार्थामुळे बळी पडलेल्या महिला किंवा बालकांचा मृत्यू झाल्यास योजनेचा लाभ मिळण्याची तरतूद नव्हती. सुधारित मनोधैर्य योजनेत मात्र या घटनांचा समावेश करण्यात आला आहे. बाधितांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

- मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय
- मनोधैर्य योजनेची व्याप्ती वाढवली
- शेतकऱ्यांना मोठा दिलासा
- मस्साजोगवर चर्चा

उपमुख्यमंत्री अजित पवार हे परदेशात असल्याने ते या बैठकीला उपस्थित नव्हते. मात्र त्यांच्याच पक्षाचे मंत्री धनंजय मुंडे हे या बैठकीला उपस्थित होते.

**दत्ता भरणे यांची अनुपस्थिती**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री दत्ता भरणे यांना क्रीडा विभागाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. मात्र या मंत्रीपदावर दत्ता भरणे हे नाराज असल्याची चर्चा आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीला दत्ता भरणे उपस्थित नव्हते.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वच मंत्र्यांच्या विभागाचा आढावा घेतला. फडणवीस सरकार शंभर दिवसांचा कार्यक्रम जाहीर करण्याची तयारी करत आहे. त्याच अनुषंगाने सर्व विभागाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला.

## तीन महिन्यात सरकार पडणार!

### आ. उत्तम जानकर यांचा दावा

■ वृत्तसंस्था
पंढरपूर, दि. २ :



तीन महिन्यात राज्यातले सरकार पडणार आहे, त्याचे पुरावे मी सादर केल्यावर देश गडबडून जाईल. सरकार शंभर टक्के जाणार आणि पुन्हा निवडणुका घ्यावा लागणार, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी केला आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. पंढरपूर येथे ते पत्रकारांशी संवाद साधताना बोलत होते.

आमदार उत्तम जानकर म्हणाले, ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा नसेल तर माळशिरस विधानसभा आणि बारामती विधानसभा मतदारसंघात बॅलेट पेपरवर पुन्हा निवडणुका घेऊन दाखवा, अजित पवार १० हजार मतांनी पराभूत होतील. रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांचे आव्हानही मी स्विकारतो देशाची व राज्याची व्यवस्था बदलल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.

जानकर यांनी वाल्मीक कराड प्रकरणावर भाष्य केले आहे. उत्तम जानकर म्हणाले, सरकार आणि वाल्मीक कराडमध्ये तडजोडी झाल्या आहेत, त्यामुळे तीन आरोपी फरार आहेत. आरोपी वाल्मीक कराड याला पोलिसांनी अटक करणे अपेक्षित होते, मात्र तो हजर झाला ही पोलिसांसाठी मोठी नामुष्कीची गोष्ट आहे. आकाच्या मागे कोण आहे? हे गृह विभागाने शोधून काढावे, जर त्यांना सापडत नसेल तर गृह खाते माझ्याकडे द्या, मी सगळं शोधून काढतो.

उत्तम जानकर यांनी यापूर्वी देखील महायुतीवर जोरदार हल्लाबोल केला होता. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा अत्यंत दारुण पराभव झाल्यानंतर उत्तम जानकर यांनी ईव्हीएम मशीनवर शंका घेत पुन्हा निवडणुका घेण्याची मागणी केली होती. आता पुन्हा त्यांनी महायुती सरकार कोसळणार असल्याचे भाकीत केले आहे.

## मंत्रालयात प्रवेशासाठी आता कडक सुरक्षा यंत्रणा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



मंत्रालयात प्रवेशासाठी आता कडक आणि काटेकोर सुरक्षा यंत्रणा तयार करण्यात येणार आहे. मंत्रालयात येणार प्रत्येक माणूस आयडेंटीफाय होईल अशी सुरक्षा प्रणाली तयार करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

जिल्हापातळीवर सुटणा-या तक्रारी जिल्हापातळीवरच सुटाव्यात त्यासाठी मंत्रालयात खेटे मारावे लागू नयेत यासाठी एक कार्यप्रणाली विकसित करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्रालयात आधीच्या काळात आत्महत्या, आंदोलने असे अनेक प्रकार घडले आहेत. हे प्रकार रोखण्यासाठी मंत्रालयाच्या मधल्या चौकात सुरक्षाजाळी देखील उभारण्यात आली. त्यावरही उडया मारून आंदोलनांचे प्रकार घडले आहेत.

याला पायबंद घालण्यासाठी आता कडेकोट सुरक्षा प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. मंत्रालयात येणा-या प्रत्येकाचे फेशियल रिकग्नीशन देखील होणार आहे. मंत्रालयात येण्यासाठी प्रत्येकाला नोंदणी करावी लागणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही नोंदणी ऑनलाईन देखील करता येणार आहे. ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर त्या व्यक्तीचा प्रवेश पास तयार होईल, जाताना तो त्या व्यक्तीला परत करावा लागेल. यामुळे कोण किती वेळ मंत्रालयात फिरत होता हे स्पष्ट होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## माझ्या राजीनाम्याची गरज नाही : धनंजय मुंडे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याचे नाव आल्याने मुंडे यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत आहे.

यावर मंत्री धनंजय मुंडे यांनी आज प्रतिक्रिया दिली आहे. दिवंगत संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे प्रकरण सीआयडीकडे सोपविल्याने आपल्या राजीनाम्याची काही गरज नाही असे मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

## फडणवीसांच्या कामाचे मोदींकडून कौतुक

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

दुर्गम आणि माओवादग्रस्त भागात सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या प्रयत्नांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एक्स वरील पोस्टला उत्तर देताना मोदींनी लिहिले की, दुर्गम आणि माओवादग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकार करत असलेल्या प्रयत्नांचे मी कौतुक करतो. इतकेच नाही तर त्यांनी गडचिरोली आणि त्याच्या आजूबाजूच्या प्रदेशातील सर्वांचे अभिनंदन देखील केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल गडचिरोली जिल्ह्यातील दौऱ्यादरम्यान विविध कार्यक्रमांना हजेरी लावली. या वेळी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. या ११ जणांवर महाराष्ट्रात १ कोटीपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारनेही त्यांच्यावर बक्षीस जाहीर केले होते. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली.

निवडणूक आचारसंहितेच्या काळात ५ नक्षली ठार झाले. २०२४ या वर्षांत २४ नक्षली ठार झाले आणि १८ माओवाद्यांना अटक करण्यात आली. गेल्या ६ महिन्यांत १६ जहाल नक्षलवादी आणि आज ११ असे २७ जण मुख्य प्रवाहात आले आहेत. या सर्व प्रयत्नांमुळे मोदींनी राज्य सरकारचे कौतुक केले आहे.

## सिडनी कसोटीतून रोहितचा पत्ता कट

■ वृत्तसंस्था, मेलबर्न, दि. २ :



कोणत्याही कसोटी संघाचा प्लेइंग-११ हा कर्णधारापासून सुरू होतो. त्यानंतर उर्वरित खेळाडूंची निवड केली जाते. सिडनी कसोटीपूर्वी भारतीय संघाची स्थिती उलट आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या सामन्यात टीम इंडियाच्या पहिल्या नावाचा निर्णय झालेला नाही.

गुरुवारी भारतीय प्रशिक्षक गौतम गंभीर यांना रोहित शर्माच्या सिडनी कसोटी खेळण्याबाबत विचारण्यात आले, मात्र गंभीरने थेट उत्तर दिले नाही. तो सहज म्हणाला, 'प्लेइंग-११ खेळपट्टी पाहून ठरवू.' गंभीरच्या उत्तराव्यतिरिक्त टीम इंडियाच्या सराव सत्रात याचे संकेत स्पष्टपणे दिसत होते.

सध्या भारतीय संघ बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेत १-२ ने पिछाडीवर आहे. संघाला ३ जानेवारीपासून सिडनी येथे 5 सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना खेळायचा आहे. रोहित ड्रेसिंग रूममध्ये एकटाच बसला होता, सामन्यापूर्वी संघाच्या सराव सत्रात रोहित शर्मा संघापासून अलिप्त दिसत होता.

## धनंजय मुंडे 'आऊट' छगन भुजबळ 'इन'?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

### वडेट्टीवार यांचा मोठा दावा



**छोट्या 'आका'चे एन्काउंटर होण्याची शक्यता**

मोठ्या आकाला वाचवण्यासाठी लहान आकाचा एन्काऊंटर होऊ शकतो, अशी आमच्याकडे माहिती असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. मोठ्या आकाला वाजवण्यासाठी, पुरावा नष्ट होण्याची शक्यता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्याचेही वडेट्टीवार म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार हे धनंजय मुंडे यांच्या बीड मधील प्रकरणावरून काहीही बोलत नाहीत. त्यांचे मौन पाहता मुंडेंची विकेट काढली जाऊ शकते, अशी शक्यता वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे.

मुंडे यांची विकेट काढून टीम मध्ये छगन भुजबळ यांचा समावेश करण्याची शक्यता किंवा विचार अजितदादांच्या डोक्यात आहे का? असा प्रश्न गेल्या चार-पाच दिवसापासून आम्हाला पडत असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

मुंडे यांना राजीनामा द्यायला सांगून मंत्रिमंडळात स्थान न मिळालेल्या छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात घेण्याची शक्यता वडेट्टीवार यांनी व्यक्त केली आहे. धनंजय मुंडे यांचा निर्णय लागण्याची शक्यता आहे, त्यामुळेच छगन भुजबळ यांना यामध्ये कदाचित वेट अँड वॉचची भूमिका ठेवावी लागणार असल्याचा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

## मनुसह ४ जणांना खेल रत्न

### ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार, ५ प्रशिक्षकांना द्रोणाचार्य

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :

क्रीडा मंत्रालयाने गुरुवारी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली. ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी. गुकेश, हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि पॅरा ॲथलीट खेळाडू प्रवीण कुमार यांना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

याशिवाय ५ प्रशिक्षकांना द्रोणाचार्य पुरस्कार आणि ३० खेळाडूंना अर्जुन पुरस्कार देण्यात येणार आहे. १७ जानेवारी रोजी राष्ट्रपती भवनात हा पुरस्कार सोहळा होणार आहे.

मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दुहेरी ऑलिम्पिक पदक जिंकले होते. १८ वर्षीय भारतीय ग्रँडमास्टर डी गुकेशने सिंगापूर येथे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली भारतीय हॉकी संघाने पॅरिस ऑलिम्पिक मध्ये कांस्यपदक आणि २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. प्रवीणने उंच उडीत विक्रमासह पॅरालिम्पिक सुवर्णपदक जिंकले

### राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार घोषित








## संक्षिप्त

### 18 लाखांची फसवणूक प्रकरणी मेसर्स ओम साई बिल्डर्स आणि डेव्हलपर्स वर गुन्हा दाखल

**पनवेल, दि. २ : प्रतिनिधी**

आकुर्ली येथे बुकिंग प्रमाणे फ्लॅट न देता घेतलेले पैसे परत दिले नाहीत आणि 18 लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी मेसर्स ओम साई बिल्डर्स अँड डेव्हलपर्स बांधकाम व्यवसायिक भरत रामावत यांच्याविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. नाथाराम चौधरी हे तुर्भे गाव, नवी मुंबई येथे राहत असून 2018 मध्ये त्यांना पनवेल परिसरात घर घ्यायचे होते. यावेळी त्यांच्या मित्राने आकुर्ली येथे ओम साई बिल्डरचे भरत रामावत हे इमारत बांधकाम करणार असल्याचे सांगितले. ते खांदा कॉलनी सेक्टर एक येथील ऑफिसमध्ये गेले. त्यानंतर भरत रामावत यांनी चालू बांधकामाच्या ठिकाणी घेऊन जाऊन दाखवले आणि वर्षात प्रोजेक्ट पूर्ण करून सदनिका हस्तांतरित करणार असल्याचे सांगितले. त्यावेळी सदनिका क्रमांक 202 खरेदी करण्याचा निर्णय घेतला. एकूण किंमत 18 लाख रुपये ठरवून 2018 ते 2019 दरम्यान 18 लाख रुपये रोखीने दिले. त्यानंतर 2019 मध्ये बांधकाम व्यवसायिक यांनी निबंधक कार्यालय पनवेल येथे रजिस्ट्रेशन करून दिले. 2020 मध्ये कोविड आल्यानंतर ते फोन द्वारे संपर्कात होते. त्यावेळी बांधकाम निर्धारित वेळेत होणार नाही विलंब लागेल अशी माहिती देण्यात आली. काही दिवसांनी त्यांचा संपर्क बंद झाला व फोन घेणे बंद केले. ऑफिसमध्ये जाऊन चौकशी करण्याचा प्रयत्न केला असता ऑफिस देखील बंद दिसून आले. बांधकाम साइटवर गेल्यानंतर त्या ठिकाणी अन्य बिल्डिंगचे बांधकाम सुरू होते. तसेच तो प्लॉट दुसऱ्याला विकून टाकला. त्यामुळे नाथाराम चौधरी यांची 18 लाखाची फसवणूक केली.

### भिवंडीतील पूर्णेश्वर प्रासादिक भजन मंडळाला पंढरपूरात भजनाचा मान

**भिवंडी, दि. २ : प्रतिनिधी**

तालुक्यातील पूर्णा येथील पूर्णेश्वर प्रासादिक भजन मंडळाला श्री क्षेत्र पंढरपूर येथील रखुमाई सभा मंडपात भजन सेवा देण्याचा मान नुकताच मिळाला.दरम्यान भजन मंडळातील पामराणी गोड सुमधुर आवाजाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली.तर पंढरपूर विश्वस्तांच्या सहकार्याने पूर्णेश्वर प्रासादिक भजन मंडळाला ही भजनाची सेवा विठ्ठल रखुमाई चरणी रखुमाई सभा मंडपात गाण्याचा मान मिळाला.यावेळी भजन सम्राट अशोक बुवा टावरे,प्रफुल्ल बलिराम खंडागळे,आनंता चौधरी,सुदाम चौधरी,राघो पाटील,ठाकन्या दुदा चौधरी,गुरुनाथ खंडागळे,निलेश गुरव,कैलास माणिक चोधरी,आशोक इताडकर,मधुकर मिटकर,पंडीत डोगासकर,जगन्नाथ भगत आदि भजन मंडळीने भजनाची सेवा दिली.

### महापारेषणच्या सहायक अभियंता (पारेषण) पदाची परीक्षा सुरळीत

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

ऊर्जा विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) सहाय्यक अभियंता (पारेषण) या पदासाठी घेतलेली ऑनलाईन लेखी परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडली. महापारेषणने ५५१ सहाय्यक अभियंता (पारेषण) या पदासाठी महाराष्ट्रातील ९३ केंद्रावर ही परीक्षा घेतली. मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कराड यासह महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर ही परीक्षा दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेसहा या वेळेत शांततेत पार पडली. यामध्ये २० हजार २९९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १५ हजार ८१८ उमेदवारांनी ही परीक्षा दिली. दरम्यान, दिव्यांग उमेदवारांसाठी नियमानुसार अतिरिक्त वेळ देण्यात आला होता. परीक्षा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे व मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडलातील सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) यांनी परिश्रम घेतले. यावेळी पोलिस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता. तसेच सुरक्षा रक्षक ही तैनात करण्यात आले होते. त्यामुळे कोणत्याही परीक्षा केंद्रांवर अनुचित प्रकार घडला नाही.

### बंदोबस्तावरील पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू

**चाकण, दि. २ : प्रतिनिधी**

एकीकडे नववर्षाचा उत्साह, जल्लोष सगळीकडे दिसून येत असतानाच दुसरीकडे पिंपरी चिंचवडमध्ये एका पोलीस अधिकाऱ्याच्या अपघाती मृत्यूमुळे हळहळ व्यक्त होत आहे. महाळुंगे MIDC पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकाचा कर्तव्यावरती असताना अपघाती मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. जितेंद्र गिरनार असं त्यांचं नाव असून ते कर्तव्य बजावत असताना झालेल्या भीषण अपघातात त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला कोणतीही दुर्घटना घडू नये, म्हणून पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र गिरनार हे चाकण एमआयडीसीमध्ये पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी महिंद्रा कंपनीच्या समोरून ते कारमधून निघाले असताना समोर एक कंटेनर उजव्या लेन मधून चालला होता, मात्र, कंटेनर चालक अचानकपणे डाव्या लेनमध्ये घुसला आणि पीएसआय गिरनार यांच्या गाडीची कंटेनरला जोराची धडक बसली. या घटनेमध्ये गिरनार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

# नैना प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सिडकोचे शेतकऱ्यांना आवाहन

**नवी मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

११ वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या नवी मुंबई विमानतळ अधिसूचित क्षेत्र म्हणजे नैना प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्यासाठी सिडको महामंडळाच्या हालचालींना वेग आला आहे. हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी नैना प्रकल्पातील शेतकऱ्यांच्या सहकार्य आणि सहभागाची गरज असल्याचे मत सिडकोने मंगळवारी प्रसिद्धी पत्रक काढून जाहीर केले. यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन नव्या वर्षात नैना प्रकल्पाची वीट रचली जाईल अशी चिन्हे निर्माण झाली आहेत.

दोन दिवसांपूर्वीच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर पहिल्या व्यावसायिक विमानाची यशस्वी चाचणी घेतल्यानंतर सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी १७ एप्रिलला विमानतळ सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला. याचवेळी विमानतळाशी सलग्न असणाऱ्या नैना प्रकल्पाची कामे लवकरच सुरू केली जातील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नैना क्षेत्रात पनवेल तालुक्यातील ९२ तर उरणमधील दोन अशा ९४ गावांचा समावेश आहे. १० जानेवारी २०१३ पासून शासनाने अधिसूचित केलेल्या या क्षेत्रात कोणत्याही बांधकामासाठी नैना बांधकाम परवाना विभागाकडून पूर्व परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. हीच बांधकाम परवानगी मिळविण्यासाठी खर्चिक व डोकेदुखी ठरणारी प्रक्रिया असल्याने नैना क्षेत्रातील शेतकरी वैतागले आहेत. मागील ११ वर्षात या परिसरात नैना प्राधिकरणाने कोणतीही सुविधा न दिल्याने शेतकरी संतापले आहेत. नैना हे देशभरातील गुंतवणूकदार आणि भागधारकांसाठी आकर्षणाचे केंद्र असले तरी येथील शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी सिडकोने पुढाकार घेतला आहे.

या परिसरातील अवैध बांधकामांमुळे काही प्रमाणात संभ्रम निर्माण झाल्याने मंगळवारी सिडकोने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात संबंधित संभ्रम दूर करण्यासाठी नगर नियोजन, परिवहन नियोजन, बांधकाम परवाने, अभियांत्रिकी, भूमी व भूमापन आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे या विभागांतील अधिकाऱ्यांना सक्रिय केल्याचा दावा सिडकोने केला. नैना प्रकल्पाच्या धोरणानुसार नगर रचना परियोजनेअंतर्गत लँड पूलिंग मॉडेलद्वारे मूळ जमिनीच्या ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित, अंतिम भूखंड जमीनमालकांना मिळणार आहे. शेतकऱ्यांचे विस्थापन टाळण्यासाठी हे मॉडेल सिडकोने आणले आहे. बहुतेक शेतकऱ्यांचे अंतिम भूखंड त्यांच्या मूळ ठिकाणी देण्यात आल्याचा दावा सिडकोने केला आहे.

**विद्यमान नैना प्रकल्पाची स्थिती**

नगर रचना आणि २ ला शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. नगर रचना परियोजना ३ ते ७ ला प्राथमिक मंजुरी मिळालेली आहे, तर नगर रचना परियोजना ८ ते १२ साठी मसुदा योजनांकरीता लवादांची प्रक्रिया सुरू आहे. नगर रचना परियोजना १ आणि २ साठी प्रॉपर्टी कार्ड वितरणासाठी तयार आहेत आणि अंतिम भूखंडांचे हस्तांतरणही सोबतच शक्य आहे.

### बनावट कागदपत्रांद्वारे 496 कोटींची कर चुकवेगिरी जीएसटी कार्यालयाकडून तक्रार

**पुणे, दि. २ : प्रतिनिधी**

बनावट कागदपत्रांद्वारे दोघांनी ४९६ कोटी रुपयांचा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) चुकविल्याचे उघडकीस आले आहे. जीएसटी गुप्तचर महासंचालनालयाच्या (डीजीजीआय) पुणे विभागाने ही कारवाई केली. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांकडून राजस्थानमधील दोन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जीएसटी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी अनुराग श्रीवास्तव यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेले दोघे जण राजस्थानातील आहेत. आरोपीने बनावट कागदपत्रांचा वापर करून चार कंपन्यांची स्थापना केली. बनावट व्यवहार, कागदपत्रांद्वारे दोघांनी 'इनपुट टॅक्स क्रेडिट'चा लाभ घेतला. बनावट व्यवहाराद्वारे दोघांनी ४९६ कोटी २७ लाख रुपयांचा कर चुकवेगिरी करून फसवणूक केली, असे तक्रारीत म्हटले आहे.

बनावट कंपन्या, व्यवहार दाखवून आरोपींनी त्याचा लाभ काही व्यावसायिकांना मिळवून दिल्याचा संशय आहे. त्या दृष्टीने तपास करण्यात येत आहे. कोरेगाव पार्क पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रुणाल मुल्ला तपास करत आहेत.

# पनवेलमध्ये यंदा प्रदूषण नियंत्रणात असल्याचा पालिकेचा दावा

**पनवेल, दि. २ : प्रतिनिधी**

पनवेल शहर महापालिकेने मागील वर्षी हवेतील धूलिकण कमी करण्यासाठी केलेल्या विविध उपाययोजनांमुळे वर्षाच्या शेवटी पनवेल महापालिका क्षेत्रात साडेतीनशे बांधकामे सुरू असूनही हवेतील धूलिकणांमुळे गुणवत्ता निर्देशांकाचे प्रमाण वाढले नाही, असा दावा पनवेल महापालिकेने केला आहे. पालिकेने उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने १६४ बांधकाम व्यावसायिकांना नियमांचे पालन करण्यासाठी नोटिशीद्वारे सूचना दिल्या. पालिकेने प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभाग स्तरावर निरीक्षण व कारवाईसाठी विशेष समित्या स्थापन करुन सहाय्यक आयुक्तांना बांधकाम थांबविण्याचा व त्वरित कारवाई करण्याचा अधिकार दिल्याने बांधकाम व्यावसायिकांचे धाबे दणणले आहेत. याशिवाय स्वच्छतेसाठी विविध यांत्रिकी उपाययोजना केल्याचा लाभ पनवेलमध्ये होताना दिसत आहे.

महापालिकेने चार फॉग कॅनन वाहने तैनात केली असून त्या माध्यमातून हवेतील धुलीकण कमी करण्यासाठी पाण्याचा



फवारा केला जातो. या वाहनांनी दररोज २४० कि.मी. क्षेत्राचा परिसराची स्वच्छता केली जाते. तसेच रस्त्यांची स्वच्छता व पाण्याच्या फवारणीसाठी धूल प्रतिबंधक वाहनांचा वापर केला जातो. दिवाळीपूर्वी 'डीप क्लीन ड्राईव्ह' सुरू करण्यात आले असून यासाठी शंभराहून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात

> उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आणि एकूण हवेची गुणवत्ता पाहता महानगरपालिका हवेतील धूलिकणाचे प्रदूषण कमी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करत आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेमध्ये यंदाच्या वर्षी केलेल्या उपाययोजनांमुळे हवेतील गुणवत्ता निर्देशांकात सकारात्मक बदल दिसत आहे.
> **– मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका**

आल्याची माहिती पनवेल पालिकेचे उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी दिली.

हवा गुणवत्ता मोजण्यासाठी फिरते निरीक्षण केंद्रे आणि दोन एअर पोल्युशन मॉनिटरिंग स्टेशन कार्यरत आहेत. या वर्षी सात नवीन स्टेशन आणि पाच हवामान मापन केंद्रे बसविण्याचे पालिकेचे नियोजन आहे. या प्रयत्नांमुळे यंदा पनवेलच्या हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) बहुतेकदा १५० पेक्षा खाली राहिला आहे. गेल्या वर्षी एक्यूआय २०० पेक्षा जास्त गेला होता, परंतु यंदा नियंत्रणात असल्याचे आकडेवारी दर्शवते.

### खाद्यतेलाच्या दरात 30 टक्के वाढ; निर्यात शुल्क, सोयाबीन दरात वाढ झाल्याचा परिणाम

**मुंबई, दि. २ : प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून स्थिर असलेले तेलाचे दर आता वधारले आहेत. सोयाबीन दरात वाढ झाल्याने आणि केंद्र सरकारने २० टक्के आयात शुल्क आकारल्याने तेलाच्या दरात ३० टक्के वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून आवक कमी होत आहे, त्यामुळे तेलाचे दर वधारले आहेत. दोन महिन्यांपूर्वीही तेलाच्या दरात वाढ झाली होती आणि आता पून्हा दर कडाडले आहेत. दोन वर्षांपूर्वी तेलाच्या दराने उच्चांक गाठला होता, मात्र हळूहळू तेलाचे दर पूर्ववत झाले होते. गेल्या कित्येक महिन्यांपासून तेलाचे दर स्थिरावले होते. परंतु आता पुन्हा तेलाच्या दराने उसळी घेतली आहे. सरकारने सोयाबीन, दर वाढवले आहेत, शिवाय २० टक्के आयात शुल्क लावल्याने दर वधारले आहेत. एपीएमसी बाजारात महिन्याला ७ ते आठ ८ टन तेलाची आवक होत असते मात्र मागणी वाढल्यामुळे तेलाचा पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे बाजारात तेलाची आवक ही कमी होत आहे, त्यामुळे ३० टक्के दर वधारले आहेत अशी माहिती एपीएमसी व्यापाऱ्यांनी दिली आहे.

# 31 डिसेंबरच्या रात्री 311 मद्यपी चालकांविरोधात कारवाई

**ठाणे, दि. २ : प्रतिनिधी**

नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला अनेकजण मद्य पिऊन वाहन चालवितात. या पार्श्वभूमीवर ठाणे वाहतुक पोलिसांनी ३११ मद्यपी वाहन चालकांविरोधात आणि त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५८ सह प्रवाशांविरोधात कारवाई केली आहे. ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ही कारवाई करण्यात आली आहे.



नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला मोठ्याप्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले होते. त्यामुळे मंगळवारी रात्री ठाणे जिल्ह्यातील विविध भागात ढाबे, हॉटेल आणि फार्म हाऊसमध्ये पार्ट्यांसाठी नागरिकांची गर्दी झाली होती. पार्टी केल्यानंतर अनेकजण मद्य पिऊन वाहने चालवितात. या प्रकारामुळे अपघाताची भिती निर्माण होत असते. तसेच मद्यपी वाहन चालकांसोबत सह प्रवासी देखील असतात. या घटनेत मद्यपी वाहन चालकामुळे इतर प्रवाशांचा जीवावरही बेतण्याची शक्यता असते. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात मुख्य चौकांमध्ये वाहन चालकांची तपासणी केली होती. या कारवाईत ३११ वाहन चालक हे मद्य पिऊन वाहने चालवित असल्याचे आढळून आले. या वाहन चालकांविरोधात दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तर त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५८ सह प्रवाशांवरही पोलिसांनी कारवाई केली आहे. सर्वाधिक मद्यपी वाहन चालकांविरोधात ठाणे आणि कल्याण शहरात करण्यात आली.

# दुःख पचवून पुन्हा इरसाळवाडी झाली हसती-खेळती

**खालापूर, दि. २ : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात 19 जुलैला सर्वांचे हृदय हेलावणारी घटना घडली. रात्री झोपेत जोरदार पावसाच्या सरी कोसळत असताना डोंगराळ भागात इरसाळवाडी गावावर दरड कोसळल्याने येथील अनेक कुटुंबं मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. अनेकांचा बळी गेला. त्यानंतर शासनाने तातडीने मदत कार्य सुरू करून पुनर्वसनाला गती दिली. गेली दोन वर्षात नवीन वसाहत तयार होऊन 44 कुटुंबांना सर्वसोयीयुक्त घरे मिळाली आहेत.

19 जुलै 2023 रोजी ही घटना घडल्यानंतर शासन खडबडून जागे झाल्याने या कुटुंबांना तात्पुरते चौक गावजवळ राहण्याची व्यवस्था व खाण्या पिण्याची व्यवस्था केली. त्यानंतर त्यांना या इरसाळवाडी गावजवळून 5 की मी च्या अंतरावर असणाऱ्या शासनाच्या जागेत कायमची पक्की घरे तयार करून देण्यासाठी राज्य शासनाने आदेश दिल्याने शासकीय यंत्रणा कामाला लागली आणि सिडकोने ही जबाबदारी घेऊन शिर्के कन्स्ट्रक्शन या बांधकाम कंपनीला घरे बनवून देण्यासाठी ठेका दिल्याने युद्धपातळीवर काम सुरू करून सर्व सोयीयुक्त घरे देऊन पूर्वसन केल्याने इसाळवाडी पूर्वपदावर आल्याचे चित्र असून इसाळवाडी खेळू बागडू लागले असल्याचे चित्र या नवीन वसाहतीत दिसत आहे.

खालापुरात तालुक्यासह सर्वत्र जोरदार पावसाच्या सरीमुळे सर्वत्र हाहाकार माजला असताना 19 जुलै ची ती काळी रात्र होती. या दिवशी इसाळवाडी मधील हसती खळती कुटुंबांवर दरड कोसळल्याने मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली.

बचवलेली काही मंडळी यांना तात्पुरते चौक गावजवळील एक खाजगी मालकीच्या जागेत तात्पुरते पूर्वसन केले मात्र पुन्हा अशी घटना घडू नये यासाठी राज्य शासनाचे मंत्री मंडळाने निर्णय घेतल्याने शासकीय यंत्रणा कामाला लागली तात्कालीन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील तात्कालीन प्रांत अधिकारी अजित नैराळे व तहसीलदार आयुब तांबोळी गटविकास अधिकारी सह सर्वच शासनाचे अधिकारी येथील कुटुंबाचे कायमस्वरूपी पूर्वसन होण्यासाठी कामाला लागले. या ठिकाणी जवळपास 5 की मी च्या अंतरावर असणारे नानिवली गावजवळ जवळपास साडेसहा एकर शासकीय जागेत 44 कुंबाना पक्की घरे बांधून देण्यासाठी पाऊले उचलली त्यानुसार ही जबाबदारी सिडको कडे देण्यात आली आणि शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीला घरे तयार करण्यासाठी बांधकामालाची जबाबदारी दिली आणि युद्धपातळीवर काम सुरू करून प्रत्येक कुटुंबाला साडे तीन गुंठे जागेत सुसज्ज घर तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी ठरवून दिलेल्या जागेत स्वतंत्र परसबाग,24 तास पाणी बाथरूम, आजूबाजूला सुरक्षा भिंत किचन रुम, बेडरूम, हॉल खेळती हवा राहावी यासाठी सलयडिंग खिडक्या बालवाडी, शाळा आणि गुराढोरांसाठी स्वतंत्र शेड देण्यात आले आहेत. त्यामुळे इरसाळवाडी पुन्हा सर्व दुःख पचवून हसती खेळती असल्याचे चित्र या नवीन वसाहती आहे.

# थंडीपासून संरक्षणासाठी ब्लँकेट वाटप



**डहाणू, दि. २ : प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील मोडगाव ग्रामपंचायत हद्दीत टायगर ग्रुप डहाणू तालुका शाखेच्या वतीने थंडीपासून संरक्षणासाठी गरजूंसाठी ब्लँकेट वाटपाचा उपक्रम राबवण्यात आला. थंडीच्या कठीण काळात ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांची गरज लक्षात घेऊन, त्यांना मदतीचा हात देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. टायगर ग्रुप मुंबई अध्यक्ष संजयभाऊ खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डहाणू तालुका शाखेचे आधारस्तंभ वसंत सादडे व अध्यक्ष आशिष भोये यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

मोडगाव ग्रामपंचायत परिसरातील मोडगाव, आष्टा रायपूर, बहारे, धुंदलवाडी या गावातील शेकडो गरजूंना ब्लँकेट वाटप करून थंडीपासून बचावासाठी मदत करण्यात आली. या उपक्रमामुळे थंडीच्या कठीण काळात गरजूंना दिलासा मिळाला असून, त्यांचे जीवन अधिक सुसह्य करण्याचा प्रयत्न टायगर ग्रुपने केला. यावेळी गरजूंच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.


टायगर ग्रुपच्या या कार्याबद्दल स्थानिकांनी समाधान व्यक्त करत उपक्रमाचे कौतुक केले. समाजातील दुर्बल घटकांसाठी मायेची ऊब देणारा आणि गरजूंना मदतीचा हात देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे. टायगर ग्रुपचा हा सामाजिक संवेदनशीलतेने स्थानिकांमध्ये आशा निर्माण केली असून, भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवले जावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# उरण-नेरुळ -बेलापूर रेल्वेवर फुकट्यांचा प्रवास

## दिवसाची एक लाखांची तिकीट विक्री 50 हजारांवर

**उरण, दि. २ : प्रतिनिधी**

१२ जानेवारी २०२५ ला उरण ते नेरुळ/बेलापूर हा लोकल मार्ग सुरू होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ झाली असली तरी या मार्गावरील फुकट्या प्रवाशांची संख्याही वाढू लागली आहे. दिवसाची १ लाखांची तिकीटविक्री आता ५० हजारावर आली असल्याची माहिती रेल्वे विभागाकडून देण्यात आली आहे. उरण ते नेरुळ/बेलापूर या मार्गामुळे उरणवरून नवी मुंबई आणि मुंबईत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना स्वस्त आणि जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. या मार्गाने दररोज ७ ते ८ हजार प्रवासी प्रवास करीत आहेत. दिवसेंदिवस या मार्गावरील प्रवासी संख्येत वाढ होत आहे. मात्र लोकल एका तासाच्या अंतराने असल्याने याचा या प्रवासमार्गाला फटका बसत आहे.



या लोकलच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी केली जात आहे. त्यासाठी थेट केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आश्वासन दिले आहे. मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनीही अशाच प्रकारचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे पुढील वर्षापासून उरण ते नेरुळ/बेलापूर या मार्गावरील लोकल अर्ध्या तासाच्या अंतराने सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. लोकलच्या फेऱ्यांत वाढ न झाल्याने उरण शहरातून नव्याने सुरू झालेल्या एनएमएमटी बस सेवेकडे प्रवासी वळू लागले आहेत.

### सीसीटीव्हीची प्रतीक्षाच

उरण स्थानकासह या मार्गावरील द्रोणागिरी, न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकांच्या परिसरात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी करूनही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. येथील उरण स्थानकानजीक झालेला भीषण अपघात आणि द्रोणगिरी स्थानकावर लोकल मधून पडलेली महिला या दोन घटना ताज्या आहेत. अपघातानंतर स्थानिक पोलिसांनीही रेल्वे विभागाकडे सीसीटीव्ही बसविण्याची मागणी केली आहे. उरण येथून प्रवास करणारे ३० टक्के प्रवासी फुकट्या प्रवास करीत असावेत, कारण प्रतीचे तिकिट काढणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.

**राजेश कुमार, मुख्य अधीक्षक, उरण रेल्वे**

# ठाणे ते कर्जत-कसारा शटल सेवा वाढविण्याची मागणी

**कल्याण, दि. २ : प्रतिनिधी**

प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेऊन ठाणे ते कर्जत, कसारा दिशेने जाणाऱ्या शटलच्या फेऱ्या वाढवण्यात याव्यात, अशी मागणी उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची भेट घेऊन केली. याशिवाय रेल्वे प्रवाशांच्या इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी कल्याण लोकसभेचे खासदार, मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यांची एकत्रित बैठक घेण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी आमदार मोरे यांच्याकडे रेल्वे प्रवासी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केली. कर्जत, कसारा भागातून ठाणे, मुंबई परिसरात नोकरी, व्यवसायासाठी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. या भागातील प्रवासी ठाणे येथून रेल्वे नवी मुंबई, पनवेल भागात जातो. संध्याकाळच्या वेळेत सीएसएमटी, दादर येथून कल्याण, कर्जत, कसारा, खोपोली रेल्वे स्थानकाकडे सुटणाऱ्या लोकल प्रवाशांनी तुडुंब भरलेल्या असतात. या खचाखच भरलेल्या लोकलमुळे ठाणे रेल्वे स्थानकात या लोकलमध्ये चढण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या कर्जत, कसाराकडील प्रवाशांना गर्दीच्या लोंढ्यामध्ये चढता येत नाही. प्रवाशांच्या या लोकल गेल्यानंतर त्यांना अर्धा ते पाऊण तास खडावे लागते. त्यामुळे संध्याकाळी पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत ठाणे रेल्वे स्थानकातून पंधरा ते वीस मिनिटांच्या अंतराने कर्जत, कसारा, खोपोली, आसनगाव दिशेने शटल सेवा वाढवाव्यात. रेल्वे प्रवाशांच्या या मागणीच्या पूर्ततेसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यांची एकत्रित बैठक बोलाविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी रेल्वे प्रवासी महासंघाच्या अध्यक्षा लता अरगडे, ज्येष्ठ सल्लागार नंदकुमार देशमुख, ठाकुर्ली-कोपर रेल्वे प्रवासी संघटनेचे सागर घोणे यांनी आमदार मोरे यांच्याकडे केली. डोंबिवली, कल्याण ही सर्वाधिक वर्दळीची रेल्वे स्थानके आहेत. या रेल्वे स्थानकातील विकास कामे आणि समस्यांविषयी रेल्वे अधिकाऱ्यांबरोबर एक बैठक बोलावून या रेल्वे स्थानकांमधील प्रवासी समस्या मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा, मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून सुरू असलेले विकास प्रकल्पांना गती मिळण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा मागण्या आमदार मोरे यांच्याकडे करण्यात आल्या आहेत.

# मानव जीवनात समाधान हेच खरे सुख :खासदार अमर काळे

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २ :

मनुष्याच्या जीवनात अनेक सुख-दुःख येत असतात. सुखात मनुष्य समाधान मानतो. परंतु दुःखात फारचा दुखी होतो. परंतु दुःखात सुध्दा समाधान माननारा मनुष्य, ख-या अथार्ने सुखी व समाधानी असतो.

पारायण, किर्तन, भजन अशा कार्यक्रमांमुळे माणसाला समाधान मिळते असे खासदार अमर काळे म्हणाले. नववर्षाच्या पर्वावर श्री संत गजनन महाराज संसथेच्यवतीने मगनवाडी नजिकच्या श्री संत गजानन महाराज मंदिर येथे तीन दिवसीय विजय ग्रंथ सामुहिक पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार अमर काळे यांच्या



हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी संस्था सचिव ज्ञानेश्वर पहाडे, संजय बमनोटे, हरीष तांदळे, अजय लांबट, तळवेकर आदींची उपसिथती होती. कार्यक्रमाची सुरुवात सामुहिक हनुमान चालीसा पठनाने करण्यात आली. त्यानंतर सामुहिक पारायणाला प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाला निखील बाकडे, प्रकाश रायटर, सुरेश मुंजेवार, बाबाराव फाले, गंगाधर भडंग, राजेंद्र धनुष्यकर, किशोर दोड, कल्पना पोकळे, अर्चना लांबट, आशा तेलंग, पुष्पा भडंग आदींनी सहकार्य केले.

अनेक पुरुष महिलांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# देवळी विधानसभा क्षेत्राचा २५ वर्षाचा वनवास आमदार राजेश बकाने यांच्या रुपाने संपला

■ महासागर प्रतिनिधी
देवळी, दि. २ :

मातंग समाज हा भारतीय जनता पार्टीच्या बाजुने नेहमीच साथ दिली आहे, त्यांचा फायदा भाजपाला मोठया प्रमाणात झाला आहे, गत 25 वषार्पासून एकच आमदार होता त्यामुळे देवळी विधानसभा क्षेत्राचा विकास पाहिजे तसा झाला नाही, आता परिस्थीती बदललेली आहे, देवळी विधानसभा क्षेत्राचा 25 वषार्चा वनवास आमदार राजेश बकाने यांच्या रुपाने संपला असुन आता देवळी पुलगांव विधानसभाक्षेत्राचा मोठया प्रमाणात विकास होईल याच शंका नाही. देवळी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व भगवान बिरसा मुंडा यांच्या सभागृहाचे काम पुर्णत्वास गेलेले आहे, पुढेही समाजाच्या विकासासाठी निधीकमी पडणार असे यावेळी मा.रामदास तडस यावेळी म्हणाले.

देवळी येथील राष्ट्रीय लहू शक्ती संघटना व सर्व मातंग समाज यांच्या वतीने देवळी-पुलगांव विधानसभा क्षेत्राचे नवनिवार्चीत आमदार श्री. राजेशजी बकाने यांच्या भव्य नागरी सत्कार कार्यक्रम माजी खासदार रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाला राष्ट्रीय लहू शक्ती संघटनाचे मागदर्शक महादेवराव तेलंगे, राहुल चोपडा, दशरथ भुजाडे, किशोर गव्हाळकर, राष्ट्रीय लहू शक्ती संघटना अध्यक्ष विलास डोंगरे, महिला आघाडी उपाध्यक्ष सुमनताई बावणे, आशाताई वाघमारे उपस्थित होते.

सर्व समाजांनी मला मोठया मताधिक्याने देवळी-विधानसभा क्षेत्राचा आमदार म्हणून निवडून दिले, त्यामुळे प्रत्येक समाजाचा सर्वागिंण विकास, केन्द्र व राज्यसरकारच्या योजना प्रत्येक नागरिकांपर्यत पोहोचविण्याची जबाबदारी माज्याकडे आलेली आहे, हि जबाबदारी निश्चीतपणे यशस्वीपणे पार पाडील यात शंका नाही.

# फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजीमुळे तपासयंत्रणा गतिशील : डॉ. जे. ऑगस्टीन

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २ :

फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजीमुळे दात व दंतखुणांच्या आधारे कायदेशीर तपासयंत्रणा अधिक शास्त्रशुद्ध, विश्वसनीय आणि गतिशील झाली आहे, असे प्रतिपादन डॉ. जे. ऑगस्टीन, औरंगाबाद यांनी सावंगी मेघे येथील शरद पवार दंत महाविद्यालयाद्वारे आयोजित फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजी या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत केले. दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था अभिमत विद्यापीठ आणि इंडियन असोसिएशन ऑफ फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजी यांच्या सहकार्याने दंत व्यावसायिकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शरद पवार दंत महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला अभिमत विद्यापीठाचे महासंचालक डॉ. राजीव बोरले, इंडियन असोसिएशन ऑफ फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजीचे सचिव डॉ. जयशंकर पी. पिल्लई (अहमदाबाद), विशेषज्ञ डॉ. अर्जुन कुंडू (गांधीनगर, गुजरात), डॉ. अक्षय ढोबळे (नागपूर), अधिष्ठाता डॉ. मनोज चांडक, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. विद्या लोहे, ओरल ऑन्कोलॉजी विभागाच्या संचालक डॉ. मीनल चौधरी, मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. अंजली बोरले, आयोजन समिती अध्यक्ष डॉ. अलका हांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेत आभासी माध्यमाद्वारे डॉ. जे. ऑगस्टीन यांनी कायदेशीर तपास आणि शोधात्मक विज्ञानाबाबत संवाद साधत बाईटमार्क आणि त्यांचे न्यायवैद्यकीय महत्त्व सांगताना फॉरेन्सिक तपासणीमध्ये बाईटमार्क महत्त्वपूर्ण पुरावे कसे देऊ शकतात, याबाबत सखोल माहिती दिली.

कार्यशाळेची मुख्य संकल्पना मांडताना डॉ. अक्षय ढोबळे यांनी फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजीमधील दंतवय अंदाज पद्धतींची ओळख करून दिली. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. जयशंकर पिल्लई यांनी वंशनिश्चितीसाठी दंत मानववंशशास्त्र या विषयाची मांडणी करताना एखाद्या व्यक्तीच्या वंशाचा शोध घेण्यामध्ये दंत वैशिष्ट्यांची भूमिका प्रतिपादित केली. तर, डॉ. अर्जुन कुंडू यांनी फॉरेन्सिक फेशियल रिकन्स्ट्रक्शन या विषयावरील कृतिशील सत्रात सांगाड्याच्या अवशेषांपासून चेहऱ्यावरील वैशिष्ट्यांची पुनर्रचना करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत तिसऱ्या दिवशी डॉ. जगदीश राजगुरू (भुवनेश्वर, ओरिसा) यांनी फॉरेन्सिक ओडोन्टोलॉजीमधील लिंग निर्धारण या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. दंतशाखेत न्यायसंबंधित तपासकार्यात तसेच गुन्हेगारी प्रकरणातील गुंतागुंत सोडवण्यासाठी दंत पुराव्यांचा वापर करण्याबाबत सहाय्यभूत ठरलेल्या या कार्यशाळेत संपूर्ण विदर्भातील विविध महाविद्यालयांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या कार्यशाळेने आंतरविद्याशाखीय शिक्षणासाठी एक नवीन मानक स्थापित केले.

या आयोजनासाठी अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, प्रकुलगुरू डॉ. गौरव मिश्रा, कुलसचिव डॉ. श्वेता काळे पिसूळकर, कार्यकारी संचालक डॉ. संदीप श्रीवास्तव, डॉ. तृप्ती वाघमारे यांचे मार्गदर्शन तर डॉ. स्वाती पाटील, डॉ. अर्चना सोनोने, डॉ. आयुषी पखाले व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

## अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा** : महाराष्ट्र राज्य दिव्यांगत्व संशोधन समितीमध्ये अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. राज्य दिव्यांगत्व संशोधन समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यासाठी दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्यरत नामवंत, तज्ज्ञ व्यक्ती व दिव्यांगांच्या स्वंयसेवी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे पदाधिकारी व सदस्य यांची नावे शासनास सादर करावयाची आहे. त्याअनुषंगाने सात दिवसाच्या आत जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील अर्ज सादर करावा.

# राकाँ(शरदपवार) गटाचे राजु तळवेकर यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणघाट, दि. २ :

विधानसभा क्षेत्रातील नागरीक, युवा व महीला कार्यकर्ते आमदार समीर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. सिंदी (रे) शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट ) चे नेते राजु तळवेकर यांनी आमदार समीर कुणावार यांचे



विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास व काम करण्याची कार्यशैली पहाता भाजपा चे माजी जिल्हा उपाध्यक्ष राजू गंधारे यांच्या नेतृत्वात आमदार समिर कुणावार यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.प्रवेश सोहळ्याचे आयोजन आमदार समीर कुणावार यांच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाला आमदार समीर कुणावार यांचेसह भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, माजी जिल्हा उपाध्यक्ष राजू गंधारे व अमोल सोनटक्के उपस्थित होते.

# श्रृती पाठक यांची डॉ. हेडगेवार हॉस्पिटलला लाखाची देणगी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २ :

पुणे येथील प्रतिष्ठीत नागरिक श्रृती पंकज पाठकझ्रसब्जीवाले यांनी माहेरच्या भेटीत येथील डॉ. हेडगेवार हॉस्पिटलला १ लाख रुपयांची देणगी प्रदान केली. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी आपला संकल्प पूर्ण केला.

हॉस्पिटल भेटीच्या प्रसंगी त्यांनी ही देणगी प्रदान केली. जनकल्याण सेवा संस्थेतर्फे हे रुग्णालय नागरिकांना सेवा देते. यावेळी संस्थेचे विश्वस्त विशाल कुलकर्णी यांनी मदतीचा धनादेश



स्वीकारला.

याप्रसंगी श्रृती यांचे वडील दीपक सब्जीवाले आणि आई मेघा सब्जीवाले प्रामुख्याने उपस्थित होत्या. श्रृती यांचे वडील दीपक सब्जीवाले हे अंबादेवी-एकविरादेवी संस्थानचे सक्रीय पदाधिकारी आहेत. श्रृती यांना सामाजिक वारसा असून सासरी पाठक घराण्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वारसा आहे.

श्रृती या पुणे येथे शिक्षिका असून ध्यान, वाचन, प्रवास, पर्यावरण, निसर्ग, पाककला हे त्यांचे आवडीचे विषय आहेत. सध्या श्रृती संघ समर्पित विविध ठीकाणच्या प्रकल्पाला भेटी देवून प्रकल्पांची माहिती घेत आहेत. संस्थाध्यक्ष अजय श्रॉफ, सचिव गोविंद जोग आणि हॉस्पिटलचे प्रकल्प संचालक डॉ. यशोधन बोधनकर यांनी आभार मानले आहेत.

# आमदार कुणावार यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
सिंदी रेल्वे, दि. २ :

आमदार समीर कुणावार याच्या वाढदिवसानिमित्त स्थानिक भाजपा द्वारा आयुष ब्लड सेंटर नागपूर याच्या सौजण्याने नगरपरिषद हॉलमध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १०२ लोकांनी रक्तदान करून शहरात विक्रम नोंदविला आहे

कुणावार यांनी सिंदी शहराकरिता भरघोस विकास निधी दिलेला असून त्याच्यात असणारी सेवाभावी वृत्ती जोपासत आमदार कुणावार यांच्या वाढदिवसानिमित्त राजू गंधारे, अमोल सोनटक्के, स्नेहल कलोडे, प्रभाकर तडस, संजय भांसाली, आनंद छाजेड यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिराकरिता २२८ लोकांनी आपल्या नावाची नोंदणी केली होती त्यातील रक्तादाना करिता पात्र १०२ लोकांनी रक्तदान केले या पैकी महिला १८ तर ८४ पुरुषांनी रक्तदान केले. यामध्ये नगर परिषदेचे मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा, जिल्हा भाजपा सचिव




स्नेहल कलोडे, व्हाईस ऑफ मीडियाचे विदर्भ अध्यक्ष किशोर करंजीकर, वर्धा जिल्हाध्यक्ष नरेंद्र देशमुख,सेलू तालुका अध्यक्ष सचिन धानकुटे, नंदपूरचे माजी सरपंच सारंग डोगरे, माजी नगरसेवक अमोल बोगाडे आदींनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, प्रमुख अतिथी माजी जिल्हाउपाध्यक्ष राजू गंधारे, किशोर करंजीकर, नरेंद्र देशमुख, सचिन धानकुटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अमोल सोनटक्के यांनी केले तर आभार स्नेहल कलोडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेकरिता रामेश्वर घंगारे, रामभाऊ, सोनटक्के, मिलींद पेटकर, अमोल बोगाडे, प्रभाकर तडस, जगदीश बोरकुटे, सागर भगत, मनोज तिमांडे,तेजस सोनटक्के आदींनी सहकार्य केले.

# सेवानिवृत्त डॉ. इशरत उल्लाह खान यांचा सत्कार



■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २ :

मौलाना आजाद ऊर्दु जुनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. इशरतउल्लाह खांन ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांना निरोप देण्याकरिता कॉलेजच्या सभागृहात मुस्लीम एजूकेशन सोसायटीचे अध्यक्ष हाजी अख्तर इसाजी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते डॉ. इशरत खांन यांना शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. समारंभाला मुस्लीम एजूकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष मोहम्मद अली, सचिव हाजी हुसेन अली, कोषाध्यक्ष हामीद अली रिजवी, कार्यकारीणी सदस्य इमरान राही, रोशन अली, शब्बीर अली, नूर अली, शहीद अली, अब्दुल रशीद, शकील भाई कॉलेजच्या नवीन प्राचार्य परविन बानो जहीर खांन मोहम्मद हनीफ, अब्दुल सत्तार शेख आदी मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. या प्रसंगी मोहम्मद अली, हुसेन अली, इमरान राही आदीनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. मुमताज खांन तर आभार प्रा. सैफा नाज यांनी मानले.

## नववर्षाला रोठा गावात आनंदोत्सव साजरा

**रोठा** : महात्मा गांधी आयुर्विज्ञान महाविद्यालय, सेवाग्रामच्या सहजीवन प्रकल्प अंतर्गत रोठा गावातील ज्येष्ठ नागरिकांसाठी नववर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून नववषार्चे स्वागत आनंदाने केले. कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक गीतगायनाने झाली, ज्यामध्ये प्रत्येकाला आपल्या आवाजाची जादू दाखवण्याची संधी मिळाली. त्यानंतर घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत ज्येष्ठांनी आपली सर्जनशीलता उलगडली. बालपणी न मिळालेली संधी मिळाल्याने त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. यासोबतच निंबू चमचा शर्यत आणि बलून-ग्लास रेस या खेळांमध्येही ज्येष्ठांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शेवटी आयोजित करण्यात आलेल्या संगीत खुर्ची स्पर्धेत ज्येष्ठांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. रोठा गावाच्या आशा वर्कर वनिता सोयाम, सहजीवन सारथी चिंतामणी शेंडे, कांता डेहनकर, तसेच गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या सहकायार्मुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

# सेवानिवृत्ती सोहळ्यात प्रा.वैद्य यांनी केला देहदानाचा संकल्प



■ महासागर प्रतिनिधी
समुद्रपूर, दि. २ :

स्थानिक विद्या विकास महाविद्यालय समुद्रपुर येथील प्रा.किरण वैद्य आज सेवानिवृत्त झाले.त्यांना सेवानिवृतीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सन्मानित करण्यात आले 'समाजशास्त्र' विषयाचे प्राध्यापक म्हणून ३० वर्ष त्यांनी सेवा दिली विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी त्यांनी प्रयत्न केले शैक्षणिक क्षेत्राबरोबरच, पत्रकारीता, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठे योगदान दिले आहे मृत्युपश्चात आपल्या देहाचा उपयोग वैद्यकीय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व्हावा म्हणून आज सेवावृत्तीचे वेळी प्रा.किरण वैद्य यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केलाआहे. या संकल्पा बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. विद्या विकास महाविद्यालयात आयोजित सत्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानी विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर होते तर प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टी चे जिल्हा उपाध्यक्ष किशोर दिघे, प्राचार्य डॉ.किशोर रेवतकर,संस्थेच्या सचिव डॉ. नयना शिरभाते (तुळसकर), प्रा.किरण वैद्य,शुभांगी वैद्य मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.प्रकाश तळे, प्रास्ताविक प्रा.विलास बैलमारे यांनी तर आभार प्रा.अरविंद डडमल यांनी मानले यावेळी प्रा.मेघशाम ढाकर डॉ.विठोबा चंदनखेडे, प्रविण तेलतुंबडे, प्रा.जितेंद्र तोमर यांनी मनोगत व्यक्त केले.डॉ.राजेशाम वेलूपुल्ला, डॉ.राजिव कळसकर, डॉ राजकुमार रामटेके, डॉ. शितल अवघडे, , डॉ.नितीन अखूज,प्रा. सदानंद सार्वे, प्रा.डॉ. प्रमोद अलोणे, प्रा महेश चिव्हाणे, प्रा. अजय मोहोड, प्रा. घनशाम कदमधाड,प्रा.मनोज खेकरे, प्रा. दिपक वालदे, प्रा नरेंद्र मेश्राम प्रा. शिवाणी ढाकरे ईश्वर ठाकरे,धनेश रंगारी,मुकेश हुलके, प्रा.बेले,हर्षल उमरे, संजिव पवार,वामन झाडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# भरधाव धावणा-या वाहनांवर आवर घाला

## जनता विद्यालयाच्या वतीने ठाणेदारांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
देवळी, दि. २ :

शहरातील बसस्थानकालगत असलेल्या जनता कनिष्ठ महाविद्यालय व विद्यालय आणि शिवसेना चौकातील जनता प्रायमरी स्कुल येथे वाहतुकीची समस्या गंभीर झाली आहे. या रस्त्यावर वाहनांची वर्दळ रहात असुन चालक भरधाव वेगाने वाहने चालवितात.

यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी भरधाव वाहने चालविणा-या चालकांवर आवर घालण्यात यावा, अशी मागणी जनता विद्यालयाचे प्राचार्य धर्मेश झाडे , उपमुख्याध्यापक सुरेंद्र उमाटे आणि जनता प्रायमरी स्कुलचे मुख्याध्यापक महेंद्र झाडे यांनी ठाणेदार नेहते यांना निवेदनाव्दारे केली आहे.

यावेळी ठाणेदार नेहते यांनी शाळेचे म्हणणे ऐकून घेऊन तत्काळ आपली कर्तव्यतत्परता दाखवितांना पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन बसस्थानक गाठले आणि तेथील अस्ताव्यस्त रहदारीची दखल घेतली.

लगेच जनता विद्यालयासमोर असलेले अतिक्रमण, गाड्यांची सुरळीत वाहतुक होण्याकरीता वाहतुक शाखेतील कर्मचाऱ्यांना पाचारण करुन निर्देश देण्यात आले आणि स्वतः रिक्षा, हातगाडी आणि धुम पद्धतीने गाड्या चालविणाऱ्या मुलांवर कारवाई केली.

शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेस शाळेसमोर अनेक मुले आपल्या बाईक्स घेऊन सदर रस्त्यावरुन सुस्साटपणे ये-जा करतात त्यामुळे अपघाताची शक्यता बळावली असल्याने ठाणेदार नेहते यांनी आपल्या वाहतुक कर्मचाऱ्यांना शाळा सुटण्याच्या आणि भरण्याच्या वेळेत हजर राहण्याचे सांगीतले.

तसेच शिवसेना चौकातील जनता प्रायमरी स्कुलचा रस्तासुद्धा अतिशय वर्दळीचा असल्यामुळे त्याठिकाणी सुद्धा लक्ष देण्याचे मान्य केले.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांचे पालक आणि सुजाण नागरिकांनी ठाणेदार नेहते यांच्या कर्तव्य तत्परतेची प्रशंसा केली.या कारवाई दरम्यान जनता विद्यालयाचे प्राचार्य धर्मेश झाडे, उपमुख्याध्यापक सुरेंद्र उमाटे,पत्रकार व जनता विद्यालयाचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर सुरकार, गणेश शेंडे आदींची उपस्थिती होती.

# वाल्मिकला 'पद्मश्री' व मुंडेंना 'पद्मभूषण' पुरस्कार द्यावा!



## 'आका' सापडला पण आकाच्या 'आका'चं काय?

**वाल्मिक कराड विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन काळात नागपुरातच आहे आणि मंत्र्यांच्या छत्रछायेमुळे पोलिस त्याला अटक करीत नाहीत. तो कोणत्या फार्म हाउसवर आहे ते सांगू शकतो, असे विधान विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केल्यावरही सत्ताधारी गप्प का बसले होते? याचे उत्तर आजतागायत मिळू शकले नाही. पण जर विरोधी पक्षनेत्याला वाल्मीक कुठे आगे माहीत होते, तर त्यांनीही 'तो' पत्ता सभागृहात का सांगीतला नाही? पोलीस वाल्मीकला पकडू शकले नाहीत, तो शरण आला. तोही अलीशान गाडीतून रूबाबात उतरला. हे पोलीस दलासाठी अपमानास्पद नसेल का? गुन्हेगारांचे राजकीय नेत्यांशी संबध असतील तर सामान्यांना न्याय कसा भेटेल ? २२ दिवस होऊनही पोलीस वाल्मीकला पकडू शकले नव्हते. तो पुण्यात येतो, पुण्यात राहतो, अशावेळी पोलीस काय करत होते ? जर पोलीस गुन्हेगारांना पकडू शकत नसेल, तर हे पोलीसदल काय कामाचे ? एकेकाळी महाराष्ट्र पोलीसांचे देशात नाव होते. फडणवीस गृहमंत्री झाले आणि सगळं बिघडलं, असं म्हटलं जात असलं तरी ते अर्धसत्य आहे. बीड मधील राजकीय नेत्यांनी संपूर्ण जिल्ह्याचे गुन्हेगारीकरण करून टाकले आहे. अलीकडे धनंजय मुंडे त्याचे शिरोमणी ठरले आहे. पोलीसांचे जाऊ द्या पण पोलीसदलातील जे वरिष्ठ अधिकारी आहेत, त्यांना अरेतुरेच्या भाषेत बोलले जाते. पोलीसांची स्वायत्तता काढून टाकली गेली आहे. दबावाखाली काम करायला सांगीतले जाते. एखादा गुन्हा करून तो जर सत्ताधारी पक्षाचा असेल वा त्याने सत्ताधारी पक्षात प्रवेश केला, तर सगळा गुन्हा माफ होतो. तिथं पोलीसांचेही काही चालत नाही. रोज हादरून टाकणा-या घटना घडत आहेत, पण 'आका' अन्'आका'चे 'आका' यांना त्यामुळे काहीही फरक पडत नाही. भारतासारख्या लोकशाही देशात वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्यासारख्यांची बीडमध्ये एवढी दहशत असेल तर नक्कीच त्यांची कामगिरी उच्च दजार्ची आहे एवढा घोळ घालण्यापेक्षा सरकारने एखादा ठराव करून केंद्राकडे पाठवावा व दहशतीचे शिरोमणी म्हणून वाल्मीक कराडला 'पद्मश्री' व ज्याच्या इशाऱ्यावर तो काम करतो अशा धनंजय मुंडेंना 'पद्मभूषण' पुरस्कार द्यायला काय हरकत आहे?**

संतोष देशमुख हत्या प्रकरणी एसआयटी नेमून उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तपास व्हायला पाहिजे. कारण मुख्य संशयित वाल्मीक कराडचे ह्यआकाह्न धनंजय मुंडे मंत्रिमंडळात आहेत आणि धनंजय मुंडेंच्या म्हणजेच ह्यआकांह्नच्या हातात सगळ्या यंत्रणा आहेत. अशा स्थितीत निष्पक्ष तपास कसा आणि कोण करणार? हा प्रश्न निर्माण होतोच.

'मुंडेंची मस्ती अन् नेभळट पोलीस' असा सूर बीड जिल्ह्यातून व्यक्त होत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ज्या वाल्मीक कराडने प्रसारमाध्यमांच्या पहिल्या पानावरच्या जागा व्यापल्या तोच वाल्मीक कराड अतिशय शांतपणे आलिशान गाडीतून सीआयडीसमोर सरेंडर होतो याचा अर्थ काय? फडणवीसांनी मस्ससजोग बद्दल केलेले निवेदन फार काही आश्वासक वाटले नाही.

वाल्मीक कराड विरोधात पुरावे सापडले तर कारवाई करू, असा त्या बोलण्याचा सुर होता. वाल्मीक कराड ही व्यक्ती तपास यंत्रणा मॅनेज करण्यात प्रचंड माहीर आहे. जो माणूस जिल्ह्याचा कलेक्टर, एसपी ठरवतो त्याच्या विरोधात सबळ पुरावे कसे काय मिळतील? त्याचे सहकारी सरकारमध्ये मंत्री असल्यावर निष्पक्ष चौकशी कशीकाय होईल?

पूजा चव्हाण प्रकरणातही फडणवीसांनी कॉल रिकॉर्डिंगचे पेन ड्राईव्ह देऊन पुरावे दिले होते. पुढे ज्यांच्यावर आरोप होते ते मंत्री झाले. त्यामुळे वाल्मीक कराडचे काही वाकडे होईल असे वाटत नाही. भविष्यात हाच वाल्मिक आमदार होउन या विधानसभेत दिसला तर नवल वाटायला नको.

एवढेच नव्हे तर राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या मांडीला मांडी लावून देखील तो बसेल. अर्थात महाराष्ट्राला या गोष्टीची सवय झाली आहे. कारण संजय राठोड यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला, त्याच वेळी फडणवीसांचा निष्पक्ष अवतार संपून गेला होता. अशा अवस्थेत देखील महाराष्ट्राला सध्या तरी फडणवीसांकडूनच थोड्याफार अपेक्षा शिल्लक आहे.

बीड मधील दहशतीचे अनेक व्हिडिओ आता प्रसारित होऊ लागले आहे. या दहशतीमध्ये धनंजय मुंडे एक नंबर वर असल्याचे स्पष्ट दिसते. आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केला असला, तरी व्यक्तिशः त्यांना झटके बसले, त्यावेळी ते जागे झाले.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

त्यांना पराभूत करण्यासाठी मुंडे भाऊ बहिणीने जे प्रयत्न केले, ते त्यांच्या जिव्हारी लागले होते. जर त्यांना या भाऊ बहिणीने त्रास दिला नसता, तर याप्रकरणी त्यांनी पुढाकार घेतला असता का? असाही प्रश्न बीड जिल्ह्यात विचारला जात आहे. संतोष देशमुख खून प्रकरणावर मंत्री धनंजय मुंडे यांनी काय भाष्य केले, हे ऐकल्यावर तळपायाची आग मस्तकात जाते. 'माझ्याशी संबंधित लोकांवर विधानसभेत चर्चा होत असताना मी सभागृहात उपस्थित राहणं उचित नाही, त्यामुळे आपण सभागृहात उपस्थित नव्हतो' असे स्पष्टीकरण म्हणजे उद्दामपणाचा कहर मानावा लागेल. वस्तुस्थिती अशी आहे की, वाल्मीक कराडला कुठे लपवायचे आणि प्रकरण कसे शांत करायचे, यातच धनंजय मुंडे यांचा वेळ वाया गेला असावा. तसेच सभागृहांमध्ये आरोप होत असताना खाली मान घालून कसे बसायचे? असाही प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला असावा.

संतोष देशमुख यांच्या खूनप्रकरणी आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, अशी अपेक्षा त्यांनीच नव्हे; तर वाल्मीक कराडनेही व्यक्त केली. एकदा का पुरावे नष्ट केले की अशी मागणी प्रत्यक्ष खून करणाराही करू शकतो. महाराष्ट्रातील जनता शांत असली तरी ती दूधखुळी नाही हे मुंडे आणि कराडला कोणी सांगावे? पण राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले असल्यामुळे बोलावे तरी काय?

अलीकडे राजकारणाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. पुर्वी सर्वसाधारण माणूस सत्तेत जाऊन समाज सेवा करायची असे सुत्र होते. पण सत्तेचे महत्व व्यापारी, धनदांडगे, चोर, दरोडेखोर यांना माहीत झाले. मग लोकशाहीच्या नावाखाली आपणच का सत्तेत जाऊन नये, अशी भावना तयार झाली. मग हळूहळू सामान्य माणसे राजकारणात फक्त कार्यकर्ते म्हणून राहीले. कारण सत्ता मिळवायला पैसे लागतात व ते या मंडळींकडे भरपूर होते, मग काय ? सुरू झाला सारीपाटाचा खेळ.

आपण जे आज बघतो हे या गोष्टीचा परिपाक आहे. मुळात काही सन्माननीय अपवाद वगळता राजकारण हे गुंड, धंदेवाईक, व्यापारी यांच्या हातात गेले आहे.

कष्टकरी, कामगार, शेतकरी, मजूर हा सारा वर्ग अगदी खालच्या स्तरावर आणून ठेवलाय.? समाजाला जाती धर्माच्या नावाखाली करमणूक, व्यसन याच्या नादी लाऊन जीवनमरणाशी झुंजत ठेवलंय, हे समाजाने वेळीच समजून घ्यायला हवे आहे. आजकाल कोणत्या घरात जन्म झाला, त्या पेक्षा कोणत्या पक्षाच्या नेत्याचे संस्कार आणि विचार घेऊन जन्माला आला याचा विचार होतो. आपला समाज अनुकरणीय असल्याने नेता आणि अभिनेता यांचे विचार आणि आदर्श समाज घेत असतो आणि जगत असतो. कधी कधी असे वाटते की आपला देश परत पारतंत्र्यात जाईल आणि पुन्हा एकदा स्वातंत्र्य युद्धाची सुरुवात करावी लागेल.

तसाही भारत देशाचा इतिहास आहे की, जास्त दिवस स्वातंत्र्य पचविण्याची ताकत भारतीयांच्या मानसिकतेत नाही. कारण सतत कोणाच्या तरी गुलामगिरीत या आधी रहावे लागले आहेत. साडेतीनशे वर्षे मोगलांनी राज्य केले. दिडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले. आता कुठे तरी सत्तर वर्षे झाली स्वातंत्र्य मिळून. पण परत गुलामगिरीची जखम ठसठस करते आहे. आता तर आमचेच भांडवलदार, गुंड, धंदेवाईक देशावर राज्य करायला लागले. या आधी तरी परके म्हणून हूसकाऊन लावले. पण आता तो ही पर्याय राहीला नाही. कोणा बद्दल बोलणार आणि कोणाला हाकलणार?

••••••••••

### वाल्मिक सामाजिक कार्यकर्ता व गरीब राजकारणी?

बीडच्या केज न्यायालयामध्ये वाल्मिक कराडची सुनावणी पार पडली. त्याआधी सरकारी वकील संतोष देशपांडे यांनी ही केस लढण्यास नकार दिल्याने मोठा पेच निर्माण झाला होता. एक केस लढण्यास नकार दिला याचाच अर्थ वाल्मीकची दहशत काय आहे हे महाराष्ट्रालाही समजले.? त्यानंतर जे. बी. शिंदे या वकीलाने सरकारची बाजू मांडली. नंतर आरोपी वाल्मीक कराडचे वकील म्हणून अशोक कवडे यांनी युक्तिवाद केला. त्यांनी केलेला युक्तिवाद 'लाजवाब' होता.

वाल्मिकचे खंडणी प्रकरणात राजकीय द्वेषापोटी नाव गोवण्यात आले असून दोन कोटींची खंडणी मागितलेला फक्त आरोप आहे. त्यामुळे पंधरा दिवसांची पोलीस कोठडी मागणं चुकीचे आहे. वाल्मीक सरेंडर झाला आहे. त्याला न्यायलयीन कोठडी द्या. दोन कोटींची खंडणी मागितली, मात्र पैसे दिलेत का हे सांगावे.

वाल्मिक हा सामाजिक कार्यकर्ता आहे, तसेच तो गरीब राजकारणी आहे, असे ज्यावेळी न्यायालयात सांगितले जात होते, त्यावेळी 'अंधा कानून' पुढे येतो की काय? अशी भीती वाटत होती. कारण पैशासाठी कुणीही काहीही करू शकतो हे बीडनेच महाराष्ट्राला दाखवले.

### वाल्मीक कराडने ३२ खून केले?

बीड जिल्ह्यामध्ये अफगाणिस्तानमधील कंधारपेक्षाही वाईट परिस्थिती आहे. बीड येथील राजकीय नेत्यांनी काही गुंडांना हाताशी धरून मोठी दहशत पसरवली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्यादेखील याच राजकीय गुंडांकडून करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील वाल्मीक कराड नावाच्या व्यक्तीने ३२ खून केले आहेत. इतकी या माणसाची प्रचंड दहशत आहे. मंत्री धनंजय मुंडे यांचा तो कार्यकर्ता आहे. वाल्मीक कराड याच्या सांगण्यावरून बीड जिल्ह्यामध्ये सुमारे ३२०० लोकांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. अनेक आयएएस अधिकारी वाल्मीक कराड याच्या घरासमोर दरबार भरवतात. इतकी मोठी प्रचंड दहशत या वाल्मीक कराडची आहे. त्याला मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकीय पाठबळ आहे. त्यामुळे वाल्मीक कराड याची दहशत वाढत गेली आहे. वाल्मीक कराड याची दहशत ही काही अलीकडची नाही. देवेंद्र फडणवीस मागील सात वर्षांपासून सत्तेत आहेत, ते स्वतः गृहमंत्री आहेत. त्यांच्याच काळात बीड जिल्ह्यात या लोकांची दहशत सुरू आहे.

**आ. उत्तम जानकर**

### देवाभाऊ व दादांची काय मजबुरी?

मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पक्षातील धनंजय मुंडे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षातील पंकजा मुंडे या दोन्हींच्या भोवती एवढे वादग्रस्त वलय निर्माण होऊनही या लोकांची मंत्रिमंडळातून गच्छंती व्हायला तयार नाही. याचाच अर्थ दोघांचीही काहीतरी मजबुरी दिसते. सरकार बदनाम होत आहे. पण त्याची भीती कोणीही बाळगायला तयार नाही. देवाभाऊंचे एक बरं आहे, त्यांच्या मंत्रिमंडळातील एखाद्याला कितीही कलंक लागला, तरी त्याला संरक्षण देण्याची भूमिका त्यांनी आजपर्यंत नेहमी घेतली आहे. अपवाद फक्त एकनाथ खडसे यांचा. त्याला कारणही तसेच होते. कारण खडसेंच्या रूपातून पक्षांतर्गत एक तगडा प्रतिस्पर्धी निर्माण झालेला होता. खडसेंची आता कायमची वाट लागलेली आहेच. बीडच्या प्रकरणातून धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांची होणारी बदनामी सरकार सहन करते आहे. याचाच अर्थ यामध्ये काहीतरी काळेबेरे आहे. फडणवीस निष्कलंक आहे. त्यांच्या भोवती अद्याप कोणत्याही वादाची किनार नाही. पण मोकट सुटलेल्या राजकारणांना त्यांनी कधीही आवर घातला नाही, हे महाराष्ट्राने अनेक वेळा पाहिले आहे.

---

# करारी बाणा जपणारी सावित्रीबाई!

**ज्या काळात स्त्रीला समाजात मानाचे स्थान मिळत नव्हते, शिक्षणापासुन आणि स्वातंत्र्यापासुन दूर ठेवून स्त्रीला परावलंबी आणि परतंत्र दुर्लक्षित केले जात होते, त्या काळात सावित्रीबाईचा जन्म झाला. पुढे मात्र क्रांतिज्योती सावित्रीबाईना जोतिबा फुले यांचा उदार हृष्टीकोण त्यांच्या ठायी असल्याने स्वतःचे व्यक्तिमत्व घडविण्याची संधी त्यांना प्राप्त झाली, हे त्यांचे अहोभाग्य म्हणावे लागेल. ज्योतिबा सारखे व्यक्तिमत्व त्यांच्या जीवनी आले आणि आयुष्यच पार बदलून गेले.**

--------------

सावित्रीबाईना बालपणी घरच्यांकडून शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळणे त्या काळात शक्यच नव्हते, कारण त्यासाठी मनुवाद्यांचे वर्चस्व होणे, स्त्रीला शिक्षणापासुन मज्जाव होता. सावित्रीबाईना मात्र बालवयापासून शिकावे असे मनोमन वाटत होते. ते त्यांनी विवाह झाल्यानंतर साध्य केले, ही त्यांच्या जमेची बाजू झाली.

सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांना अपत्य नव्हते. त्यांनी यशवंतरावांच्या मुलाला आणि त्यांच्या विधवा आईला आपल्या घरी आश्रय दिला. पुढे सावित्रीबाईनी ज्योतिबांशी विचार विनिमय करुन यशवंताला दत्तक घेतले. यशवंताच्या खऱ्या आईला सावित्रीबाईनी अत्यंत प्रेमाने वागविले, ही त्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष होती.

ज्या जोतिबांच्या मनाने स्त्रीयांनी शिकावे असा विचार केलेला असल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीपासूनच स्त्री शिक्षणाला आरंभ केला होता. जोतिबांच्या वडिलांनी आपल्या मुलाच्या शिक्षणाबाबत विरोध प्रकट केला होता. तिथे सुनेच्या शिक्षणाला ते नकार देतील यात काय आश्चर्य, पण ज्योतिबांचा मुलीसाठी शाळा काढण्याचा विचार निश्चित झाला होता. त्यामुळे त्याचा आरंभ त्यांनी आपल्या पत्नीपासून म्हणजे सावित्रीबाईपासुनच केला.

शेतात काम करतानाच झाडाखाली बसून काळ्या मातीत अक्षरे गिरवत सावित्रीबाई शिकू लागल्या. यामध्ये थोडी प्रगती झाल्यावर त्यांनी एका सरकारी शाळेत प्रवेश घेऊन पुढचे शिक्षण चालू ठेवले. स्त्रीला शिक्षणापासुन वंचित ठेवता कामा नये, असा निर्धार करुन 14 जानेवारी 1848 साली ज्योतिबांनी पुण्यातील बुधवारपेठेत भिडयांच्या वाडयात मुलींची पहिली शाळा काढली. त्यात सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका म्हणुन कार्यरत होत्या.



सनातनी पुण्यात हलकल्लोळ माजवित होते. कलीयुग आले, धर्म बुडाला, कली मातला, अशी सनातन्यांनी बोंब करावयास सुरवात केली. या सर्व गोष्टींना त्यांना काडीचीही किंमत दिली नाही. कारण त्यांना हे माहित होते की, चांगल्या कामाची उपेक्षा, अवहेलना होते नंतर त्याबद्दल कुतुहल निर्माण होते, व शेवटी त्याचा स्विकार होतो, तसे या कार्याचे झाले.

पण मुलींना शिकवायचे धाडस करायला कुणी शिक्षक पुढे येईना. तेव्हा सावित्रीबाई शाळेत जाऊन मुलींना शिकवू लागल्या. सोबत त्यांची सहकारी फातिमा शेख यांनी सुध्दा त्यांच्या समवेत बरेच सहकार्य करुन त्यांच्या पाठीशी खंबीर उभ्या राहिल्या. बायकांनी शिकणे हे महापाप आणि त्यांना शिकवणे हे तर महाभयंकर पाप असे त्याकाळी सर्वच समाज समजले जायचे. तरीही धाडसाने सावित्रीबाई शाळेत मुलींना शिकवायला जाऊ लागल्या.

पुण्यातील अतिकर्मठ ब्राम्हण लोक त्यांच्यावर दगड, शेण, चिखल वगैरे फेकीत पण सावित्रीबाईनी या सर्व छळाला शांतपणे तोंड देऊन मुलींना शिक्षण देण्याचे कार्य अव्याहत चालू ठेवले. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी नंतर दोन-तीन शाळा काढल्या अशावेळी शिक्षकांची गरज भासू लागली स्त्री शिक्षिका मिळणे कठिणच होते. अशावेळी उस्मान शेख यांच्या भगिनी फातीमा शेख यांनी सावित्रीबाई समवेत शिक्षिका म्हणुन उत्तम कार्य केले. उस्मान शेख हे ज्योतिबांचे जीवलग मित्र होते. हे येथे आवर्जून सांगावेसे वाटते.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

पुणे येथील हे शैक्षणिक कार्य पाहून 1852 मध्ये इंग्रज सरकारने फुले पती-पत्नींचा मेजर कॅन्डी यांच्या हस्ते जाहीर सत्कार केला आणि शाळांना सरकारी अनुदानही जाहीर केले. भारतातल्या मुलींच्या पहिल्या शाळेतील या पहिल्या शिक्षिकेने आपले शिक्षण देण्याचे व्रत चालूच ठेवले. त्यांची ही सेवाभावी कृती प्रत्येक स्त्रीने आत्मसात करुन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे आणि ते पूर्णत्वास नेणे प्रत्येक स्त्रीचे कर्तव्य आहे.

पती निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक समाजाचे समता आंदोलन पुढे चालू ठेवले. सावित्रीबाईंनी तेव्हा त्यांच्या ठायी असणाऱ्या कविमनाला रुचलेल्या कविता आणि अभंग शब्दबध्दही केले. 1854 साली त्यांचा हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला, त्यात त्यांनी आपल्या कवितांमधुन स्त्री, शुद्र, अतिशुद्रासाठी शिक्षणासाठी मोल, महत्व तत्ववेत्याला शोभेल अशा शब्दामधुन साध्या आणि सोप्या पध्दतीने सांगीतले आहे. ह्य

शुद्राचे दुखणे या काव्यातून मनुष्यत्वासाठी शिक्षणाचे महत्व दिले आहे. ते अधोरेखित करण्याची गरज आहे.

दोन हजार वर्षाचे शुद्राचे
दुखणे लागले
ब्राम्हविहित सेवेचे-
भूदेवांनी पछाडले
अवस्था पाहुनी त्यांची
हाच शब्द मनी उठे
सुलभ मार्ग कोणता काय
विचारे बुध्दीही आटे
खाली शुद्रांना सांगण्याजोगा
आहे शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा

समाजातल्या दीन-दलितांना मायेने जवळ करणाऱ्या स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणुन धडपडणाऱ्या सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहचारिणी म्हणुन शोभल्या. सावित्रीबाईनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला होता. दोघांनी शिकावे समाजातील अस्पृश्यास्पृश्यता नष्ट व्हावी, अनाथांना आश्रय मिळावा ही त्यांची कार्यक्षेत्रे त्यांच्या श्रध्देने प्रभावी झाली. 1876-77 मधल्या दुष्काळात प्लेगची भयंकर साथ आली असतांना त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रकृतीचीही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यासाठी काम केले. दुर्दैवाने त्या स्वतःच प्लेगच्या भीषण रोगाने पछाडल्या आणि अशातच त्यांचे निधन झाले.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता.

त्या एक लेखिका देखील होत्या, त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. 10 मार्च 1998 रोजी भारत सरकारने सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले. 2015 मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पूणे विद्यापीठ असे करण्यात आले.

त्यांच्या थोर सामाजिक कार्यांविषयीची कृतज्ञता म्हणून राज्य शासनाने 3 जानेवारी 1995 पासून सावित्रीबाईचा जन्मदिन हा संपूर्ण महाराष्ट्रात बालिका दिनह्ल महिला मुक्तीदिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांची क्रांतीज्योत सतत तेवत ठेवणे हे आपले आद्यः कर्तव्य आहे. त्यांच्या 193 व्या जयंतीनिमीत्त विनम्र अभिवादन!

••••••

---



# नव्या वर्षात ठाकरेंसाठी धक्क्यांची मालिका

नवीन वर्ष 2025 उद्धव ठाकरेंसाठी आव्हानात्मक ठरणार आहे. अडीच वर्षांपूर्वी राज्यात महाविकास आघाडीच सरकार कोसळलं, तेव्हापासून उद्धव ठाकरे यांना विविध राजकीय आवाहनं पेलावी लागत आहेत. आता, तर पक्ष एकसंध ठेवण्याच सर्वात मोठ आव्हान त्यांच्यासमोर आहे.

नव्या वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका निवडणुका जाहीर होऊ शकतात. अशावेळी पक्षात कुठलीही फाटाफूट होऊ नये, पदाधिकारी, कार्यकर्ते फुटू नयेत यासाठी विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. महिन्याभरापूर्वी विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. हे निकाल म्हणजे ठाकरे गटासाठी मोठा धक्का आहे. या निकालाने एकप्रकारे एकनाथ शिंदे यांची शिवसेना म्हणजे खरी शिवसेना यावर शिक्कामोर्तब केलं.

आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे 57 आमदार आहेत. तेच उद्धव ठाकरे यांच्या गटाकडे फक्त 20 आमदार आहेत. ठाकरेंकडे मुंबईतील आमदारांची संख्या जास्त आहे. पण राज्याच्या बहुतांश भागातील शिवसैनिकांना एकनाथ शिंदे यांचं नेतृत्व मान्य असल्याचा संदेश या निकालातून गेला आहे. आता नवीन वर्षात उद्धव ठाकरे गटाला खिंडार पडणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या आहेत.

उद्धव ठाकरे यांचे कोकणातील विश्वासू मानले जाणारे नेते राजन साळवी हे 12 जानेवारीला भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे वृत्त आहे. अत्यंत कठीण काळातही राजन साळवी यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडली नव्हती. एकनाथ शिंदे यांच्यासोबत शिवसेनेचे आमदार बाहेर पडले, त्यावेळी साळवी उद्धव ठाकरे यांच्यासोबत होते. त्यांना फोडण्याचे बरेच प्रयत्न झाले. चौकशीचा ससेमिरा मागे लागला. पण साळवी ठाकरेंसोबत राहिलेत. पण आता ते भाजपमध्ये जाणार अशी चर्चा आहे.

---




तुरटी आणि मीठ एकत्र मिसळल्यास अनेक समस्या दूर होतात. या दोन्ही गोष्टींमध्ये शरीरातील अनेक प्रकारच्या समस्या दूर करणारे गुणधर्म आहेत. तुरटीमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, तर मीठात बॅक्टेरिया आणि अँटी-फंगल गुणधर्म देखील असतात. तुरटी आणि मीठ हिवाळ्यात शरीरातील अनेक समस्या दूर करू शकते. तोंडातून येणाऱ्या दुर्गंधीपासून ते दातांच्या हिरड्यांपर्यंत सर्व काही बरे होऊ शकते. तर

**दात आणि हिरड्यांची समस्या**

तुरटी आणि मीठ हे दात व हिरड्यांसाठी खूप फायदेशीर आहे. याचा वापर करून हिरड्यांची सूज, वेदना आणि तोंडाचे व्रण बरे करता येते. यामुळे घसा खवखवण्यापासूनही आराम मिळतो. तुरटी पाण्यात विरघळवून त्यात चिमूटभर मीठ घालावे आणि मग त्याबरोबर चुळ भरावी. अश्याने घशाच्या समस्यांपासून आराम मिळतो.

**जखम आणि रक्तस्त्राव**

जर तुम्हाला दुखापत झाली असेल आणि खूप रक्तस्त्राव होत असेल तर तुम्ही तुरटी वापरू शकता. जखमेवर हलकी तुरटीची पावडर लावल्यास रक्तस्त्राव लवकर थांबतो आणि संसर्ग होत नाही.

**पायांच्या टाचांना भेगा पडणे**

हिवाळ्यात काही लोकांच्या पायांच्या टाचांना भेगा पडतात. अशा वेळी ते बरे करण्यासाठी तुरटी अतिशय उपयुक्त ठरते. गरम पाण्यात तुरटी आणि मीठ मिसळावे आणि नंतर त्यात आपले पाय काही वेळ ठेवावे. यामुळे भेगा पडलेल्या टाचा मऊ होतात आणि संसर्ग टाळण्यास देखील मदत होते.

**पिंपल्स आणि मुरुम**

तुरटी आणि मीठ हे पिंपल्स व मुरुम कमी करण्यास देखील मदत करते. यामुळे पिंपल्सचे बॅक्टेरिया दूर होतात आणि त्वचा स्वच्छ होते.

••••••

---

## अशोकायन

**महिला मुक्ति दिन**

धन्य धन्य त्या
सावित्री बाई फुले
ज्यांनी केले स्त्रीयांसाठी
शिक्षणाचे द्वार खुले ...

बाल विवाहाला
विरोध दर्शवूनी
विधवा विवाहाला
समर्थन दिले ...

त्यांचा आदर्श
ठेवूनी डोळ्यापुढे
समता प्रगतीच्या दिशेने
टाकत चालू पाऊल पुढे ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरची कामगिरी : डबल-हिट लॅप्रोस्कोपिक सर्जरीतून गाठला महत्त्वाचा टप्पा



**नागपूर, २ जानेवारी :** वानाडोंगरी येथे १०२० खाटांची सोय असलेल्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या सामान्य शस्त्रक्रिया विभागाने २९ वर्षीय पुरुष रुग्णावर पहिली- एकत्रित डबल हिट शस्त्रक्रिया करून एक महत्त्वपूर्ण मैलाचा टप्पा गाठला आहे.

या प्रगत प्रक्रियेमुळे सुविधांचा अभाव असलेल्या समुदायांपर्यंत मोफत आणि उच्च-गुणवत्तेची आरोग्यसेवा पुरविण्याबाबत रुग्णालयाची बांधिलकी अधोरेखित झाली आहे. काटोल येथील रहिवासी असलेला हा रुग्ण शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या महाआरोग्य शिबिरात उपचारासाठी आला होता. रुग्णालयाने आपल्या परिवर्तनकारी उपक्रमातून विदर्भातील ग्रामीण लोकसंख्येला मोफत उपचार देण्यासाठी या महाआरोग्य शिबिराची रचना केली आहे.

चार वर्षांपुर्वी दुखापत झाल्याचा पूर्व इतिहास असलेल्या या रुग्णासोबत गेल्या काही दिवसांपासून अंडकोषाचा विस्तार होऊन सूज असल्याची तक्रार होत होती. या रुग्णाला संपूर्ण तपासणीनंतर जननेंद्रियाच्या उजव्या बाजूला हर्नियाचे निदान करण्यात आले.

त्यामुळे जननेंद्रियाची एकात्मिक काळजी घेत शस्त्रक्रिया विभागाचे प्रमुख डॉ. राजीव सोनारकर यांच्या नेतृत्वाखाली, सर्जिकल टीमने एकाच सत्रात दोन प्रक्रिया पार पाडण्याचा निर्णय घेतला. यात एक उजव्या बाजूने एक लॅपरोस्कोप ऑर्किडेक्टॉमी आणि एक ट्रान्सबडोमिनल प्री-पेरिटोनियल (टीएपीपी) हर्निया दुरुस्ती करण्याचा निर्णय टीमने घेतला. या नाविन्यपूर्ण पध्दतीमुळे रुणाची वारंवारच्या शस्त्रक्रियेची गरज दूर करण्यात आली. सोबतर रुणाला सामान्य जीवनात परतण्याचा वेळ कमी करण्यात आला.

सर्जिकल टीममध्ये डॉ. तन्मय आणि डॉ. अश्विनी कुमार, भूलतज्ज्ञ डॉ. रिपन आणि डॉ. शिवानी. शल्यक्रिया विभागातील तंत्रज्ञ कर्मचारी, ज्यात एस. आर. वैशाली आणि सीमा यांनी प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी योगदान दिले, तर एसआर नंदिनी, सोनिया आणि ब्रदर मनीष यांनी शल्यक्रियेपूर्वी आणि शल्यक्रियेनंतर काळजीची जबाबदारी स्विकारली. प्रशासकीय समन्वयक म्हणून क्लिनिकल व्यवस्थापक डॉ. इशांगी निमगडे आणि फ्लोअर व्यवस्थापक म्हणून श्री आशिष दरणे यांनी नेतृत्व केले.

ग्रामीण लोकसंख्येसाठी आशेचा किरण

मेघे समुहाने आपल्या परिवर्तनकारी उपक्रमातून विदर्भातील ग्रामीण भागात सुविधांचा अभाव असलेल्या समुदायांपर्यंत मोफत उपचार पोचावेत यासाठी या महाआरोग्य शिबिराची रचना केली आहे. शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या हे महाआरोग्य शिबिर हजारो ग्रामीण रूग्णांसाठी जीवनदायी ठरले आहे. यात मोफत सल्ला, उपचार आणि शस्त्रक्रिया सारख्या सुविधा दिल्या जातात. शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या SMHRC मिशनला मूर्त स्वरुप देताना या शिबिरांतून शहरी केंद्रांमध्ये उपचार घेणे परवडत नसलेल्या लोकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवून त्यांची काळजी घेतली जाते.

पथदर्शी कौशल्य आणि तंत्रज्ञान

या कामगिरीबद्दल बोलताना डॉ. राजीव सोनारकर म्हणालेल, शरीराला कमीत कमी चीरा, आणि कमीत कमी वेदना देऊन रुग्णाचा हॉस्पिटलमधील मुक्काम कमी करणे आणि त्याला जलदगतीने आराम देण्यावर या तंत्राच्या माध्यमातून जोर दिला जातो. त्यामुळए शस्त्रक्रियेच्या काही तासांतच या रुग्णाची हालचाल झाली आणि कोणतीही गुंतागुंत टाळण्यातही यश मिळविले गेले.

दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ अँड रिसर्च सेंटरच्या टीमने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल कौतुक करताना संस्थेचे आरोग्य संचालक डॉ. अनुप मारार म्हणाले, नाविन्यपूर्ण आणि दयाळूपणे प्रत्येकाची काळजी घेण्यासाठी रुग्णालयाची बांधिलकी यातून स्पष्ट होते. वंचितांना सर्वसमावेशक काळजी प्रदान करताना कौशल्य, प्रगत तंत्रज्ञान आणि टीमवर्कचा लाभ घेण्यासाठी आमचे समर्पणही यातून प्रतिबिंबित होते.

नेतृत्व आणि दृष्टी

रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे आणि सहाय्यक वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुधीर सिंग यांच्या नेतृत्वाखाली शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर हे आरोग्य सेवा वितरणामध्ये नवनवे बेंचमार्क सेट करत आहे. ही उपलब्धी केवळ अत्याधुनिक शस्त्रक्रिया तंत्रांचा अवलंब करण्याबाबत रुग्णालयाची क्षमता दर्शविते असे नाही तर रुग्णांचे आरोग्य सुधारण्यासाठी अतूट समर्पण देखील दर्शवते. या दुहेरी-हिट लॅपरोस्कोपिक शस्त्रक्रियेची यशस्वी पूर्तता शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरची वैद्यकीय प्रगती आणि काळजीमध्ये एक नेतृत्व आणखी बळकट करते. समाजासाठी आशेचा किरण म्हणून काम करण्याचे ध्येय यातून स्पष्ट होते.

## सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत तेनालीचे भूत पाहून तथाचार्यांची घाबरगुंडी उडाली!

**मुंबई, २ जानेवारी :** सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत दरबारी कवी आणि हजरजवाबी तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज)च्या सुरस रम्य कथा सांगितल्या आहेत. पूर्वी विजयनगरमधून हकालपट्टी करण्यात आलेला तेनाली अलीकडच्या भागांमध्ये पुन्हा विजयनगर साम्राज्यात येऊन पोहोचला आहे आणि रात्र घालवण्यासाठी एका योग्य जागेच्या शोधात आहे.

आगामी भागांमध्ये, राजा कृष्णदेवरायाचा सेनापती तिम्मारसु (अमित पचोरी) याला समजते की तेनाली रामा विजयनगरला परतला आहे. तो तेनालीला लपून राहण्याचा इशारा देतो. कारण महामंत्री या नात्याने त्याच्याबद्दलची माहिती राजाला देणे हे त्याचे कर्तव्य आहे. पण, त्याचबरोबर, एक सच्चा मित्र म्हणून तो तेनालीला लपण्याची संधी देतो. हुशार तेनाली तथाचार्यांच्या (पंकज बेरी) घरात लपून बसतो. कारण, तेनाली आपल्या शत्रूच्याच घरात लपलेला असेल अशी कुणी शंका घेणार नाही, हे त्याला माहीत असते. तथाचार्यांचे सोबती धानी (सनी किश्नन) आणि मनी (सोहित सोनी) यांना ते भूत आहे असे वाटते! तिकडे राहून तेनाली गुपचूप समस्या सोडवत राहतो मात्र त्यामुळे गावात तो परतला असल्याची कुजबुज सुरू होते. तेनालीच्या भुताविषयी जेव्हा राजा तथाचार्यांकडून ऐकतो आणि तिम्मारसु आणि गावकऱ्यांकडून काही धागेदोरे मिळवतो, तेव्हा त्याची खात्री पटते की, तेनाली रामा जिवंत आहे आणि विजयनगर साम्राज्यात परतला आहे.

आपले पुनरागमन गुपित ठेवण्यात तेनालीला यश येईल का?

तेनाली रामा मालिकेत केंद्रवर्ती भूमिका साकारणारा अभिनेता कृष्ण भारद्वाज म्हणतो, तेनाली रामा कर्तव्य भावनेने आणि दृढ निर्धाराने विजयनगर साम्राज्यात परतला आहे. राज्यावर घोंघावणाऱ्या संकटापासून राज्याचे रक्षण करण्यावर त्याने आपले लक्ष केंद्रित केले आहे. विजयनगरशी असलेली दृढ निष्ठा, त्याचे बुद्धीचातुर्य आणि सुजाणता यांच्या बळावर तो शत्रूच्या नजरेत न येता आव्हानांना तोंड देतो. या गोष्टीत खूप विनोद आहे आणि हलके-फुलके क्षण आहेत, कारण तेनालीचा शत्रू असलेले तथाचार्य तेनालीला भूत मानून बसतात!


## ए-वन स्टील्स इंडिया लिमिटेडने आयपीओद्वारे ६५० कोटींपर्यंत भांडवल उभारण्यासाठी सेबीकडे डीआरएचपी सादर

**मुंबई, २ जानेवारी :** ए-वन स्टील्स इंडिया लिमिटेड ही दक्षिण भारतातील पाच सर्वांत मोठ्या स्टील उत्पादक कंपन्यांपैकी एक कंपनी आहे (कच्च्या स्टील क्षमतेच्या दृष्टीने) आणि १० स्टील उत्पादने व औद्योगिक उत्पादने उत्पादित करणारी एकमेव कंपनी आहे (स्रोत: CRISIL रिपोर्ट). कंपनीने आयपीओसाठी मसुदा रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस बाजार नियंत्रक सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया कडे दाखल केला आहे.

कंपनी आपले भांडवल उभारण्यासाठी प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग द्वारे इक्विटी शेअर्स (प्रत्येकाचे रु. १० दर्शनी मूल्य) ऑफर करण्याचा विचार करत आहे, ज्यामुळे एकूण ६५,००० लाख (६५० कोटी)पर्यंत निधी उभा केला जाईल. (एकूण ऑफर आकार)

एकूण ऑफर आकारात नवीन इक्विटी शेअर्स जारी करून ६०,००० लाख (६०० कोटी)पर्यंत निधी उभारला जाईल (हे नवीन इश्यू) आणि विक्री करणाऱ्या शेअरहोल्डर्सद्वारे ५,००० लाख (५० कोटी) पर्यंत विक्रीसाठी ऑफर केली जाईल (ऑफर फॉर सेल).

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर केले जाणारे इक्विटी शेअर्स BSE लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (लिस्टिंग तपशील)

पीएल कॅपिटल मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि खंबट्टा सिक्युरिटीज लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.


## लोकप्रिय अभिनेता कुंवर विक्रम सोनी झी टीव्हीच्या वसुधामध्ये



**मुंबई, २ जानेवारी :** झी टीव्हीवरील वसुधा ही मालिका तिच्या आकर्षक नाट्य, गुंतागुंतीचे नाते आणि अनपेक्षित वळणांच्या अचूक मिलाफासह प्रेक्षकांना मोहित करत आहे. अलीकडेच, माधवच्या भूमिकेत लोकप्रिय अभिनेता कुंवर विक्रम सोनीच्या प्रवेशाने ह्या मालिकेच्या कथानकात एक रोमांचक नवीन वळण आले.

सर्जनशीलतेची आवड असलेला माधव अनाथ आहे आणि चंद्रिकाच्या (नौशीन अली सरदार) कंपनीत ग्राफिक डिझायनर आणि छायाचित्रकार म्हणून काम करतो. चंद्रिका आणि माधव यांच्या एक विशेष नाते असून तिची आशा आहे की एक दिवस तो वसुधा (प्रिया ठाकूर) शी लग्न करेल. या ताज्या डायनॅमिकने तणाव निर्माण झाला असून चंद्रिका आणि वसुधा यांच्यातील नातेसंबंधांची पुनर्व्याख्या झाली आहे आणि त्यामुळे आता कथानकामध्ये अधिक कारस्थाने आणि भावनिक जटिलता दिसून येणार आहे.

कुंवर विक्रम सोनी म्हणाला, या शोमध्ये भूमिका साकारणे म्हणजे मला माझ्या मुळांकडे परतल्यासारखे वाटत आहे कारण या शोची पार्श्वभूमी राजस्थान असून ती माझी जन्मभूमी आहे. ही माझ्यासाठी अगदी ओळखीची असून इथे माझ्यासाठी नक्कीच एक प्रकारचा सहजपणा आहे. टेलिव्हिजनवर माझे पुनरागमन या मालिकेतील कलाकार आणि क्रू यांच्याकडून मिळालेला आपलेपणा आणि पाठिंबा यांमुळे आणखी खास बनले आहे. मला मी इथल्या कुटुंबाचा एक भाग असल्यासाखा वाटतो. माझी व्यक्तिरेखा माधव हा आजच्या जगात खरोखरच अतिशय खास प्रकारचा आहे. तो एक अशी व्यक्ती आहे जो सचोटी, आदर आणि खरी करुणा पसरवतो. तो नक्कीच एक ग्रीन फ्लॅग आहे. आजकाल असे लोक मिळणे आणि दुर्मिळ गोष्ट आहे. मला प्रिय असलेल्या मूल्यांशी जुळणारे पात्र साकारणे हे नेहमीच माझे स्वप्न राहिले आहे आणि माधवने त्या दृष्टीला मूर्त रूप दिले आहे.

चंद्रिका आणि वसुधाच्या आयुष्यात माधवच्या प्रवेशामुळे, ही मालिका प्रेक्षकांना त्यांच्या टीव्ही स्क्रीन्सना खिळवून ठेवत आहे आणि अनपेक्षित नाट्याने भरलेले हे कथानक प्रदान करत आहे.

## जेव्हा कधी तुम्हांला चांगलं वाटत नसेल तेव्हा रफीजींचे एखादे गाणे ऐका आणि मग पहा सगळं काही ठीक होईल, सांगत आहे मेंटॉर जिगर सा रे ग म पच्या सेटवर



**मुंबई, २ जानेवारी :** झी टीव्हीचा सा रे ग म प भारतातील एक आवडता सिंगिंग रिॲलिटी शो, त्याच्या प्रतिभा, मनोरंजन आणि प्रेरणा यांच्या परिपूर्ण मिलाफाने प्रेक्षकांना मोहित करत आहे. अंतिम फेरीसाठी फक्त एक महिना बाकी असताना, स्पर्धा आता अधिक कडवी झाली आहे आणि अख्खा देश त्यांच्या आवडत्या स्पर्धकांसाठी चीअर करत आपल्या स्क्रीन्सला खिळून राहिले आहेत. सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा यांच्या मार्गदर्शनाखाली, ह्या प्रतिभावंत कलाकारांचे कसलेल्या परफॉर्मर्समध्ये रूपांतर केले जात आहे. ह्या वीकेन्डला दीर्घ प्रतीक्षेतील रेसटूदिफिनाले एपिसोड संगीतप्रेमींसाठी नक्कीच खास असेल कारण ह्या शोमध्ये संगीत उद्योगातील नावाजलेल्या ज्यूरी सदस्यांचे स्वागत केले जाईल.

ह्या एपिसोडमध्ये महान गायक मोहम्मद रफी यांचे उत्कट चाहते असलेल्या मोहम्मद रफी फॅन क्लबमधील सदस्य ह्या सीजनमध्ये मोहम्मद रफी यांची गाणी गाण्यासाठी लोकप्रिय असलेल्या स्पर्धक महर्षींचा सन्मान करण्यासाठी मंचावर उपस्थित झाले आणि अर्थातच त्यामुळे एक हृदयस्पर्शी क्षणाची निर्मिती झाली. त्यांच्या खास विनंतीवरून महर्षींने ना जा कहीं अब ना जा हे गीत गायले.

ह्या चाहत्यांनी मोहम्मद रफी यांच्या काही भावस्पर्शी कथा आणि आठवणीही सांगितल्या आणि महर्षीला रफीजींची स्वाक्षरी असलेली एक दुर्मिळ सीडी भेट म्हणून दिली. ह्या भावुक क्षणामुळे प्रेरित होऊन मेंटॉर जिगरने ह्या महान कलाकाराच्या आपल्या आवडत्या आठवणी सांगितल्या.

जिगर म्हणाला, माझ्या मनात रफी साहेबांच्या अनेक गोड आठवणी आहेत ज्या मला ह्या खास क्षणी सांगाव्याशा वाटतात. माझे चाचा रफी साहेबांच्या सर्वांत मोठ्या चाहत्यांपैकी एक होते, ते रफी साहेबांच्या गाण्यांनी आपल्या दिवसाची सुरूवात करायचे आणि अशा लोकांसोबत काम करायचे जे रफी साहेबांची गाणी गायचे. संध्याकाळी घरी परत येतानाही हेच करायचे. आज मला रफीजींबद्दल जे काही ठाऊक आहे ते सगळं माझ्या चाचांमुळेच. ते नेहमी म्हणायचे की जेव्हा कधी तुम्हांला चांगलं वाटत नसेल तेव्हा रफीजींचे एखादे गाणे ऐका आणि मग पहा सगळं काही ठीक होईल. आज तुझ्या परफॉर्मन्समुळे माझ्या त्या सगळ्या आठवणी परत आल्या. ज्या पद्धतीने तू गायलास, त्यामुळे मी त्या संध्याकाळींच्या आठवणीमध्ये हरवून गेलो जेव्हा मी माझ्या चाचांच्या बाजूला बसून ढोलक वाजवायचो आणि मग आमच्या घरच्या कार्यक्रमांमध्ये आनंदाने ते गायचे. आणि ह्यासाठी मी तुझे एकदा नव्हे तर १००० वेळा आभार मानतो. तू ह्या क्षणाला इतके खास बनवलेस म्हणून तुझे मनापासून आभार.

पहा ह्या सगळ्याच स्पर्धकांचे अफलातून परफॉर्मन्सेस कारण आपल्या स्वप्नांच्या दिशेने ते आणखी एक पाऊल पुढे टाकत आहेत.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस मनोकामना पूर्तीसाठी असेल. घर, दुकान वगैरे खरेदी करताना त्याच्या आवश्यक कागदपत्रांकडे पूर्ण लक्ष द्यावे लागते. नवीन वर्षाची सुरुवात धनलाभाने होईल.

**वृषभ :** आजचा दिवस मध्यम फलदायी ठरणार आहे. व्यवसाय करणा-यांना गुंतवणुकीशी संबंधित बाबींकडे लक्ष द्यावे लागेल. कौटुंबिक कामे वेळेत निकाली काढण्याचा प्रयत्न करावा लागेल.

**मिथुन :** कामाचे नियोजन करावे लागेल.आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुम्ही कोणाकडून पैसे उधार घेण्याचा विचार करत असाल तर ते ही तुम्हाला सहज मिळेल,

**कर्क :** एखादा सदस्य तुमच्याकडे आर्थिक मदत मागू शकतो. आजपासून नवीन वर्षाला सुरुवात झाली आहे. तुमच्यासाठी आज फार लाभदायक असेल. व्यवसायात तुम्हाला आनंददायी बातमी ऐकायला मिळेल.

**सिंह :** एखाद्या अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्यानेच तुम्ही शेअर बाजारात गुंतवणूक केली तरच तो तुम्हाला नफा देऊ शकेल. नवीन प्रकल्प सुरू करण्याची योजना आखू शकता. प्रकृतीकडे विशेष लक्ष द्या

**कन्या :** पण सासरच्या बाजूने कोणाशी भांडण होण्याची शक्यता आहे. तुमचा जीवनसाथी तुमच्याकडे काहीतरी मागू शकतो, जी तुम्ही नक्कीच पूर्ण कराल. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ :** आपल्या बुद्धिमत्तेने आणि विवेकाने कोणत्याही अडकलेल्या ठिकाणी काम सहज पूर्ण करू शकाल. आपण आपल्या योजना पुढे ढकलणे टाळावे, अन्यथा ते आपल्याला नंतर समस्या देऊ शकतात.

**वृश्चिक :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुम्ही जुन्या नोकरीत राहिलात तर ते तुमच्यासाठी चांगले असेल. ब-याच काळानंतर एखाद्या जुन्या मित्राला भेटून आनंद होईल.

**धनु :** आजचा दिवस धकाधकीचा असणार आहे. आर्थिक दृष्टीकोनातून आजचा दिवस तुमच्यासाठी कमकुवत असणार आहे. आई-वडिलांच्या आशीवार्दाने कामाच्या ठिकाणी काही मोठे यश मिळवू शकाल.

**मकर :** कुटुंबातील एखाद्या सदस्याला नवीन नोकरी मिळाल्यास एखाद्या शुभ कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. कुटुंबातील सदस्यांसोबत फिरायला जाऊ शकता. दिवस आत्मविश्वासाने परिपूर्ण असेल.

**कुंभ :** आजचा दिवस खास असेल. मुले तुमच्या अपेक्षा पूर्ण करतील. काही कामामुळे मित्राची मदत घ्यावी लागू शकते. कार्यक्षेत्रात पुरस्कार मिळू शकतो. कुटुंबात सलोख्याचे वातावरण राहील.

**मीन :** आजचा दिवस काहीतरी खास असणार आहे. आपल्याला काही वडिलोपार्जित मालमत्ता मिळू शकते, परंतु काही कामासाठी आपल्याला अधिक धावपळ करावी लागेल.

## नवीन वर्ष, नवीन धमाल फक्त एण्ड टीव्हीवर!

**मुंबई, २ जानेवारी :** एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन आणि भाबीजी घर पर है चे नववर्ष स्पेशल एपिसोड्स प्रेक्षकांना त्यांच्या टेलिव्हिजन स्क्रिन्ससमोर खिळवून ठेवतील. एण्ड टीव्हीवरील मालिका हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडबाबत योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, नववर्षात कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) तिचे प्रिय घर धूळ खात असल्याचे स्वप्न पाहत उठते. यामुळे घाबरून गेलेली ती तिचा मुलगा हप्पू सिंगला (योगेश त्रिपाठी) या स्वप्नाबाबत सांगते. अम्मा खूप वर्षांपूर्वी त्यांचे घर बेकायदेशीररित्या बांधल्याचे देखील कबूल करते, ज्यामुळे हप्पूला धक्का बसतो. ती पुढे सांगते की, तिच्या स्वर्गीय पतीने जुन्या फोटोच्या मागे प्रॉपर्टीसंदर्भात महत्त्वाची कागदपत्रे लपवली होती. अम्मा हप्पूला हा खुलासा गुपित ठेवण्यास सांगते, कारण त्याबाबत थोडेसे संकेत मिळाले तरी त्यांचे घर पाडले जाऊ शकते. पण, आपल्या उत्साहावर नियंत्रण न ठेवत हप्पू हे सिक्रेट त्याची पत्नी राजेशला (गीतांजली मिश्रा) सांगतो. हे ऐकल्यानंतर ती देखील घाबरून जाते आणि तिची बहीण बिमलेशला (सपना सिकरवार) त्याबाबत सांगते. एक अनोळखी व्यक्ती त्यांच्यामधील संभाषण ऐकतो आणि महानगरपालिका अधिकारीला त्यांच्या बेकायदेशीर घराबाबत टिप्स देतो, ज्यानंतर मोठे संकट ओढवते. त्यांच्या दरवाज्यावर घर पाडण्याची नोटीस लावली जाते, ज्यामुळे सिंग कुटुंबामध्ये गोंधळ निर्माण होतो. वणव्याप्रमाणे सर्वांमध्ये भितीचे वातावरण पसरते, ते काहीही करून यावर तोडगा काढण्याचा विचार करू लागतात.''

मालिका भाबीजी घर पर है'च्या आगामी एपिसोडबाबत आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा म्हणाले, कानपूरमध्ये नववर्षाची सुरूवात होताच तिवारी (रोहिताश्व गौड) आपल्या नेहमीच्या विलक्षण शैलीमध्ये सकाळची सुरूवात करतो. तो डोळे बंद ठेवून अंगूरीला (शुभांगी अत्रे) हाक मारतो आणि सांगतो की दररोज सकाळी प्रथम तिचा चेहरा पाहिल्यानंतर दिवस चांगला जाईल. पण त्याने डोळे उघडताच त्याचा फोन वाजतो. दुसरीकडून बोलणारा संतप्त क्लायण्ट त्यांच्यामधील डिल रद्द करतो. घाबरलेला व चिडलेला तिवारी बेडवरून अडखळत बाहेर पडतो, पण धक्का लागून खाली पडतो. रागावलेला तो त्याचा राग बिचाऱ्या अंगूरीवर व्यक्त करतो, ज्यामुळे ती नाराज होते आणि ती गोंधळून जात त्यांच्या लॉनमध्ये एकटी बसून राहते. त्यानंतर, तिवारी लंचदरम्यान अनिताला (विदिशा श्रीवास्तव) भेटतो, ती तिच्या टॅरोट कार्ड वाचणाऱ्या मैत्रिणीने सांगितलेल्या भविष्यवाणीबाबत सांगते. तिच्या जीवनात कोणीतरी नकारात्मक व्यक्ती आहे, ज्यामुळे सतत तिला दुर्दैवाचा सामना करावा लागत आहे.


## आज का अंदाज

शुक्रवार ३ जानेवारी २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | ४ | ५ | ८ | ९ |
| ४८९ | २३९ | ५६६ | ३७८ | १६७ | २४९ | १३४ | १३५ |
| ५६० | ३४७ | १८८ | ११६ | ३५६ | ३४८ | ३५० | ३६० |
| ६७८ | ४५५ | ३४० | ५६७ | २२० | ४४७ | ४५९ | ५६८ |
| १९ | ४९ | ७० | ८० | ४३ | ५३ | ८० | ९० |
| १३ | ४३ | ७६ | ८६ | ४१ | ५१ | ८६ | ९६ |
| १५ | ४५ | ७२ | ८२ | ४७ | ५७ | ८२ | ९२ |

३ जानेवारी: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २४ | ३४ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल, १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४



## चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

जावक क्रमांक :- चंशमनपा/बांध/कार्या-०१/२०२४/४४९८          दिनांक - ०१/०१/२०२५

### निविदा सुचना

आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका, जि. चंद्रपूर यांचे वतीने खालील कामासाठी बी-१ दोन लिफाफा पध्दतीने निविदा पध्दतीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडुन निविदा मागविण्यांत येत आहे. वरील कामाची निविदा केवळ निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहे. सदर कामाचे अटी व शर्ती बांधकाम विभागामध्ये तसेच निविदा सोबत प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| अनु क्र. | कामाचे वर्णन | शेडुल - बी रक्कम | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोरे निविदा प्रपत्र किंमत | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | चंद्रपूर येथिल झोन क्र. ०२ इमारतीच्या पूर्व बाजुच्या लिफ्ट डक्टच्या दुरुस्तीचे काम | ७,९२,५०५/- | रु. ८,०००/- | ५६०/- | ३ महिने |

निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | |
|---|---|
| निविदा विक्री दिनांक | दिनांक ०१/०१/२०२५ से ०१/०१/२०२५ ला दु ४.०० वाजेपर्यंत |
| निविदा सादर करावयाची दिनांक | दिनांक १०/०१/२०२५ सायं. ४.०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडणी दिनांक | दिनांक १३/०१/२०२५ ला साय, ४.०० वाजता शक्य झाल्यास. |

स्वा/-
आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर


# भारतीय स्त्रियांच्या उद्धारक : सावित्रीबाई फुले

डॉ. सौ प्रीती प्रवीण स्थूल

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण सर्वत्र मोठया जल्लोषात साजरा करीत आहोत. भारत आगामी काही वर्षात विश्व गुरु होण्याच्या दिशेने आगेकूच करीत आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात महिला स्वतंत्रपणे आणि समर्थपणे आपला ठसा उमटवत सवतःचे अस्तित्व सिद्ध करीत आहे. अशी सर्व सुखात्मक परिस्थिती असल्याच्या आनंदात आपण मशगुल असताना दुसरीकडे आजही केवळ ४३ टक्के मुलीच पदवी शिक्षणा पर्यंत पोहचत आहे. युनिसेफ ने मार्च २०२२ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सादर केलेल्या अहवालात कोरोना नंतर शाळेत येणाऱ्या मुलींच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे नोंदविले आहे. युनिसेफच्या अहवालालनुसार मुलींच्या उच्च शिक्षणातील प्रमाण घटण्यासाठी प्रामुख्याने तीन करणे आहेत त्यात घरच्यांचा विरोध अथवा घरगुती समस्या,सुरक्षितता व शाळा अथवा शाळेत जाण्यासाठी मूलभूत सुविधांचा अभाव. ही विदारक परिस्थिती २०२२ मध्ये असून ज्या काळी सावित्रीबाई फुले यांनी सर्वप्रथम स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली त्यावेळी स्त्री शिक्षणाचे महत्व जाणणाऱ्या सावित्रीबाई फुले यांची दूरदृष्टी याची नोंद घेतानाच स्त्री शिक्षणाचे महत्व जाणले होते.त्यामुळे सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांना नव्याने मोठी गती देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**शैक्षणिक कार्य :**

सावित्री बाई फुले व ज्योतिराव फुले यांनी पुण्यात तीन शाळा काढल्या. त्याकाळात सुमारे ३०० विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. १८५२ मध्ये इंग्रज सरकारच्या वतीने या कार्यासाठी फुले दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. सावित्री बाई फुले यांनी उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सन्मानित करण्यात आले. १८५५ मध्ये फुले दाम्पत्यांनी गरीब व कामगार वर्गातील लकांसाठी रात्रकालीन शाळा सुरु केली. शाळांमध्ये मुलींची उपस्थिती वाढवण्यासाठी सावित्रीबाई मुलांना त्या काळात स्टायपेंड देत असत. शिक्षणाच्या महत्त्वाबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी तिने पालक-शिक्षकांच्या बैठका घेतल्या.

**सामाजिक कार्य :**

सावित्रीबाई यांनी १८५२ मध्ये महिलांना त्यांचे हक्क, सन्मान आणि सामाजिक समस्यांबद्दल शिक्षित करण्यासाठी महिला सेवा मंडळ सुरू केले.विधवांच्या मुंडणाच्या प्रथेला विरोध करण्यासाठी त्यांनी मुंबई आणि पुण्यात संपही केला होता. १८७३ मध्ये ज्योतिरावांनी सत्यशोधक समाज नावाच्या सामाजिक सुधारणा समाजाची स्थापना केली. सावित्रीबाई त्याच्या सक्रिय सदस्य होत्या. ज्योतिरावांसोबत त्यांनी १८७६ च्या दुष्काळात अथक परिश्रम घेतले आणि महाराष्ट्रात ५२ मोफत भोजन वसतिगृहे सुरू केली होती. १८६३ मध्ये ज्योतिराव आणि सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधक गृह नावाचे भारतातील पहिले बालहत्या प्रतिबंध गृह सुरू केले. गर्भवती ब्राह्मण विधवा आणि बलात्कार पीडितांना मुलांची प्रसूती करण्यात यामुळे मदत झाली.

**ज्योतिराव फुले यांना समर्थपणे साथ :**

१८३१ मध्ये महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सावित्रीबाईंचा, त्यावेळच्या प्रथेप्रमाणे, त्यांचा विवाह अवघ्या नऊ वर्षांच्या ज्योतिरावांशी झाला. ज्योतिराव फुले यांच्या प्रत्येक कार्यात सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत समर्थपणे साथ दिली. जुलै १८८७ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने ज्योतिरावांची उजवी बाजू अर्धांगवायू झाली, त्यावेळी सावित्रीबाईंनी ज्योतिरावांची रात्रंदिवस सेवा केली. त्यामुळे ज्योतिराव बरे होऊन पुन्हा लिहू शकले. या काळात फुले परिवाराचे हितचिंतक मामा परमानंद यांनी त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी खूप प्रयत्न केले. बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात परमानंद यांनी हे जोडपे ज्या ऐतिहासिक कार्यात गुंतले होते त्याची नोंद केली आणि सावित्रीबाईंबद्दल पुढील गोष्टी सांगितल्या, ज्योतिरावांपेक्षा त्यांची पत्नी कौतुकास पात्र आहे. तिची कितीही स्तुती केली तरी वावगे ठरणार नाही. तिच्या उंचीचे वर्णन कसे करता येईल? तिने आपल्या पतीला पूर्ण सहकार्य केले आणि त्याच्याबरोबरीने, त्यांच्या मार्गावर आलेल्या सर्व संकटांचा सामना केला. उच्चवर्णीय उच्चशिक्षित स्त्रियांमध्येही अशी त्याग करणारी स्त्री मिळणे कठीण आहे. या जोडप्याने आपले संपूर्ण आयुष्य लोकांसाठी काम केले आहे.ज्योतिरावांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व शेवटपर्यंत केले. १८९३ मध्ये सासवड, पुणे येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेच्या त्या अध्यक्षा होत्या.

**काव्य लेखन :**

सावित्रीबाई फुले यांच्या कविता आणि इतर लेखन आजही अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत.सावित्रीबाई फुले यांनी जाती आणि लिंगभेदाच्या विरोधात साहित्यातून प्रबोधन केले. सावित्रीबाई फुले यांनी १८५४ मध्ये काव्य फुले आणि १८९२ मध्ये बावन काशी सुबोध रत्नाकर ही दोन पुस्तके लिहिली ज्यात त्यांच्या कवितांचे संकलन आहेत.



मुंढवा गावाबाहेरील महार वस्तीतील पांडुरंग बाबाजी गायकवाड यांचा मुलगा प्लेगने त्रस्त असल्याचे समजताच ती तेथे गेली आणि आजारी मुलाला पाठीवर घेऊन रुग्णालयात दाखल झाली. या प्रक्रियेत तिला हा आजार जडला आणि १० मार्च १८९७ रोजी रात्री ९ वाजता तिचे निधन झाले.

भारतातील पहिली स्त्री शिक्षिका,स्त्रियांना शिक्षणाची कवाडे उघडे करून देणाऱ्या आद्य समाज सुधारक, भारतीय स्त्रीवादाची जननी आणि जन्म व जातीवर आधारित भेदभाव आणि त्यामुळे होणार्याव अन्याय व अत्याचाराच्या विरोधात क्रियाशीलपणे लढा देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे भारतीय स्त्रियांच्या उन्नत्तीत अन्ययसाधारण योगदान आहे. २०२५ मध्येही सावित्री बाई फुले यांचे विचार केवळ प्रासंगिकच नव्हे तर त्यांच्या विचारांचे आचरण करून त्या विचारांवर आधारित कृतिशील कार्य सातत्याने करण्याची गरज आहे. तीच सावित्री बाई फुले यांना खऱ्या अर्थाने आदरांजली ठरेल.

# मनपा कर्मचाऱ्यांपुढे ३ महिन्यांत १६३ कोटी कर वसुलीचे आव्हान

## स्वाती कंपनीकडून डिसेंबर अखेरपर्यंत १६ टक्केच कर वसुली

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २ :

महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाला २०२४-२५ या आर्थिक वर्षात स्वाती कंपनीला १९६ कोटींचे उद्दिष्ट दिले असताना कंपनीने ३१ डिसेंबरपर्यंत ३२ कोटी ७१ लाख रुपयांची कर वसुली केली. हे कर वसुलीचे प्रमाण १६.६९ टक्के एवढे कमी आहे. आता स्वातीचे कंपनीचे कंत्राट रद्द झाल्याने वसुलीची जबाबदारी मनपाच्या कर्मचाऱ्यांवर आली आहे. उर्वरित कर वसुलीसाठी मनपाला केवळ तीन महिन्यांचाच वेळ मिळणार आहे. त्यामुळे मार्च २०२५ अखेरपर्यंत थकीत कराची वसुली करण्यासाठी कसरत करावी लागणार आहे.




नवीन वर्षात १ जानेवारीपासून २०२५ मनपाच्या कर विभागाने कर वसुलीची तयारी सुरू केली आहे. वसुलीसाठी ५२ कर्मचाऱ्यांची तातडीने नियुक्ती केली आहे. २ जानेवारीपासून काम वेगाने सुरू करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांनी कर्मचारी अधिकाऱ्यांच्या बैठकीत बुधवारी दिले.

मालमत्ता कराची वसुली गेल्या वर्षी २०२३-२४ मध्ये ८३ कोटींची वसुली झाली होती. यंदा खासगी कंपनीला कंत्राट देऊनही त्यांची ३१ डिसेंबरपर्यंतची नऊ महिन्यांतील वसुली वसुली ५० कोटींनी कमी म्हणजे ३२ कोटी ७१ लाख रुपये आहे.

त्यामुळे स्वाती इंडस्ट्रीज कंपनीचे कंत्राट मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी ३१ डिसेंबरला रद्द केले. आता निदान गतवर्षीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आगामी जानेवारी ते मार्चअखेरपर्यंत या तीन महिन्यात मनपाच्या कर विभागाला दिवसाची रात्र करावी लागणार आहे. कर वाढीला चालना देण्यासाठी अभय सारख्या योजना तातडीने लागू करण्याची नितांत आवश्यकता आहे. खासगी कंपनीला कंत्राट देण्यापूर्वी दोन वर्षांपूर्वी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या कर वसुलीचे प्रमाण हे खासगी कंपनीच्या तुलनेत जास्त आहे. शिवाय खासगी कंपनीने केलेल्या एकूण वसुलीच्या ८.४९ टक्के रक्कम कमिशनही तिला दिले जाणार आहे.

त्यामुळे महापालिकेने कर वसुलीचे कंत्राट खासगी कंपनीला देऊन मनपाला काहीच फायदा झाला नाही, अशी ओरड वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी नीलेश देव आणि शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक राजेश मिश्रा आणि काँग्रेसचे पदाधिकारी तथा माजी नगराध्यक्ष मदन भरगड यांनीही हा मुद्दा उचलून धरत आंदोलनाच्या माध्यमातून त्याला विरोध केला होता. शिवाय वसुली थकल्याने मनपाच्या तिजोरीत ठणठणाट झाला होता.

# कामानिमित्त आलेल्या नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्या

## रिपाइं आठवले गटाने केली जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मोताळा, दि. २ :

मोताळा तहसील कार्यालयात कामानिमित्त आलेल्या नागरिकांना तहसील कार्यालयाच्या आवारात शौचालय, स्वच्छता गृह तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होतात त्यांच्या अडचणी दुर करण्यासाठी त्यांना तात्काळ सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी रिपाइं आठवले गटाच्या वतीने बुधवारी १ जानेवारी रोजी तहसीलदार यांच्या मार्फत बुलडाणा जिल्हाधिकारी यांना निवेदनातून करण्यात आली आहे.



येथील तहसील कार्यालयात दररोज कामानिमित्त शेकडो नागरिक येतात त्यामध्ये पुरुषांसह महिला सुद्धा असतात त्यांना लघुशंकेची गरज भासल्यास येथे शौचालय तथा स्वच्छता गृह नसल्याने त्यांची कुचंबणा होते. विशेषता महिलांना खूप अडचणी निर्माण होतात तसेच पिण्याच्या पाण्याची सुद्धा सुविधा उपलब्ध नाही त्यामुळे दररोज महिलांना या त्रासाला सामोरे जावे लागत आहे नागरिकांची अडचण लक्षात घेत तात्काळ येथे नागरिकांना या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अन्यथा पुढील ३० दिवसानंतर तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर दत्ता पाटील, तालुकाध्यक्ष बाळासाहेब अहिरे, वर्षा महाजन, अलका जुमडे, रुखमाबाई भुसारी, शोभा तेल्हारकर, जया अहिरे, विमल बोदडे, पंचफुला थाटे, साहिल अहिरे, राजू सरकटे, ज्योती गायकवाड, बेबी अहिरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मृत्यूशी झुंज देत बचावलेल्या अडकने कुटूंबीयांना आ. मांगूळकरांचे आश्वासन

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २ :

पाटीपुरा येथील अडकने कुटुंबियांनी मृत्यूशी झुंज देत एलिफंटा बोटीच्या अपघातातून थोडक्यात बचाव केला आहे. या थरारक घटनेनंतर मंगळवारी दि. ३१ डिसेंबरला आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी त्यांची भेट घेतली आणि त्यांच्या साहसाचे कौतुक करत त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी कुटुंबाला शासनस्तरावरून आवश्यक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.



अडकने कुटुंबीय वास्तू कार्यक्रमानिमित्त मुंबईला गेले होते. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांनी नीलकमल नावाच्या फेरी बोटीने एलिफंटा लेणी पाहण्याचा निर्णय घेतला. मात्र, प्रवासादरम्यान नौदलाच्या स्पीड बोटीने नीलकमलला जोरदार धडक दिली. या अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला. परंतु अडकने कुटुंबीयांनी प्रसंगावधान साधत स्वःताचे प्राण वाचवले. दिनेश अडकने, त्यांची पत्नी नंदा, मुले शुभम आणि संगम, मुलगी वैशाली रा. कुर्ला, मुलगी काजल रा.चंद्रपूर, नातू शार्वीन, भाची नयना मुरमाडकर रा. पांढरकवडा आणि विहीण वनमाला रा.कुर्ला असे या साहसाने बचावलेल्या कुटुंबात एकूण नऊ जणांचा समावेश आहे.

कुटूंबाच्या धैयाचे कौतुक अपघातानंतर आपल्या घरी परतलेल्या अडकने कुटुंबाची विचारपूस करण्यासाठी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली.

# दुचाकीसह पहिल्या माळ्यावरून पडल्याने तरुणाचा जागीच मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. २ :

सर्वत्र नवीन वर्षाच्या स्वागताची तयारी होत असताना एका मद्यधुंद तरुणाचा दुचाकीखाली दबल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. बुधवारी दि. १ जानेवारीला सकाळी ६ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली आहे. अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

किरण वामन गोरे (वय २८) वर्ष रा. कवडीपुर असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. कोडीपुर ग्रामपंचायतीच्या हद्दीत राहणारा किरण गोरे हा मंडप डेकोरेशनचे काम करीत होता. नवीन वर्षानिमित्त श्रीरामपूर येथीलच जुन्या पोलिस चौकीजवळ असलेल्या संकुलात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यात त्याने अती मद्यप्राशन केल्याने त्याची शुद्ध हरवली होती. मध्यरात्रीनंतर कार्यक्रम संपल्यानंतर सकाळी ६ वाजताच्या सुमारास संकुलासमोर असलेली त्यांची दुचाकी काढण्यासाठी गेला असता घटना घडली. या घटनेची माहिती वसंतनगर पोलिसांना मिळताच घटनास्थळ गाठले असता दुचाकी त्याच्या अंगावर पडून होती.

दुचाकीचा एक भाग त्याच्या छातीमध्ये शिरला तोल गेल्याने तो दुचाकीसह पहिल्या माळ्यावरून खालच्या माळ्यावर पडला. या घटनेत त्याची दुचाकी त्याच्याच अंगावर पडली व त्या दुचाकीचा एक भाग त्याच्या छातीमध्ये शिरल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

## गावकऱ्यांच्या तक्रारीची पुरवठा निरीक्षकांकडून चौकशी

**निंगनुर :** येथील बि. के. ठाकूर रास्तभाव दुकानदाराच्या मनमानी कारभाराला कंटाळून तेथील अंत्योदय कार्डधारकांनी उमरखेड पुरवठा निरीक्षकाकडे तक्रार केली होती. तक्रारीची चौकशी करण्यात आली असून अहवाल वरिष्ठांकडे पाठवणार असल्याचे पुरवठा निरीक्षक यांनी तक्रारकर्त्यांना लेखी कळवले आहे. निंगनुर येथे बि.के. ठाकूर यांचे रास्तभाव दुकान आहे. गोरगरिबांना अंत्योदय, बीपीएल योजनेअंतर्गत मिळणाऱ्या धान्याची अफरातफर होत असून गरजू नागरिक शासनाच्या धान्य योजनेपासून वंचित राहत असल्याची लेखी तक्रार ओमप्रकाश घावस, बंडू टारपे, अशोक पोटे, श्रावण गंधारे आदींनी उमरखेड पुरवठा निरीक्षकाकडे केली होती.

# खामगावात वाहतूक कोंडीला वाढणारे अतिक्रमण जबाबदार

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. २ :

नगर पालिका हद्दीतील वाढते अतिक्रमण वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहे. त्यामुळे शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबवण्याची गरज आहे. तसेच पुन्हा त्याच जागेवर अतिक्रमण होवु नये, यासाठी पालिका प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. शहरात वाढत जाणाऱ्या अतिक्रमणामुळे रस्त्याचा श्वास गुदमरला असताना देखील पालीका प्रशासनाकडून कुठलीच कारवाई करण्यात येत नाही. त्यामुळे पालिका प्रशासनास अतिक्रमण हटाव मोहिमेचा विसर पडला की काय, अशी शंका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग नांदुरा रोडवरील पालिकेच्या जुन्या इमारती पासुन ते गो. से. महावद्यालयापर्यंत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले आहे. काही जणांनी तर मिळेल त्या जागेवर अतिक्रमण करुन टपऱ्या टाकल्या आहेत. या टपऱ्या अनेकांनी दुसऱ्यांना भाड्याने दिल्या आहेत. या भाड्यापोटी अनेक जण दरमहा हजारो रुपयाची कमाई करीत आहेत. अतिक्रमणामुळे या मार्गावर होणारी वाहतुक कोंडी नित्याचीच झाली आहे.

अतिक्रमणामुळे या मार्गावर दररोज कुठे ना कुठे अपघाताच्या घटना घडत आहेत. शहरातील नांदुरा रोड, जगदंबा चौक, मेनरोड, फरशी, अग्रसेन चौक, सरकी लाइन, बारादरी, एकबोटे चौक, विकमशी चौक यासह इतर भागात लहान मोठ्या व्यावसायिकांची दुकाने आहेत. त्यामुळे या मार्गावर नागरिकांसह वाहनाची नेहमीच वर्दळ असते. नागरीक दुकानात सामान खरेदी करण्यासाठी जाण्यापूर्वी आपले वाहन दुकानासमोरील रस्त्यावर उभी करतात. याचा त्रास या मागार्ने ये-जा करणाऱ्या वाहनधारकांसह नागरिकांना होत आहे.

# नव्या वर्षातील आकाशातील नवी नवलाई

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २ :

सध्या स्थितीत अत्यंत धावपळीच्या युगात सोयी सुविधा उपलब्ध असताना अवाजवी अपेक्षांचे ओझे घेऊन विविध प्रकारच्या समस्यात मानवी जीव व्यस्त आणि त्रस्त आहे.

दिवस भराच्या या वाढविलेल्या ताण तणावातून काही प्रमाणात मुक्त होण्यासाठी, अनंत विश्वाच्या या पसाऱ्यात सामील होऊन त्याचा आनंद घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे.

प्रगत विज्ञानाच्या काळात विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांद्वारे आकाशातील घडामोडींची माहिती सहज उपलब्ध होत असल्याने जनमानसात नव जागृती व कुतूहल निर्माण होत आहे.

नववर्ष २०२५ मधील विशेष घटनांमध्ये चंद्र-सूर्य ग्रहणे,उल्कावर्षाव, धुमकेतू, ग्रह ताऱ्यांची युती- प्रतियुती ग्रह दर्शन,त्यांचे उदयास्त, राशी भ्रमण, सुपरमून व आकाशातील विविध दिन विशेष यात सहभागी होता येईल.

ग्रहणे व युती-प्रतियुती नव्या वर्षात सूर्य चंद्राची दोन दोन अशी एकूण चार ग्रहणे असुन यापैकी फक्त एकच ७ सप्टेंबर रोजी होणारे खग्रास चंद्रग्रहण सुमारे साडेतीन तास बघता येईल. मार्च १४ चे खग्रास चंद्रग्रहण, २९मार्च आणि २१ सप्टेंबरचे खंडग्रास सूर्यग्रहण मात्र भारतात दिसणार नाही.

चंद्र आणि ग्रह यांची युती दरमहा घडत असुन ग्रह व ग्रहांची युती एक अनोखी अनुभूती देते.अशी स्थिती १८ जानेवारीला पश्चिमेस शूक्र व शनी, २५ फेब्रूवारीला बुध व शनी,११ मार्चला बुध व शूक्र,१० व २५ एप्रिल रोजी अनुक्रमे बुध व शनी,शूक्र आणि शनी,८ जुनला बुध व गुरु,१४ ऑगष्टला गुरु आणि शूक्र एकमेकांच्या जवळ पाहता येतील.

आकाशात प्रकाश उत्सव अर्थात उल्का वर्षाव तुटणाऱ्या ताऱ्यांच्या स्वरूपात दिसणाऱ्या विविधरंगी उल्का वषारंभी ३ जानेवारी,२२ एप्रिल,५मे, २८जुलै,१२व १३ ऑगष्ट, ५,१२ व १७ नोव्हेंबर,१४ व २२ डिसेंबरच्या रात्री या आकाश दिवाळीत सहभागी होता येईल. सुपरमून आणि आकाश दिनविशेष पौर्णिमेला जेव्हा पृथ्वीपासून चंद्र जवळ असतो तेव्हा चंद्रबिंब मोठ्या आकाराचे व अधिक प्रकाशित दिसते, अशी स्थिती यावर्षी ७ आक्टोबर, ५ नोव्हेंबर आणि ५ डिसेंबर च्या रात्री बघता येईल. यातील कार्तिक पौर्णिमेला या वषार्तील सर्वात मोठा व अधिक प्रकाशमान चंद्र असेल. पृथ्वी सूयार्भोवती लंबवतुळाकार फिरताना या दोन्हीतील अंतर कमी अधिक होत असते.येत्या ४ जानेवारीला हे अंतर १४कोटी ७० लाख कि.मी. एवढे राहील तर ४ जुलैला हे अंतर १५कोटी २० लाख कि.मी.असेल. ऋतू बदलात चार दिवस अधिक महत्त्वाचे असतात. यापैकी २० मार्च व २२ सप्टेंबर या वसंत आणि शरद संपात दिनी सूर्य नेमका पृथ्वीच्या विषुववृत्तावर असल्याने दिवसरात्र समान असतात. तसेच २१ जून व२१ डिसेंबर या अयनदिनी सूर्य अनुक्रमे उत्तर व दक्षिण गोलार्धाकडे झुकलेला असतो.

चंद्र,ग्रह सूर्य राशी बदल आकाशात चंद्र,सूर्य आणि ग्रह फिरतात त्याला आयनिकवृत्त किंवा राशीचक्र म्हणतात .या मार्गावरील ताऱ्यांच्या आकृती वरुन राशींची नावे असुन यात, चंद्र एका राशीत सव्वा दोन दिवस, सूर्य आणि शूक्र एक महिना तर गुरु ग्रह एक वर्ष व शनीस अडिचवर्षे लागतात.येत्या २९ मार्चला शनी ग्रह कुंभ राशीतून मीन राशीत तर गुरु ग्रह १४ मेला वृषभ राशीतून मिथुन राशीत येईल.

ग्रहांचे उदयास्त आणि दर्शन गुरु व शूक्र या ठळक ग्रहांच्या अस्ताला चांदणी बुडी म्हणतात. सध्या पश्चिमेस तेजस्वी शूक्राचा अस्त १९ मार्चला, पुढे पूर्वोदय २६ मार्च होईल.नंतर १३ डिसेंबरला पूर्वेस अस्त आणि सध्या पूर्वेस दिसणाऱ्या गुरुचा अस्त १३ जुनला तर पूर्वोदय पहाटे ६ जुलैला होईल.मंगळ ग्रहाचा ६ नोव्हेंबरला पश्चिमेस अस्त तसेच सध्या पश्चिमेस दिसणाऱ्या शनी ग्रहाचा अस्त २७ फेब्रुवारीला होऊन ३१ मार्च रोजी पूर्वेस उदय होईल परंतु पृथ्वी, शनी आणि सूर्य यांच्यातील कोनीय बदलामुळे शनी ग्रहाचे वलय दूर्बिणीतून दिसणार नाही.तसेच दक्षिण आकाशात दिसणारी रंगीबेरंगी अगस्त्य तारका १५ मे रोजी अस्त होऊन ९ ऑगष्टला उदय पावेल. धुमकेतू व लघुग्रहाचे पृथ्वीसान्निध्य सूर्य कुलाचेच घटक असलेले धुमकेतू मे आणि जून मध्ये पृथ्वी जवळ येतील पण सूर्यमालेतील ग्रह आणि प्रगत अवकाश तंत्रज्ञानामुळे आपण सुरक्षित असु. या शिवाय संपूर्ण महाराष्ट्रात ३ मे पासून ३१ मे पर्यंत दक्षिणोत्तर सरकणारे शून्य सावली दिवस आणि मानव निर्मित इंटरनॅशनल स्पेस स्टेशन, महाकाय हबल दुर्बीण, स्टारलिंक ई.सारखे आकाश नजारे अधुनमधून बघायला मिळतील.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MAHESH BABURAO GHUGUSKAR.** NOW MY NEW NAME IS **MAHESH BABURAO GHUGHUSKAR.**
**ADD :** WARD NO 4 NAVEGAON ROAD MANDHAL NAGPUR - 441210

MY OLD NAME WAS **PRAVESH-KUMAR GAHLOD.** NOW MY NEW NAME IS **PRAVESH GAHLOD.**
**ADD :** 10, PRSHANT NAGAR NAGPUR 440015

MY OLD NAME WAS **SAIMAFIR-DOS.** NOW MY NEW NAME IS **SAIMA YUNUS KHAN PATHAN.**
**ADD :** PLOT NO.102/2,PENSION NAGAR,POLICE LINE TAKLI, KATOL ROAD, NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **AZEE-MUSHSHAN MUNAZZAM SHEIKH NAZIR AHMED.** NOW MY NEW NAME IS **AZIMUSHSHAN NAZIR SHEIKH.**
**ADD :** NR KHWAJA TELECOM, SANJIVANI COLONY,YASHOD-HARA NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **REVATI PANDE.** NOW MY NEW NAME IS **REWATI SATISH PANDE.**
**ADD :** PLOT NO 83, WARDHA ROAD, OPP SONEGAON POLICE STATION KHAMLA, NAGPUR 440025

MY OLD NAME WAS **ABDUL RAJJAK FAJALANI.** NOW MY NEW NAME IS **RAJJAK SAT-TAR FAJLANI.**
**ADD :** BHAUSING NAGAR, ARNI, YAVATMAL, MAHARASH-TRA - 445103

# समर्थ कृषी महाविद्यालयामध्ये बँकिंग क्षेत्रातील नोकरीबाबत कार्यशाळा यशस्वी




■ महासागर प्रतिनिधी
देऊळगावराजा, दि. २ :

येथील समर्थ कृषी महाविद्यालयात बँकिंग क्षेत्रात कृषी पदवी नंतरच्या नोकरी संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा पार पडली.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सचिव सतीश कायंदे होते. प्राचार्य डॉ. नितीन मेहेत्रे, सारथी एज्युकेशनचे संचालक सिद्धेश्वर कोंघे, व्यवस्थापक संजित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष सतीश कायंदे यांनी यावेळी कृषी क्षेत्रात असणाऱ्या सरकारी नोकऱ्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सिद्धेश्वर कोंघे यांनी कृषी विषयात पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रात असणाऱ्या नोकऱ्या, त्यांचा अभ्यास तसेच कोणत्या नोकरीसाठी कृषी पदवी घेतलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात याबाबत मार्गदर्शन केले.

**महानिर्मिती**

**इ-निविदा सूचना**
**क्र.ना.औ.वि.कें/२०२४-२५/४३**

| अ. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३०००५३५९९ / सीएचपी | विविध कोळसा ट्रान्सफर च्युटसच्या देखभालीसाठी वार्षिक कामाचे कंत्राट. | ९४,९८,९७२/- / ९८,४९०/- |
| २. | ३०००५३६२४ / सिव्हिल | सर्व्हिस बिल्डिंग, स्टेज २ येथे ३० मीटर उंचीवरील कोसळलेले आरसीसी पाण्याच्या टाकीचे स्ट्रक्चर हटविण्याचे काम. | ७,२४,५५२/- / १०,७५०/- |
| ३. | ३०००५३८६३ / ओडीपी | मुख्य भांडार क्षेत्र येथे एनसीसीसी तंत्रासह एचडीआयएस आणि एचजीडीएफ कंपाऊंड प्रदान करणे आणि लागू करण्याचे काम. | १,८५,२५,०००/- / १,८८,७५०/- |
| ४. | ३०००५३८५५ / टीएम | रेफ्रिजरंट प्रकारचे कॉम्प्रेस्ड एअर ड्रायर ३ ए (मॉडेल-सीएस १५०० २-१-ए-पी ) स्पेअर्सच्या पुरवठ्यासह पुर्नसंचयित करणे. | ९,३५,०१८/- / १२,८५० |
| ५. | ३०००५३८६५ / टीएम | युनिट क्र ३,४ आणि ५ तसेच सीओएच दरम्यान आवश्यक असलेल्या ग्लॅण्ड पॅकिंग रोप्स आणि बॉनेट सील रिंग्जचा पुरवठा. | १,१०,२१८/- / ३,३१०/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

**कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी**
**त. हिंगणा, जि. नागपूर**

दूरध्वनी क्र.: ९८२३५१४९९५ ई-मेल : mewanadongari2016@gmail.com

पत्र क्र. : नपवा/स्व. विभाग / ११ / २४-२०२५ दि.: ०२/०१/ २०२५

**जाहीर सूचना**

**नायलॉन व सिंथेटिक मांजा बंदीबाबत**

या जाहीर सुचनेद्वारे शहरातील सर्व व्यावसायिक व नागरिक यांना सूचित करण्यात येते की, प्लास्टिक / सिंथेटिक पासून बनविलेल्या नायलॉन मांजाव्दारे पक्षी व मानवी जीवितास दुखापती होत असल्याने अशा मांजाचे उत्पादन, वापर व विक्रीस मा. हायकोर्ट यांचे Suo Motu PIL No. 01/2021 मधील आदेशानुसार मा. शासनाने पर्यावरण संरक्षण कायदा अधिनियम १९८६ कलम ४ अंतर्गत प्रवान केलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना निर्गमित करुन प्रतिबंध करण्यात येत असलेचे निर्देश पारित केलेले आहेत.

तरी नगर परिषद वानाडोंगरी क्षेत्रातील सर्व नागरिकांना सुचीत करण्यात येते की, व्यावसायीकांना व नागरिकांना प्लास्टिक सिंथेटिक पासुन बनविलेल्या नायलॉन मांजाचा वापर, उत्पादन, साठा व विक्री करू नये, आस्थापना / दुकाने तपासणी मध्ये अशा प्रकारच्या नायलॉन मांजाचा वापर, उत्पादन व विक्री करीत असलेचे निदर्शनास आल्यास संबंधिता वर रु. ५०००/- दंड व साहित्य जप्ती तसेच सदर नियमांचा भंग करणाऱ्या संबंधिता वर उचित कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



## ओढ अंतरीची

*आधुनिक सुखसोयींनी संपन्न असणाऱ्या शहरांमध्ये वास करण्याकडे माणसाचा ओढा वाढला आणि काँक्रिटच्या जंगलात राहण्याची सवयच लागली. पण आजही निसर्गाचा शेजार जपणारी अशी टुमदार वस्ती पाहिली की अंतर्मन तिकडे झेपावू लागतं. दृष्टी पडेल तिथपर्यंत दिसणाऱ्या त्या सौंदर्यखुणा टिपण्यासाठी नजर भिरभिरु लागते. तिथली शांतता मनाच्या गाभाऱ्यात भरुन उरते, आपल्याला श्वासाची लय जाणवू लागते आणि तिथेच स्वत:ची स्वत:शी रम्य भेट होते...!*

# कॅलिडोस्कोप

## सरकारी कर्मचाऱ्यांना डेस्कवर उभे राहण्याची शिक्षा!

वृद्ध व्यक्ती सरकारी कार्यालयात गेल्यानंतर तिला तास न् तास उभे राहायला लावले, तर संताप येणारच. सामान्यत: सरकारी कार्यालयांमध्ये असे दिसून येते, की कर्मचारी लोकांच्या समस्या उशिरा ऐकतात आणि त्यांना त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी तास न तास वाट पहावी लागते; पण नोएडामधील एका सरकारी विभागाच्या कर्मचाऱ्यांना एका वृद्ध व्यक्तीसोबतचे असे वागणे महागात पडले.

एका आयएएस अधिकाऱ्याला सरकारी कार्यालयात तास न तास उभे राहावे लागल्याची माहिती मिळाली. सीसीटीव्हीद्वारे तक्रारीची पुष्टी झाली तेव्हा अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि सर्व कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे राहण्याची शिक्षा दिली. एका वृद्ध व्यक्तीला बराच वेळ थांबवल्यानंतर सुमारे १६ कर्मचाऱ्यांना त्यांच्या जागेवरून उठून त्यांच्या डेस्कवर २० मिनिटे उभे राहण्यास सांगण्यात आले. ही घटना नोएडाच्या निवासी भूखंड विभागात घडली. तिथे एका वृद्ध व्यक्तीचे ऐकले नाही आणि त्याला बराच वेळ वाट पाहण्यास लावल्याबद्दल कर्मचाऱ्यांना शिशा सुनावण्यात आली.

आयएएस अधिकारी डॉ. लोकेश यांच्या लक्षात आले, की कर्मचारी एका वृद्धाला तास न तास थांबून ठेवत आहेत. त्यांनी या कर्मचाऱ्यांना २० मिनिटे उभे करून वृद्ध व्यक्तीला कसे थांबवले आहे, याची जाणीव करून दिली. लोकेश यांनी सांगितले, की सीसीटीव्हीमध्ये त्यांना दिसले, की कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीच्या मालमत्तेशी संबंधित प्रश्न सोडवला नाही आणि त्याला सुमारे एक तास उभे ठेवले. विभागाच्या कार्यालयात आल्यावर वृद्ध व्यक्तीची समस्या लगेच ऐकली जात नाही, हे पाहून लोकेश यांनी या सर्वांना शाळेत मुलांना उभे राहण्याची शिक्षा दिली जाते, तशीच शिक्षा करण्याचे आदेश दिले. त्यांचे आता कौतुक होत आहे.





## मोरांच्या प्रेमापोटी...

ओरिसातल्या कटकजवळ एका डोंगराच्या पायथ्याशी वसलेलं सिद्धेश्वर फायरिंग रेंज पिकॉक व्हॅली म्हणून ओळखलं जातं. १९९९ मध्ये ओरिसात मोठं वादळ आलं होतं. त्यावेळी तीन मोर जखमी अवस्थेत या परिसरात आले. पन्नू बेहरा नामक व्यक्तीने या मोरांची खूप सेवा केली. त्यानंतर या परिसरात मोरांचा वावर वाढला. त्यांची संख्या ६० पर्यंत पोहोचली. आज या भागात १२० च्या आसपास मोर आहेत. पन्नू बेहरा आज या जगात नाहीत. मात्र त्यांचा नातू कान्हू बेहरा आता ही जबाबदारी सांभाळत आहे. मोरांप्रती असलेल्या प्रेमापोटी कान्हूने चांगल्या कंपनीतली नोकरी नाकारली. मात्र सरकारने त्यांना नोकरी दिली. कान्हूचा आवाज ऐकताच मोर या भागात येतात. पन्नू या भागात होमगार्डचं काम करायचे. त्याच्या मृत्यूनंतर साधारण दहा दिवस मोर फिरकलेच नाहीत. पन्नू यांना आजारपणातही मोरांची काळजी सतावायची. त्यांनी ही जबाबदागी नातू कान्हूवर सोपवली. मोरांच्या अन्नपाण्याचा दिवसाचा खर्च ५०० रुपये आहे. सकाळी ६ ते ८ आणि दुपारी ३ ते ५ या वेळेत तो मोरांना दाणापाणी देतो. कान्हूला मार्च महिन्यात होमगार्डची जबाबदारी देण्यात आली. पदवीधर कान्हूला एक कंपनीकडून १८ हजार रुपये पगाराच्या नोकरीचा प्रस्ताव आला होता. मात्र मोरांच्या सेवेसाठी त्याने ही नोकरी नाकारली. कान्हूचं करावं तेवढं कौतुक कमी आहे.

## काय सांगतोय हॉर्न?

धुरांच्या रेषा हवेत सोडणाऱ्या झुकझुक गाडीशी आपली लहानपणीच ओळख होते. गाडीने हॉर्न दिला की आपण चढतो. मात्र प्रत्येक कारणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने हॉर्न वाजवले जातात. मोटरमन आणि गार्डला एकमेकांशी ताळमेळ बसवता यावा यासाठी प्रत्येक हॉर्न वेगळा असतो. यातला फरक आपल्याला कळत नाही. पण गार्डला हॉर्नचा अर्थ बरोबर कळतो. मोटरमनने एकदाच छोटा हॉर्न दिला तर गाडी यार्डमध्ये जाण्यासाठी तयार असल्याचं समजलं जातं. दोन वेळा छोटा हॉर्न वाजवून चालक गार्डकडे गाडी सुरू करण्याची परवानगी मागत असतो. ट्रेन सुरू असताना तीन वेळा छोटा हॉर्न वाजवला तर चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटलं आहे असं समजावं. यानंतर गार्ड आपल्या डब्यातल्या व्हॅक्युम ब्रेकचा वापर करतो. अचानक गाडी थांबल्यानंतर चालकाने चार वेळा हॉर्न दिला तर गाडीचं इंजिन खराब आहे किंवा गाडी पुढे नेता येणार नाही असं समजलं जातं. चालकाने एकदा मोठा आणि त्यानंतर छोटा हॉर्न दिला तर गार्डने गाडी सुरू होण्याआधी पुन्हा एकदा ब्रेक पाईप सिस्टिमची तपासणी करायची असते. सतत बराच काळ हॉर्न वाजवला जात असेल तर गाडी कोणत्याही स्थानकावर न थांबता पुढे जाणार असल्याचं समजलं जातं. चालकाने सहा वेळा छोटा हॉर्न वाजवला तर तो पुढे दिसत असलेल्या धोक्याचा संकेत असतो.





## भीतीदायक ठिकाणं

या जगात भन्नाट ठिकाणांची कमतरता नाही. काही ठिकाणी आपण जाऊ शकत नाही इतकी ती भयानक असतात. ब्राझीलमध्ये साओ पालो बेटाला स्नेक आयलंड म्हणूनही ओळखलं जातं. इथे असंख्य साप आढळतात. या बेटावर एवढे साप कधी आणि कसे आले हे कोणालाच माहीत नाही. इथे प्रत्येक चौरस मीटर परिसरात पाच साप आढळतात. सापांच्या प्रचंड संख्येमुळे या बेटावर यायला लोक खूप घाबरतात. इथले साप खूप विषारी असतात.

जपानमधल्या ओकिघारामध्ये सुसाइड फॉरेस्ट नावाचं एक ठिकाण आहे. २००२ मध्ये या ठिकाणी ७८ लोकांनी आत्महत्या केली होती. हे जंगल माउंट फुजीच्या पायथ्याशी वसलं आहे. इथे अनेक लोक आत्महत्या करतात. आत्महत्या केलेल्या लोकांचे मृतदेह नेण्यासाठी स्थानिक पोलिसांना विशेष अभियान राबवावं लागतं.



## लेहंगा घालून नववधू स्पोर्टस् बाईकवर!

लेहेंगा घातलेली नववधू स्पोर्टस् बाईक भरधाव वेगात चालवत असल्याचे पाहून आश्चर्याचा धक्का बसेल ना? परंतु, खरोखरच नववधू लेहेंगा परिधान करून भरधाव वेगात दुचाकी चालवताना दिसली. नवरीची ही स्टाईल पाहून अनेक जण आश्चर्याने पाहतच राहिले. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये वधूच्या जवळून जाणाऱ्या वाहनांमधून प्रवास करणारे लोक कॅमेरे काढून व्हिडीओ बनवत आहेत. जणू त्यांनी जगातील आठवे आश्चर्य पाहिले आहे. व्हिडीओमध्ये वाजत असलेले 'फिर भी ना मिला सजना' हे गाणे वधूच्या लूकला आणि शैलीला खूप शोभते. दबंग वधूच्या या स्टाईलने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि आता लोक इंटरनेटवर याबद्दल चर्चा करत आहेत. नववधू आपला वर राजा म्हणजेच साजनला शोधण्यासाठी निघाली आहे. लाल लेहेंगा आणि रोअरिंग स्पोर्टस्? बाईक वधूच्या सौंदर्यात आणि वर्चस्वात भर घालताना दिसतात.



नववधूने लेहेंगा घालून बाइक चालवण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही तिने आपल्या वराला बुलेटवर बसवून फिरवले होते. हा व्हिडीओ आतापर्यंत ८३ लाखांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे आणि व्हिडीओला दोन लाख ९६ हजारांहून अधिक वेळा लाईकदेखील करण्यात आले आहे. एका यूजरने लिहिले, 'दबंग वधूला पाहून मला गरीब वराची दया येते!'

## हात दाखवून भरता येते बील!

भारतातील बहुतेक दुकाने आणि मॉल्समध्ये ऑनलाइन पेमेंट पर्याय उपलब्ध आहेत. गेल्या काही वर्षांत भारतातील प्रत्येक गावात ऑनलाइन पेमेंट आणि कॅशलेस तंत्रज्ञानाचा प्रसार झाला आहे; पण आजही भारत या बाबतीत आपला शेजारी देश चीनपेक्षा ५० वर्षे मागे आहे. चीनमध्ये क्यूआर पेमेंट आता भूतकाळातील गोष्ट बनली आहे, तर चीनी लोकांनी फार पूर्वीच त्यांच्या खिशात कार्ड आणि रोख ठेवणे बंद केले आहे. बहुतेक दुकानांमध्ये क्यूआर कोडही नसतात. चीनमध्ये फक्त हात दाखवून बँकेतून पैसे कापले जातात. चीनमध्ये केवळ हात दाखवून पैसे दिले जात आहेत. अलीकडेच, 'सोशल मीडिया'वर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात एक व्यक्ती चायनीजच्या दुकानात ताडीने पेमेंट करत आहे, म्हणजे फक्त हात दाखवून पैसे देत आहे. चीनमधील कोणत्याही दुकानातून खरेदी करता, तेव्हा तेथे बसवलेले स्कॅनर मशीन हात स्कॅन करते, त्यानंतर सर्व बँक तपशील दुकानदाराकडे नोंदणीकृत होतात, त्यानंतर त्या दुकानातून फक्त हात दाखवून वस्तू खरेदी करू शकता. स्कॅनरसमोर हात ठेवताच ती रक्कम आपोआप तुमच्या खात्यातून कापली जाईल आणि दुकानदाराच्या खात्यात हस्तांतरित केली जाईल. अशा प्रकारे यंत्रणा कार्य करते व्हिडीओमध्ये असे सांगण्यात आले आहे की, पेमेंट करण्यासाठी तुम्हाला स्टोअरमध्ये जाऊन फक्त तुमचा हात दाखवावा लागेल. त्यानंतर हात स्कॅन करून स्टोअरमध्ये नोंदणीकृत होईल, त्यानंतर तुम्ही त्या स्टोअरच्या कोणत्याही शाखेत फक्त दाखवून पेमेंट करू शकता. तुझा हात करू शकतो. 'सोशल मीडिया'वर व्हायरल पेमेंट बनवण्याचे हे तंत्र खूप मथळे मिळवत आहे. चीनची ही प्रगती पाहून इंटरनेट वापरकर्तेही आश्चर्यचकित झाले आहेत. हा व्हिडीओ शेअर झाल्यापासून लाखो लोकांनी तो पाहिला असून ५ लाख ७८ हजारांहून अधिक वेळा या व्हिडीओला लाईक करण्यात आले आहे.




## लग्नाचा फोटो फाडून घटस्फोटाची पार्टी

एखाद्या तरुणीचे लग्न होते, तेव्हा तिच्या चेहऱ्यावरील आनंद निराळाच असतो. गालावर लाजेची लाली पाहायला मिळते, आपल्या आयुष्याची नवी सुरुवात म्हणून ती खूप उत्साही असते. मुलींच्या चेहऱ्यावरील लग्न झाल्याचा आनंद सगळ्यांनीच पाहिलेला असतो; परंतु घटस्फोटाचा आनंद साजरा करण्याची काही उदाहरणे अलीकडे अनुभवायला मिळत आहेत.

'सोशल मीडिया'वर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात एक महिला घटस्फोटाचा आनंद साजरा करताना दिसत आहे. घटस्फोटानंतर महिला केक कापताना आणि तिच्या लग्नाचा फोटो फाडताना दिसत आहे. घटस्फोटाचा आनंद साजरा करणाऱ्या महिलेने केक कापला. केकवर 'हॅपी घटस्फोट' लिहिले आहे. पतीपासून विभक्त झाल्यानंतर स्त्रीच्या चेहऱ्यावर लग्नाच्या वेळी दिसणारा आनंद कधीच हिरावून बसतो; मात्र या महिलेने अगदी विरुद्ध काम केले. घटस्फोटाचा आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

महिलेने आधी 'हॅप्पी डिव्होर्स' केक कापला. नंतर कात्रीने लग्नाचा ड्रेस कापला आणि नंतर लग्नाचा फोटो फाडला. हे सर्व करताना ती खूप आनंदी दिसत होती. महिलेने कापलेला ड्रेस हा तिचा लग्नाचा पोशाख आहे. २०२० मध्ये महिलेचे लग्न झाले. त्यांचे नाते चांगले नव्हते आणि २०२४ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. अवघ्या चार वर्षातच दोघेही वेगळे झाले. पार्टीच्या सेलिब्रेशनमध्ये महिलेचा आनंद पाहून नेटकऱ्यांनी भरभरून कमेंट्स दिल्या आहेत.




## आंब्याच्या पानांपासून मद्य

ग्वाल्हेरच्या जीवाजी विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनी आंब्याच्या पानांपासून मद्य तयार केलं आहे. यात आठ ते बारा टक्क्यांपर्यंत अल्कोहोल असेल. अर्थात हे मद्य आरोग्यासाठी लाभदायी ठरणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या मद्यामुळे मधुमेहावर नियंत्रण मिळवता येईल, असा दावा केला जात आहे. यासोबतच शरीरातले फॅट्स कमी करून रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यासाठीही हे मद्य उपयुक्त ठरू शकतं. हे मद्य तयार करण्यासाठी ४५ ते ५० दिवसांचा कालावधी लागला. यासाठी ग्लुकोज, कर्बोदकं आणि पेप्टॉन प्रोटिन्सचा वापर करण्यात आला. हे मद्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठ्या कंपनीसोबत करार करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. आंब्याच्या पानांमध्ये मँगो फेरीन नावाचा घटक असतो. आपलं आरोग्य राखण्यात या घटकाचा महत्त्वाचा वाटा असतो. आंब्याची पानं बारा महिने उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही हंगामात हे मद्य तयार करता येईल. येत्या काळात हे मद्य औषध म्हणून वापरलं गेलं तर आश्चर्य वाटायला नको.



## लिंबांवर हजारो रुपयांची बोली!

लिंबू गुणकारी आहे ही बाब कोणीही अमान्य करणार नाही. उन्हाळ्यात लिंबू महाग होत असले तरी ते विकत घेण्यासाठी कोणी काही हजार रुपये खर्च करणार नाही. मात्र देवळात अर्पण केलेल्या लिंबासाठी एका जोडप्याने २७ हजार रुपये मोजले. लिंबाच्या लिलावातून मंदिर प्रशासनाला ६८ हजार रुपये उत्पन्न मिळालं. तमिळनाडूमधल्या एका मंदिरात देवाला काही लिंबू अर्पण करण्यात आले होते. या मंदिरात पंगुनी उथीराम फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. ११ दिवस हा महोत्सव सुरू असतो. यावेळी देवाला अर्पण केलेल्या नऊ लिंबाचा लिलाव करण्यात आला. पहिल्याच लिंबासाठी एका दांपत्याने २७ हजार रुपयांची बोली लावली. त्यांनी हे लिंबू खरेदीही केलं.

गेल्या अनेक वर्षांपासून मंदिरात ही परंपरा सुरू आहे. देवळात अर्पण केलेले लिंबू खूपच पवित्र मानले जातात. दैवी महत्त्व लक्षात घेऊन लोक त्यांची खरेदी करतात. हे सगळं ऐकल्यावर लिंबाना एवढी किंमत मिळत असल्याचं बघून आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय रहाणार नाही.



## चोरीचे पैसे परत मागितल्यावरून झाला वाद

# धावत्या दक्षिण एक्सप्रेसमध्ये प्रवाशाचा खून

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

हैदराबादकडून दिल्लीकडे जात असलेल्या दक्षिण एक्सप्रेसमध्ये एका प्रवाशाचा सहप्रवाशांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला. नागपूर लोहमार्ग पोलिसांनी चारही आरोपींना अटक केली आहे. पुढील तसास सुरू आहे.

दक्षिण एक्सप्रेसच्या सर्वसाधारण डब्यातून प्रवास करीत असलेल्या सशांखला (वय २१) चौघांनी मारहाण केली. त्याला गंभीर दुखापत झाली. तो बुशुद्ध झाला आणि मृत पावला. ही घटना धावत्या गाडीत गुरुवारी रात्री ३ च्या सुमारास घडली. रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेशातील लखिमपूर खैरी येथील सशांख हा एका मित्रसोबत प्रवास करीत होता. त्याच डब्यात हैदराबाद येथून नागपूरला चौघेजण येत होते.

मध्यरात्री प्रवाशी झोपेत असताना आरोपींनी काही प्रवाशांचे मोबाईल फोन आणि पैसे चोरी केले. हे बघून सुशांखने हटकले. त्यामुळे संतापलेल्या आरोपींनी सुशांकला जबर मारहाण केली. त्यामुळे तो बेशुद्ध झाला. एका आरोपीने सशांखच्या पोटावर जोरदार बुक्की मारली. त्यामुळे त्याला उलटी झाली आणि तो बेशुद्ध पडला.

बल्लारशाह ते नागपूरच्या दरम्यान तो निचपत पडला होता. या घटनेमुळे इतर प्रवासी घाबरले. कोणीही सुरक्षा यंत्रणेला कळवले नाही. बल्लारपूरच्या आधीच ही घटना घडली होती. गुरुवारी सकाळी नागपूर रेल्वे स्थानकावर ही गाडी पोहचली.



त्यानंतर गस्तीवरील रेल्वे सुरक्षा दलास माहिती देण्यात आली. लोहमार्ग पोलीस आणि आरपीएफने मृतदेह ताब्यात घेतला आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवले. आरोपी हैदराबादहून नागपूर येत होते. ताजाबाद येथे दर्शनाला येत असल्याचे आरोपींनी पोलिसांना सांगितले.

हैद्राबादहून दिल्लीला जाणाऱ्या दक्षिण एक्सप्रेच्या जनरल डब्यामध्ये शशांक रामसिंग राज हा सिकंदरा ते झासी असा प्रवास संडासच्या दाराजवळ बसून करीत होता. पहाटे ३.३० च्या सुमारास मृतक शशांक रामसिंग राज याला बसल्या बसल्या झोप लागली. त्या दरम्यान मो. फैयाज वल्द मो. हाशीमुदीन (वय १९), सैयद समीर वल्द सैयद जीमल (वय १८), एम. शाम कोटेश्वर राव (वय २१) व मो. अमान मो. अकबर (वय १९, सर्व हैद्राबाद) या चौघांनी त्याच्या खिशातून रोख १७०० रुपये काढून घेतले. नंतर ते शशांक रामसिंग राज याच्या सोबत्याच्या खिशातून मोबाईल काढीत असताना सोबत्याला जाग आल्याने त्याने मोबाईल परत घेतला. शशांक रामसिंग राज याला जाग आली. आपली रोख रक्कम चोरीला गेल्याचे समजताच त्याने चारही संशयीतांना पैसे मागितले असता, चौघांनीही शशांक राज याला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात रक्ताची उलटी झाल्याने जागीच मृत्यू झाला.

नागपुरात सध्या अशा घटनांत वाढ होत आहे. दोन दिवसांपूर्वी गांधीबाग एरीयात ७०० ते ८०० रुपये उधारीच्या पैशावरून मामाने आपल्या दोन भाच्यांचा खून केला. सहा दिवसांपूर्वी मुलाने आई वडीलांचा केलेला खून जानेवारीत उघडकीस आला.

## सरपंच देशमुख खून प्रकरण
# आरोपींना बीडबाहेर हलवा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

भाजप आमदार सुरेश धस यांनी मस्साजोग हत्याकांडातील आरोपींना बीड बाहेरील एका तुरुंगात हलवण्याची मागणी केली आहे. बीड जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी वर्गात एकाच विशिष्ट प्रवर्गाच्या लोकांचा जास्त भरणा झाल्यामुळे इथे कोणत्याही बाबतीत प्रॉब्लेम होऊ शकतो. मी केवळ आरोपींना हलवण्यास सांगत आहे. भविष्यात हा खटला सुद्धा दुसऱ्या जिल्ह्यात हलवण्याची वेळ येऊ शकते, असे ते म्हणालेत.

सुरेश धस यांनी गुरुवारी मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपींना बीड बाहेरील एखाद्या जिल्ह्यात हलवण्याची मागणी केली. ते म्हणाले, बीडमध्ये हे प्रकरण चालवावे. परंतु हे लोक (आरोपी) बीडच्या लॉकअपमध्ये ठेवू नयेत. ते एकतर संभाजीनगरच्या हर्सुलला हलवावेत किंवा नाशिकच्या तुरुंगात हलवावेत. कारण, या आरोपींना भेटण्यास व सुविधा देण्यास कुणीही येऊ शकते.

बीड जिल्ह्यात बिंदू नामावलीची केव्हाच वास्तुशांती झाली आहे. वाटोळे झाले आहे. बिंदू नामावलीमध्ये एसटीच्या जागेवर ठराविक प्रवर्गाचे लोक आलेत. एससीच्या जागेवरही एका ठराविक प्रवर्गाचे लोक आहेत.

एवढेच नाही तर ओपनच्या जागेवरही आले, मायक्रो ओबीसीच्या जागेवरही आले. एसईबीसीच्या जागेवरही याच प्रवर्गाचे लोक आलेत. अधिकारी व कर्मचारी वर्गात एकाच प्रवर्गाच्या लोकांचा जास्तीचा भरणा झाल्यामुळे बीड जिल्ह्यात कोणत्याही बाबतीत प्रॉब्लेम होऊ शकतो. त्यामुळे सध्या मी केवळ आरोपींना हलवण्याची सूचना करत आहे. भविष्यात ही केससुद्धा दुसऱ्या जिल्ह्यात हलवण्याची पाळी येईल.

**धनंजय मुंडे मंत्री म्हणवून घेण्यास पात्र नाहीत**

वाल्मीक कराडवर ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल झाला. १२ डिसेंबर रोजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यालयात वाल्मीक कराड व पोलिसांची भेट झाल्याचा दावा खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. याविषयी सुरेश धस म्हणाले, मला याविषयी निश्चित काही सांगता येणार नाहीत. कदाचित बजरंग सोनवणे यांचे सोर्सेस जास्त असतील. पण असे झाले असेल तर ते मोठे दुर्दैव आहे.

### वाल्मीकची गाडी अजित पवारांच्या ताफ्यात

अजित पवारांच्या मस्साजोग दौऱ्यात वाल्मीक कराडची गाडी असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. पत्रकारांनी याविषयी सुरेश धस यांना छेडले. त्यावर ते म्हणाले, हे आका मोठ्या आकांसोबत सगळीकडे होते. त्यामुळे अजित पवारांच्या ताफ्यातही तीच गाडी होती. तीच गाडी सरेंडर करण्यासाठी वापरण्यात आली. त्यानंतर तीच गाडी भेटण्यासाठी म्हणून केज पोलिस स्टेशनला गेली होती. हे सर्व संशयास्पद आहे.

# आईवडीलांच्या हत्येमागे भलतेच कारण?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुहेरी हत्याकांडात आणखी एक ट्विस्ट आला आहे. या खूनामागे वेगळेच कारण असल्याचे तपासात पुढे आले आहे . आरोपी मुलगा उत्कर्ष लीलाधर डाखोळे याचे एका वर्गमैत्रिणीसोबत चार वर्षापासून प्रेमसंबंध होते. त्यांना प्रेमविवाह करायचा होता.

उत्कर्षने प्रेयसीला घरी बोलावले आणि आई-वडिलांशी भेट घालून दिली. मात्र, त्यावेळी आईने चक्क नकार दिला होता तर वडिलांनी उत्कर्षला त्याच्या प्रेयसीसमोरच कानाखाली मारली होती. त्यामुळे, उत्कर्षला वडिलांबाबत मनात खदखद होती. आईवडिलांचा खून करण्यामागे हेसुद्धा कारण असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्कर्ष डाखोळे हा स्वच्छंदी मुलगा होता. त्याला दारु आणि ड्रग्सचे व्यसन होते.



इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये जाऊन शिक्षण घेण्याऐवजी तो मित्रांसोबत पार्ट्या करायला जात होता. कॉलेजच्या शुल्काच्या नावावर तो आईकडून नेहमी पैसे उकळत होता.

लीलाधर डाखोळे हे कोराडी वीज केंद्रात टेक्निशियन पदावर नोकरीवर होते तर पत्नी अरुणा डाखोळे या संगीता विद्यालयात शिक्षिका होत्या. त्यांना मुलगा उत्कर्ष (२४) आणि मुलगी सेजल (२१) अशी दोन मुले आहेत. मुलगी सेजल ही बीएएमएस पदवीच्या प्रथम वर्षाला शिक्षण घेत आहे. उत्कर्षचे एका वर्गमैत्रिणीसोबत गेल्या चार वर्षांपासून प्रेमसंबंध होते.

दोघांचे प्रेमसंबंध तरुणी आणि उत्कर्षच्या घरापर्यंत पोहचले होते. त्या तरुणीला तिचे आईवडिल लग्नासाठी घाई करीत होते. प्रेयसीनेही उत्कर्षला प्रेमविवाह करण्याचा तगादा लावला होता. त्यामुळे उत्कर्षने प्रेयसीची आई-वडिलांशी भेट घालून देण्याचे ठरविले. आई व वडिल घरी असल्याचे बघून त्याने प्रेयसीला घरी बोलावले.

प्रेमसंबंध असून लग्न करण्याबाबत चर्चा केली. आईने त्याला प्रेमविवाह करण्यास थेट नकार दिला. तर वडिलांनीही आरडाओरड केली. तसेच प्रेयसीसमोरच त्याच्या कानशिलात लगावली.

त्यामुळे उत्कर्षला अपमानित झाल्यासारखे वाटले. तेव्हापासून त्याच्या मनात आईवडिलांबाबत राग खदखदत होता. याच कारणा त्याने आईचा गळा आवळून तर वडिलांचा चाकूने भोसकून खून केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## मिशन मुंबई महानगर पालिका निवडणूक
# ठाकरे गटाने दंड थोपटले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :

**७ जानेवारीपासून आढावा बैठका**

महायुतीचे सरकार विक्रमी बहुमत मिळून स्थानापन्न झाले आहे. महाविकास आघाडीला लोकसभा निवडणूकीतील यश विधानसभा निवडणूकीत राखता आलेले नाही.

आता महायुतीतील उद्धव ठाकरे गटाने आगामी मुंबई महानगर पालिका निवडणूकीची तयारी जोरदार सुरु केली आहे. आगामी मुंबई महानगर पालिकेतील सत्ता कायम राखण्यासाठी ठाकरे गटाने कंबर कसली आहे. त्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे स्वतः मुंबईतील 36 विधानसभा मतदार संघाचा आढावा घेत आहेत.

मध्यंतरी काही कारणासाठी रद्द झालेल्या बैठकांचा सिलसिला पुन्हा सुरु होत आहे. ठाकरे गटाच्या स्थगित झालेल्या उर्वरित बैठका ७ जानेवारीपासून सुरु होत आहेत.

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेत आहेत.उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली २१ डिसेंबर रोजी मुंबईतील निरीक्षकांची बैठक पार पडली होती.

त्यानंतर उर्वरित बैठकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. उर्वरित बैठका आता ७, ८ आणि ९ जानेवारी रोजी होणार आहेत. महानगर पालिका निवडणकीच्या रणनितीसाठी पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात येणार आहे.

विधानसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर मुंबईत विधानसभा निहाय निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी वार्डनिहाय शाखाप्रमुख ते विभागप्रमुखांशी बातचीत केली होती. त्यानंतर या निरीक्षकांनी आपला अहवाल उद्धव ठाकरे यांच्याकडे २१ तारखेच्या बैठकीत सादर केला होता. आता ठाकरे गट आढावा बैठकांचा धडाका लावणार आहे.

: सिनेरंग :

## मापुस्कर ब्रदर्स घेऊन येत आहेत.. एप्रिल मे ९९

सध्या चित्रपटसृष्टीत एक नवीन चर्चा सुरू आहे. या नवं वर्षात मापुस्कर ब्रदर्स प्रेक्षकांसाठी एक खास भेट घेऊन येणार आहेत. चित्रपटसृष्टीतील अव्वल दर्जाचे दिग्दर्शक व निर्माते राजेश मापुस्कर आणि कास्टिंगच्या दुनियेतलं नावाजलेलं नाव रोहन मापुस्कर हे दोघे एक नवीन प्रकल्प घेऊन येत आहेत.

राजेश मापुस्कर यांना व्हेंटिलेटर, ह्यफरारी की सवारी, आणि अलीकडेच प्रदर्शित झालेला येक नंबर सारख्या हिट चित्रपटांसाठी ओळखलं जातं, तर रोहन मापुस्कर यांनी प्रख्यात दिग्दर्शक राजकुमार हिराणी यांच्यासोबत लगे रहो मुन्नाभाई व ३ इडियट्स या चित्रपटासाठी सहायक दिग्दर्शक म्हणून काम केले आहे. येत्या उन्हाळ्याच्या सुट्टीत मापुस्कर ब्रदर्स एप्रिल मे ९९ हा आगामी चित्रपट घेऊन येत आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने रोहन मापुस्कर दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण करणार आहेत.

आता प्रश्न असा आहे की, चित्रपटाची कथा काय असेल? कलाकार कोण असतील? यांसारख्या



लोकरंजन

अनेक गोष्टी अद्याप गोपनीय असल्या तरी या नवीन वर्षात मापुस्कर ब्रदर्स एकत्र येऊन मोठ्या पडद्यावर धमाका करणार हे नक्की! ■

: टेलीरंग :

'सन मराठी' वाहिनीवरील मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहेत. अश्यातच 'सन मराठी'वर 'जुळली गाठ गं' ही नवी मालिका येत्या १३ जानेवारीपासून सोमवार ते रविवार दररोज रात्री ८:३० वाजता प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

सोशल मीडियावर 'जुळली गाठ गं' मालिकेच्या प्रोमोवर प्रेक्षकांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या नव्या प्रोमोमध्ये अभिनेत्री पायल मेमाणेसह अभिनेता संकेत निकम धैर्य ही मुख्य भूमिकेत झळकणार आहे. प्रोमोमध्ये धैर्य बिझनेस मॅन, आपल्या कामाला अधिक महत्त्व देणारा, सहजासहजी स्त्रियांची मदत न घेणारा दिसत आहे. मालिकेत धैर्य ही भूमिका साकारणारा अभिनेता संकेत निकम म्हणाला की, 'सन मराठी' वाहिनीवर काम करतोय या गोष्टीचा प्रचंड आनंद होत आहे. नातेवाईक, मित्रमंडळी सगळ्यांनी नव्या प्रोमोचं कौतुक केलं. 'जुळली गाठ गं' या मालिकेचा विषय खूप छान आहे.



**खेडेगावातील स्त्रियांचं जीवन बदलणारी मालिका जुळली गाठ गं'**

प्रचंड आक्रमकता, रुबाबदारपणा, लहानपणापासूनच काही विचार मनात बिंबवले गेले आहेत की, स्त्री कायम चूल व मूल सांभाळू शकते. त्यामुळे त्या भूमिकेचा स्वभाव तसा आहे. संकेत म्हणून मला स्त्रियांबद्दल नेहमीच अभिमान वाटतो. स्त्री शेतात नांगर चालवण्यापासून ते विमान उडवण्यापर्यंत पोहचली आहे. स्त्री कोणत्याच क्षेत्रात मागे नाही आहे पण आजही काही भागात स्त्रिया चूल व मूल सांभाळताना दिसतात. खेड्यागावात स्त्री स्वतःच्या पायावर खंबीर उभी राहू शकत नाही अशी विचारसरणी आहे. मालिकेच्या माध्यमातून आम्हाला आधुनिक विचार प्रेक्षकांपर्यंत पोहचवता येत आहेत. त्यामुळे मालिकेच्या माध्यमातून गावातील स्त्रियांचं जीवन बदलेल एवढं नक्की. ■ ■

: नाट्यरंग :

महाराषसाधारणपणे २५ वर्षांपूर्वी आलेल्या 'कुसुम मनोहर लेले' या नाटकानं मराठी रंगभूमीवर प्रचंड वाहवा मिळवली होती. दिग्दर्शन, मांडणी, विषय, कथा आणि अभिनय यामुळे ते नाटक सरस ठरलं होतं. या नाटकाच्या निमित्तानं संजय मोने आणि डॉ. गिरीश ओक यांच्या अभिनयाची जुगलबंदी बघायला मिळाली होती. अशीच जुगलबंदी आता पुन्हा अनुभवता येणार आहे.

निमित्त आहे 'स्थळ आले धावून' या नव्या नाटकाचं. या नाटकातून संजय आणि गिरीश २५ वर्षांनी पुन्हा एकदा रंगभूमीवर एकत्र दिसणार आहेत. संतोष शिदम निर्मित 'स्थळ आले धावून' या नाटकाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होतीच. हेमंत एदलाबादकर लिखित-दिग्दर्शित हे नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. डॉ. गिरीश ओक आणि संजय मोने आतापर्यंत ५ नाटकांमध्ये एकत्र काम केलंय. ते दोघं शेवटचं एकत्र दिसले ते 'कुसुम मनोहर लेले' या गंभीर नाटकात.

आता २५ वर्षांनी त्यांच्या अभिनयाची जुगलबंदी 'स्थळ आले धावून' या विनोदी नाटकात पुन्हा एकदा अनुभवता येणार आहे. अभिनेत्री पौर्णिमा तळवलकरसुद्धा नाटकात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. साठीत असलेल्या दोन गृहस्थांवर हे नाटक बेतलं असून वृद्धापकाळात घडणा?या घटनांची ही कथा आहे. नाटकातील व्यक्तिरेखा वयस्क असल्या तरी संहिता मात्र तरुण मंडळींनासुद्धा आवडेल अशी आहे, असं नाटकाची टीम सांगते. या नाटकाची तालीम सध्या सुरू असून शुभारंभाच्या प्रयोगांची नाट्यरसिक आतुरतेनं वाट बघत आहेत. ■ ■

**साठीतील 'तरुणां'साठी धावून आलंय स्थळ...**




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## मी निष्ठावंत सैनिक, भाजपात प्रवेश नाही...

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :



कोकणातील राजापूरचे उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी हे लवकरच भाजपत प्रवेश करणार अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे.

आज स्वतः राजन साळवी यांनी माध्यमांसमोर येऊन या बद्दल माहिती दिली आहे. ह्मी ठाकरेंचा निष्ठावंत सैनिक ही माझी ओळख आहे. पराभव झाल्याची मोठी खंत, वेदना मला व मतदारसंघातील माज्या जनतेला आहेत, असं राजन साळवी म्हणाले. मी नाराज आहे, भाजपच्या वाटेवर आहे हे मला तुमच्या माध्यमातून समजतय. पण या सर्व अफवा आहेत. मी निष्ठावंत सैनिक आहे. बाळासाहेबांचाच सैनिक राहणार. या बाबत माज्या मनात कुठलीही शंका नाही, पराभवाची खंत आहे. पण मी नाराज नाही. भाजपत प्रवेश करणार या अफवा आहेत, असं साळवी यांनी स्पष्ट केलं.

भाजपकडून ऑफर आहे का? या प्रश्नावर ते म्हणाले की, पिकलेल्या आंब्यावर कोणीतरी दगड मारणारच. तसा प्रयत्न भाजप आणि अन्य कोणाचा असू शकतो. ते भाजप नेत्यांच मत आहे.

शिवसेना शिंदे गटाचे आबिटकर म्हणाले, की राजन साळवी येणार असतील, तर स्वागत आहे. यावर साळवी म्हणाले की, पक्षात येणाऱ्या प्रत्येक माणसाच स्वागत करण्याची भावना असते.

## पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांची पदोन्नतीवर बदली
### जितेंद्र डुडी नवे जिल्हाधिकारी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :

पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांची पदोन्नतीवर बदली झाली आहे. त्यांच्या जागी जितेंद्र डुडी यांची पुण्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जितेंद्र डुडी हे 2016 च्या बॅचचे सनदी अधिकारी (आयएएस) आहेत. ते मूळचे जयपूरचे (राजस्थान) आहेत. त्यांची झारखंडमध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. त्यांनी केंद्र सरकारमध्ये सहाय्यक सचिव म्हणूनही काम केले आहे. 2018 मध्ये त्यांची महाराष्ट्र के-डरमध्ये नियुक्ती करण्यात आली. त्यांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे प्रांताधिकारी म्हणूनही काम केले आहे. त्यांच्या पत्नी पोलिस दलात आयपीएस अधिकारी आहेत.

## अब्दुल सत्तार म्हणतात...
# मी पुन्हा येईन!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :



विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही वर्षांपूर्वी मी पुन्हा येईन, असे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याची चर्चा गेली काही वर्ष राज्यात सुरु होती. फडणवीस विरोधक त्या वक्तव्यावरुन त्यांना घेरत होते. २०२४ मध्ये देवेंद्र फडणवीस पुन्हा आले आणि त्यांनी ह्मी पुन्हा येईन, हे वक्तव्य खरे करुन दाखवले.

आता फडणवीस यांच्यानंतर शिवसेनेतील बड्या नेत्याने मी पुन्हा येईन.. असे वक्तव्य केले. सध्या मंत्रिमंडळात स्थान न मिळालेल्या अब्दुल सत्तार यांनी हे वक्तव्य केले आहे. अडीच वषानंतर आपण पुन्हा मंत्रिमंडळात असणार असल्याचे विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. तसेच जोपर्यंत एकनाथ शिंदे साहेबांचा विश्वास आहे, तोपर्यंत शिवसेनेत असणार आहे, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

अब्दुल सत्तार म्हणाले, तुम्हालाही अडीच वर्ष थांबवावे लागणार आहे. या अडीच वर्षांत कुठे कामावर कमी पडणार नाही. त्याची ग्वाही देतो. त्यानंतर आपण पुन्हा मंत्रिमंडळात असणार आहे. अब्दुल सत्तार यांना मंत्रिपद मिळाले नाही, त्यामुळे ते नाराज आहेत, पक्ष सोडणार आहेत, अशा चर्चा सुरु आहेत. त्यावर बोलताना ते म्हणाले, जो पर्यंत एकनाथ शिंदे यांचा माज्यावर विश्वास आहे. तोपर्यंत मी त्यांच्या सोबत आहे. ज्या दिवशी त्यांचा माज्यावर विश्वास नसेल त्या दिवशी तुम्ही म्हणाल तो निर्णय मी घेईल, असे सांगत त्यांना पक्षाबाहेर पडण्याचे संकेत दिले. परंतु शिंदे साहेबांचा विश्वास असेपर्यंत परिवाराचा सदस्य म्हणून काम करणार आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले, हा कार्यक्रम ज्यांनी ठेवला त्यांचे मी आभार मानतो. मी २६ वर्षांपासून आमदार आहे. ४ वेळा सिल्लोडचा आमदार झालो. परंतु काही लोक सिल्लोडला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे त्यांनी रावसाहेब दानवे यांचे नाव न घेता म्हटले.

## शासन निर्णयात कोणताही बदल नाही
# काही अर्जांची पडताळणी होणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :

लाडकी बहीण योजना



महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी माहिती दिली आहे.

लाडकी बहीण योजनेसंदर्भातील शासन निर्णयात कोणताही बदल केला जाणार नाही, वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ मिळेल, काही अर्जांच्या बाबतीत आम्ही पडताळणीची प्रक्रिया करत असल्याचे मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पडताळणी करून त्यातील महिलांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात होता. लाडक्या बहिणी संदर्भात नियम बदलले जाणार असल्याच्या अफवा पसरवल्या जात होत्या. या सर्व प्रश्नांवर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी भाष्य केले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.

आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जो शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असणाऱ्या महिलांनाच या योजनोचा लाभ घेता येणार आहे.

सध्या सरसकट छाननी होणार नाही. केवळ स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी ज्या अजार्बाबत तक्रार दिली केवळ त्या अर्जांची पडताळणी करणार असल्याचे आदिती तटकरे यांनी सांगितले.

**'हे' लाभार्थी अपात्र**

आपण कुठेही विनातक्रार लाभार्थ्यांची पडताळणी करणार नाहीत. मात्र, उत्पन्नात वाढ झाली असेल, अडीच लाखांच्या पुढे लाभार्थ्यांचे उत्पन्न गेले असेल, तर ती महिला योजनेसाठी पात्र राहणार नाही.

काही महिलांनी ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन अर्ज केले होते. काही महिलांचे लग्नानंतर राज्याबाहेर स्थलांतर झाले आहे.

चारचाकी वाहने ज्यांच्या नावावर असतील आणि तरी देखील ज्यांनी अर्ज केला असेल, त्यांच्या नावांचा शोध घेण्यासाठी परिवहन विभागाकडून माहिती घेतली जाईल. तसेच आधार कार्ड आणि बँकेतील नावात तफावत असल्यास ते अर्जदार योजनेसाठी पात्र असणार नाहीत, असे आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

**अर्थसंकल्पात निर्णय**

कोणत्याही योजनेच्या रकमेत वाढ करायची असल्यास, ती अध्येमध्ये न होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनातच होते. त्यामुळे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या हप्त्याची रक्कम 2100 रुपये करण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात निर्णय घेतला जाईल. असेही महिला आणि बालविकास खात्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

# महासागर नागपूर वृत्तसागर

■ शुक्रवार, दि. ३, जानेवारी २०२५ ■


## हिंगणा पोलीस स्टेशन अंतर्गत दोन अपघातात तिघांचा मृत्यू

# ट्रक व मोटारसायकलच्या धडकेत दोन मित्र ठार, एक गंभीर







■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २ :

तीन मित्र जेवणाचा डबा घेऊन मोटरसायकल ने हिंगण्याकडे येत असताना विरुद्ध बाजूने येणाऱ्या ट्रकने त्यांना जोरदार धडक दिली. यात मोटरसायकल चालकासह त्याचा एक मित्र जागीच ठार झाले. तर मागे बसलेला युवक सुद्धा गँभीर जखमी झाला. हा अपघात बुधवारी (१)रात्री ११ वाजताच्या सुमारास गुंमगाव मार्गावर घडला.

आर्यन हुकूमचंद पालिवाल( वय २३), सुमेध उर्फ सुमित राहुल सिरसाट (वय १७) अशी मृतकांची नावे असून अरमान रवींद्र मडामें (वय १७) हा गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी मेडिकल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे तिघेही मोटरसायकल स्वार महाजनवाडी, वानाडोंगरी हिंगणा रोड नागपूर येथील रहिवासी असून चांगले मित्र आहे. बुधवारी सायंकाळी बाहेरून जेवण आणण्यासाठी आर्यन च्या मोटरसायकल क्र एम एच ४० सी एफ ९९३३ ने गुमगावकडे गेले होते. तेथून परत घराकडे येतांना ग्रीन व्हेलवेट लॉन समोर समृद्धी महामार्गाकडे जाणाऱ्या ट्रक क्र. सी जे ३७ पी ७९१४ ने मोटरसायकल ला समोरून धडक दिली. यात चालक आर्यन व मागे बसलेला सुमेध ह्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ठाणेदार जितेंद्र बोबडे, पोलीस उपनिरीक्षक करणसिंह नागलोथ व घटनास्थळी दाखल झाले. जखमी अरमान ला उपचारासाठी रवाना केल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून ट्रक व ट्रकचालक मोहीत जुनाभाई हिंगोरा (वय २५) रा.जामनगर, गुजरात ह्याला ताब्यात घेतले आहे. वानाडोंगरी नगर परिषद अंतर्गत महाजनवाडी मधील हे तिन्ही मित्र होते. दोघांचा मृत्यू झाला त्यामुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत ३५ वर्षीय कामगार ठार

**हिंगणा :** दुसरा अपघात बुधवारी(१) दुपारी चार वाजताच्या सुमारास रायपूर ते मिहान रोडवर विटाभट्टी परिसरात घडला. गंगाराम उमेन्द्र विश्वकर्मा ( वय ३५) हा विटा भट्टीवर काम करणारा मजूर पायदळ जात असताना अज्ञात वाहनाने त्याला मागून धडक दिली. जखमी ला विटा भट्टीवर असलेल्या कामगारांनी उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात दाखल केले असता रात्री ११:४५ वाजता त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. हिंगणा पोलिसांनी घटनेची नोंद केली असून वाहनाचा शोध सुरू केला आहे.

## ट्रकच्या धडकेत मोटरसायकलस्वार पिग्मी एजंट ठार

**हिंगणा :** मार्गावर राजीवनगर बस स्टॉप समोर टिप्पर व मोटरसायकल अपघातात वर्धेच्या ४५ वर्षीय पिग्मी एजंट चा जागीच मृत्यू झाला. ही घटना आज दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली. अतुल शंकरराव बुरघाटे (वय४१) रा वर्धा , असे मृतकाचे नाव असून तो पिग्मी एजंट होता.



एमआयडीसी परिसरात वसुली करिता तो आला होता. परत मोटरसायकल क्र. एम एच ३२ झेड ५२४८ ने वर्धेकडे जात असताना राजीवनगर बस स्टॉप वरून यु टर्न घेऊन हिंगणा कडे जाणाऱ्या वाळू भरलेला ट्रक क्र.एम एच ४० डी एल ६७६२ ने मोटरसायकल ला धडक दिली. यात मोटरसायकल स्वार अतुल च्या डोक्यावरील हेल्मेट तुटून डोक्याला जोरदार मार लागला व तो खाली कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. थोड्याच वेळात तिथे गर्दी जमली त्यामुळे टिप्पर चालक गाडी तिथेच सोडून पळाला. एमआयडीसी पोलिसांना घटनेची माहिती मिळताच ठाणेदार महेश चौव्हान ,सहा पोलीस निरीक्षक माने व स्टाफ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला. पोलिसांनी टिप्पर ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे.

# मलब्याखाली दबून तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

दुकानाचा सज्जा अंगावर पडल्याने एका तरुणाचा मलब्याखाली दबून झोपेतच मृत्यू झाला. ही दुदैर्वी घटना गुरूवारी सकाळी 6.45 वाजताच्या सुमारास गणेशपेठ पोलिस ठाण्यांतर्गत आग्याराम देवी चौकात घडली. अजय इंगळे (35) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अजय हा मुळचा वर्धाच्या चानकी कोपरा येथील रहिवासी होता. त्याला आई, विवाहित बहीण आणि एक 7 वर्षांची मुलगी आहे. त्याच्या पत्नीचे निधन झाल्यापासून त्याचे जीवन रस्त्यावर आले. त्याने इतर कुटुंबीयांशी सर्व संपर्क तोडले होते. आई व मुलीचा सांभाळ त्याची नरसाळा येथे राहणारी बहीणच करते. मोलमजुरी करून मिळालेल्या पैशांवर अजयच्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था होत होती. आग्याराम देवी चौकातील एका अपार्टमेंटच्या पायथ्याशी तो रात्र काढायचा. नेहमीप्रमाणे बुधवारी रात्रीही अजय अपार्टमेंटच्या पायथ्याशी झोपला होता. दररोज पहाटे 5 वाजता उठून कामासाठी तो बाहेर पडत होता. मात्र आज तो उशिरापर्यंत झोपून होता.

कदाचित त्याचा काळ आला होता, म्हणून आज त्याची झोप उघडली नाही. गाढ झोपेत असताना अचानक दुकानाचा पोर्च अंगावर पडला आणि मलब्याखाली दबून अजयचा झोपेतच मृत्यू झाला. नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. गणेशपेठ पोलिस घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन विभागालाही फोन करून बोलावण्यात आले. अग्निशमन कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जेसीबीच्या मदतीने मलबा हटवून अजयला बाहेर काढले, मात्र त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी पंचनामा करून त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात रवाना केला. घटनास्थळपासून काही अंतरावरच त्याचे नातेवाईक राहतात. परिसरात गर्दी जमली म्हणून ते सुद्धा पाहायला गेले. त्यांनीच मृतक अजय असल्याची ओळख पटविली. पोलिसांनी अजयच्या आईला माहिती दिली. उत्तरीय तपासणीनंतर त्याचा मृतदेह नातेवाईकांना सोपविण्यात येईल. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# नागपूरच्या गँगवॉरमध्ये एकाचा मृत्यू

## कार आडवत केला देशी कट्ट्याने गोळीबार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. बीडची घटना ताजी असतानाच आता नागपूरमध्ये गोळीबार झाला असून यात एकाचा मृत्यू देखील झाला आहे. पवन हिरण्वार असे गोळीबारात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. या घटनेचा आता पोलिस तपास करत आहेत. मृत्यू झालेला तरुण व हल्लेखोर नागपूरमधलेच असल्याची प्राथमिक माहिती आहे.

हा गँगवॉर असल्याचे बोलले जात आहे. या गोळीबारात पवन हिरण्वार या तरुणाचा मृत्यू झाला असून एक गंभीर जखमी झाला आहे. संशयित आरोपी शेपू खान याने आपल्या भावाच्या हत्येचा बदला घेतला असल्याचचा संशय पोलिसांना आहे. बाभुळगाव शिवातून मृतक आपल्या मित्रांसोबत कारने जात असताना चार ते पाच दुचाकीवरून आलेल्या आरोपींनी कार अडवून मृतक व त्याच्या मित्रांना बाहेर काढले. आपला जीव वाचवण्यासाठी मृत पवन व त्याचे मित्रांनी पळ काढला, पण आरोपींनी त्यांच्यावर देशी कट्ट्याने गोळीबार केला. या गोळीबारात पवनला तीन गोळ्या लागल्या व त्याचा जागीच मृत्यू झाला. गोळीबार केल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

दरम्यान, बीडमध्ये देखील बंदुकीचे प्रमाण वाढले असल्याचे काही दिवसांपूर्वीच दिसून आले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीडमधील अनेक तरुणांचे व्हिडिओ व फोटो पोस्ट केले आहेत ज्यात त्यांनी बंदूक बाळगल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच हवेत गोळीबार करत असलेले देखील त्यांनी अनेक व्हिडिओ शेयर केले आहेत. त्यामुळे बीडमध्ये गुन्हेगारी किती फोफावली आहे हे दिसून आले आहे.

संतोष देशमुख प्रकरणात आता वाल्मीक कराडने सरेंडर केले असून त्याची आता सीआयडीकडून चौकशी सुरू आहे. केज न्यायालयाने वाल्मीकला 14 दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आणखी 3 आरोपी फरार आहेत. त्यातील सुदर्शन घुले याला वॉन्टेड गुन्हेगार ठरवण्यात आले आहे.

# राज्यात जलजन्य आजाराचे १४ बळी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

प्रतिबंधात्मक उपाय योजनेनंतरही राज्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान दूषित पाण्यामुळे होणाऱ्या जलजन्य आजाराने दहा जणांचा मृत्यू झाला. माहिती अधिकारातून हा तपशील समोर आला आहे. यातील सर्वाधिक मृत्यू अतिसारामुळे झाले.

शासनाकडून कोट्यवधींचा निधी खर्च करून जलजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाय राबवले जातात. त्यानंतरही या आजाराने मृत्यू होत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, राज्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ दरम्यान कॉलराचे २१५ रुग्ण आढळले. त्यापैकी ३ रुग्णांचा मृत्यू झाला. अतिसाराची ३ लाख ८ हजार ३८९ जणांना लागण झाली. त्यापैकी ६ रुग्णांचा मृत्यू झाला. गॅस्ट्रोची २४ हजार ७८९ रुग्णांना लागण होऊन त्यापैकी ४ रुग्णांचा मृत्यू झाला.

विषमज्वराचे ३९ हजार ७७ रुग्ण आढळले. परंतु एकही मृत्यू नाही. कावीळची २ हजार ८०५ जणांना लागण होऊन त्यापैकी एकाचा मृत्यू झाला. राज्यात जलजन्य आजार संवर्गातील एकूण ३ लाख ७५ हजार २७५ रुग्णांची नोंद झाली.

उपचारादरम्यान १४ रुग्णांचा मृत्यू झाला. १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान मागच्या वर्षी राज्यात ३ लाख ९४ हजार ७२३ जणांना जलजन्य आजार झाले. तरी एकाच मृत्यूची नोंद झाली. २०२२ मध्ये ३ लाख ९६ हजार ५९७ रुग्णापैकी २५ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे सामाजिक कार्यकर्ते अभय कोलाकर यांनी माहितीच्या अधिकारातून पुढे आणले आहे.

### मृतांमध्ये चार लहान मुले

जलजन्य आजाराने दगावणाऱ्यांमध्ये धाराशिव येथील ३ वर्षीय मुलगा, रायगडमधील १२ वर्षीय मुलगी, जळगावमधील १० वर्षीय मुलगा, जळगावमधील १२ वर्षीय मुलीचाही समावेश आहे. बुलढाणातील १७ वर्षीय मुलगी, अमरावतीतील २५ ते ३० वयोगटातील तीन रुग्ण, साताऱ्यातील ७० वर्षीय वृद्धासह इतरही काही रुग्णांचा जलजन्य आजाराने मृत्यू झाला.

## दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

भरधाव असलेल्या दुचाकी वाहनाच्या चालकाने पायदळ जात असलेल्या एका वृद्धाला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी वृद्धाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताची ही घटना कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत घडली होती. विनायक संतोष इंगोले (59) रा. कुणबीपुरा, जुनी शुक्रवारी असे मृताचे नाव आहे.

गत 19 डिसेंबरच्या सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास विनायक हे परिसरातील दुर्गा ट्रॅव्हल्सच्या कार्यालयासमोरून पायदळ जात होते. या दरम्यान दुचाकी क्र. एमएच-49/बीवाय-5515 च्या चालकाने आपले वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून विनायक यांना जबर धडक दिली आणि पडून गेला. यात गंभीर जखमी झालेल्या विनायक यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये भरती करण्यात आले. उपचारादरम्यान बुधवारी सायंकाळी विनायक यांना मृत्यू झाला. विनायक यांची मुलगी स्वीटीच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी आरोपी वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून घटनेचा तपास सुरू केला आहे.

# मुक्त विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या शुल्कात ७५ टक्के वाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने २०२३ शैक्षणिक वर्षापासून विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कात प्रचंड वाढ केली होती. जवळपास ३५ ते ७५ टक्के असलेल्या शुल्कवाढीचा फटका गरीब विद्यार्थ्यांना बसला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बी.ए.-१ व बी.कॉम.-१ चे शैक्षणिक शुल्क रु.१७०२ वरून रु.२९८८ करण्यात आले आहे.




बी.एस.सी.च्या अभ्यासक्रमात ५५ टक्के, डी.सी.एम.च्या अभ्यासक्रमात ३५ टक्के, एम.ए. अभ्यासक्रमांत ३६ टक्के अशी जवळपास सर्वांचे अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. विद्यापीठातील एकूण विद्यार्थ्यांपैकी ५० टक्क्याहून जास्त विद्यार्थी हे बी.ए. व बी.कॉम. अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतात. त्यामुळे याच अभ्यासक्रमांमध्ये मुक्त विद्यापीठाने नेमकी ७५ टक्के शैक्षणिक शुल्का मध्ये वाढ केल्याने, समाजातील गरीब विद्यार्थी, जे पारंपरिक विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ शकत नाही,ते मुक्त विद्यापीठामध्ये पण पैशाअभावी प्रवेश घेऊ शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

मात्र आता मुक्त विद्यापीठाचा नवा प्रकार समोर आला आहे. एकीकडे विद्यापीठ विद्यार्थ्यांचे शुल्क वाढवते तर दुसरीकडे गझल कार्यक्रम घेऊन या अवास्तव खर्च करत असल्याची बाब समोर आली आहे. मराठी शायरीचे नामवंत शायर स्व. भाऊसाहेब पाटणकर यांचे स्मरणार्थ व नववर्षाच्या स्वागतानिमित्त बुधवार १ जानेवारी रोजी मुकुंद दीक्षित यांचा गझल सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम शैक्षणिक इमारतीतील सभागृहात झाला. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्रकुलगुरू, डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित होते. त्यामुळे विद्यापीठ एकीकडे शुल्क वाढत असताना दुसरीकडे असे मनोरंजनाचे कार्यक्रम घेणे योग्य आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

### कार्यक्रमावर उधळपट्टी का?

भरीस भर म्हणून २०२३ च्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढलेले प्रवेश शुल्क एकाच वेळी भरण्याचे निर्देश विद्यापीठाने दिले होते. यापूर्वी दोन टप्प्यात प्रवेश शुल्क भरण्याची मुभा विद्यार्थ्यांना होती.

# विदर्भात सर्वाधिक कमी तापमानाची नोंद

**नागपूर :** राज्यातील हवामानात मोठ्या प्रमाणात चढउतार होत आहेत. आधी कडाक्याची थंडी, त्यानंतर पाऊस आणि आता पुन्हा एकदा थंडी परतली आहे. विदर्भात सर्वाधिक कमी तापमानाची नोंद नागपूर येथे करण्यात आली. किमान तापमानात तब्बल साडेपाच अंशाची घसरण झाली असून आज ८.८ अंश सेल्सिअस इतके कमी तापमान नोंदवण्यात आले.

गेल्या वर्षात राज्यातील वातावरणात सातत्याने बदल घडून आले. आता नवीन वर्षातही वातावरणात बदल दिसून येत आहे. डिसेंबर अखेरीस राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र, आता नवीन वर्षाच्या सुरुवातीला पुन्हा एकदा थंडीने जोर पकडला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यात पारा घसरलाय. त्यामुळे त्याठिकाणी गुलाबी जाणवत आहे. तर विदर्भात मात्र अवघ्या २४ तासात वातावरणात बदल झाला आहे. अवघ्या २४ तासात किमान तापमान साडेपाच अंशाने कमी झाले असून ८.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील किमान तापमानाचा पारा घसरला आहे. मराठवाड्यातील प्रमुख शहर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन जानेवारीला निरभ्र आकाश असून तेथील किमान तापमान बारा अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील किमान तापमानात इतर शहरांच्या तुलनेत जास्त घट झालेली दिसून येत आहे. विदर्भातील नागपूर शहरात दोन जानेवारीला निरभ्र आकाश असणार आहे.



**नागपूर :** देशाच्या सर्वच भागात थंडीची लाट आली असुन मध्य भारतातही कडाक्याची थंडी जाणवु लागली आहे. नागपूर आणि परिसरात दुपार पर्यत थंडीचा प्रकोप जाणवतो. शिवाय सकाळी धुक्याची चादर पसरली दिसते. गुरुवारी सकाळी उपराजधानी अशीच धुक्यात हरवली होती.

# नाट्य रंगभूमीवरील खणखणीत नाणं नरेश गडेकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

उत्तम नट म्हणून या नाटकातून त्यांनी आपल्या अभिनयाची कारकीर्द सुरू केली. पण स्वतःची छाप पाडण्याचा स्वभाव असल्यामुळे नाटकाचे पात्र, त्यातील प्रसंग, नेपथ्य यामध्ये वेगळे काय करता येईल या ओढीने ते लागलीच दिग्दर्शनाकडे वळले. यातूनच पहिले दिग्दर्शित केलेले भाकवान नाटक कामगार नाट्य महोत्सवात अ गटात पहिले आले तर याच स्पर्धेत ब गटात त्यांचा अभिनय असलेले वासूची सासू हे नाटक पहिले आले.

येथून लेखन दिग्दर्शन व अभिनय क्षेत्रामध्ये ते आपला हुकमी एक्का वठवु लागले. पण स्पर्धेतील नाटक करणं म्हणजे खिशाला कात्री आणि निव्वळ तारीफ आणि फार फार तर उत्कृष्ट नट म्हणून पुरस्कार. आर्थिक स्थैर्य पाहिजे असेल तर पैसा मिळविला पाहिजे या दृष्टीने ते मुंबईला आले व सारंगा, असं झालंच कसं, सुबह जरूर आयेगी अशी नाटके व हिंदी सिरीयल केले. मुंबईतील माया नगरी त्यांना सामावून घेत असताना एका क्षणी त्यांना वाटले की या चंदेरी दुनियेत आपण रमून जाऊ पण आपल्या म्हाताऱ्या आई-वडिलांचे काय? हा प्रश्न त्यांना मुंबईत फार काळ टिकवू शकला नाही व ते नागपूरला परत आले. त्या काळात नागपुरातील नाट्यसृष्टीला सुगीचे दिवस नव्हते तेव्हा त्यांनी आर्थिक पाठबळ मिळविण्यासाठी व्यवसाय करण्याचे ठरविले असतानाच त्यांना झाडीपट्टी रंगभूमीतून विचारणा करण्यात आली.

तेव्हा त्यांनी ठामपणे मोबदल्याची रक्कम कळविली व पहिल्याच नाटकाला चांगला मोबदला मिळाला. हळूहळू त्यांचे अभिनयात नाव होऊ लागले व पैसाही चांगला मिळू लागला. त्यांनी स्वतःचा व्यवसाय करण्याचे मनात घेतल्याने त्यांची अभिनय संपन्न व गुणी अशी मैत्रीण असलेल्या आसावरी तिडके यांच्याकडे व्यवसायाविषयी व झाडीपट्टी रंगभूमीकडे वळण्याविषयी विचारले असता आपल्यातील कलेला वाव कसा मिळेल याच्या शोधात असलेल्या आसावरी यांनी दोन्ही गोष्टींना लगेच होकार दिला. भारत नाट्य रंगभूमी या संस्थेद्वारे ते दोघेही झाडीपट्टी रंगभूमीचा रंगमंच आपल्या नावाने खणखणू लागले. यासोबतच क्रिएटिव ड्रामा सर्विस आणि संस्कार मल्टी सर्विसेस बॅनरची निर्मिती केली. क्रिएटिव ड्रामा सर्विस मार्फत नाटकांसाठी लागणारे ड्रेस, नाटकांचे नेपथ्य, गॅदरिंगचे ड्रेसेस, लग्नाचे फेटे बांधून देणे या व्यवसायात दोघेही गुंतले. संस्कार मल्टी सर्विस अंतर्गत तुझे काजळाचे डोळे ही आसावरी तिडके निर्मित कॅसेट प्रचंड गाजली. अशाप्रकारे दिवसभर दुकान व रात्री नाटक अशी त्यांच्या आयुष्याची नाव किनाऱ्याला लागली होती. एक दिवस त्यांनी निर्णय घेतला व व्यवसाय व कला क्षेत्रातील हे जोडीदार 2004 ला आयुष्यभराची जोडीदार बनले.

या आपल्या रंगभूमीवरील प्रवासात त्यांनी अनेक हौशी नाटके, एकांकिका, संगीत व व्यवसायिक नाटके यासोबतच त्यांनी दूरदर्शन वरील मालिका आणि अभियान, झाडीवूड यासारख्या चित्रपटांतही आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला. 2500 च्यावर प्रयोगातून भूमिका, 25 ते 30 नाटकांचे दिग्दर्शन, सोबतच नाटकांचे लेखन, नेपथ्य, लाईट अरेंजमेंट अशा रंगभूमीवरील सर्व अंगांमध्ये मुशाफिरी केली. संगीत मत्स्यगंधा मधील भीष्म, क्रांतीबा क्रांतीमा या नाटकातील ज्योतिबा फुले व लाटांनी झुगारलाय किनारा या नाटकातील त्यांनी केलेला अभिनय त्यांच्यासाठी विशेष आहे. ते इथेच थांबले नाही तर त्यांचे दिग्दर्शन असलेल्या गजानन माझा शेगावीचा राजा तसेच 300 कलावंतांचा सहभाग असलेले शिर्डी के साईबाबा याद्वारे ते महानाट्याकडे वळले. या दोन्ही महानाट्यांच्या अभूतपूर्व यशानंतर ते आसावरी तिडके निर्मित भगवान महावीर या नाट्यात अभिनयासोबतच त्याचे लेखन व दिग्दर्शन करीत आहेत.

अशा या अष्टपैलू व सर्वव्यापी कलाकाराच्या हुकमी नाण्याचा आवाज अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या अध्यक्ष पदापर्यंत व त्यानंतरच्या निवडणुकीत उपाध्यक्ष पदापर्यंत खणाणला. या अखिल भारतीय नाट्य परिषदेद्वारे महाराष्ट्रातील नाट्य चळवळ कशी फोफावेल एवढेच नाही तर व्यवसायिक नाटकांना येणाऱ्या अडचणी, कलाकारांना त्यांचे मानधन, सेवानिवृत्ती पेन्शन या समस्या सरकार समोर मांडणे व त्या सोडविणे या दृष्टीनेही ते धडपडू लागले.

इथपर्यंतच्या प्रवासात आपल्या कलागुणांचा अविष्कार करीत असताना प्रत्येक टप्प्यात ते विविध पुरस्कारांनी अलंकृत झाले. त्यांना मिळालेल्या विविध पुरस्कारांमध्ये ते उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी धुंद, दोन ध्रुव, भाक वान, नाटकास कारण की या नाटकांसाठी मिळालेल्या राज्य नाट्य महोत्सव पारितोषिकाची तसेच पाचोळा जळत नाहीये, मुंबईची माणसं, डाग, पाषाणकर तुमचं काय चाललंय, चक्रमुक्ता, रात्र, चार प्रश्न एक उदगार या नाटकांतील अभिनयासाठी मिळालेल्या पारितोषिकांची विशेषत्वाने आठवण करतात. यावेळी नाट्य क्षेत्रात येणाऱ्या नवागतांना ते मार्गदर्शन करतात की झाडीपट्टी रंगभूमी ही पूर्णतः व्यावसायिक असल्याने तुम्ही येथे तुमच्या कौशल्यावर स्थिरस्थावर होऊ शकता त्यासाठी तुम्हाला सर्वात आधी तुमच्यातील उणीवांवर काम करावे लागेल.

सोबतच अंगभूत गुणांना मेहनत व अभ्यासाची जोड दिली तर तुम्हाला कोणीच मागे खेचू शकणार नाही असा मुलाचा ते सल्ला देतात. म्हणूनच नाट्य रंगभूमीवरील अष्टपैलू, सर्वसमावेशक, सर्वव्यापी असं खणखणीत नाणं म्हणजे नरेश गडेकर होय असं म्हणणं वावगं ठरणार नाही.

# भीमा कोरेगाव शौर्यदिनी पाचशे शुरवीरांना अभिवादन करुन श्रद्धांजली अर्पण

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २ :



भीमा कोरेगाव विषमतेच्या विरुद्ध समता व समानता करिता पाचशे महार योद्धा वीरांनी २८ हजार पेशवाई सैनिकांना पराजित केले होते. त्या शौर्य दिवसाच्या स्मरणार्थ कन्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे महार बटालियन आणि समता सैनिक दलच्या वतीने पाचशे शुरवीरांना विनम्र अभिवादन करून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

बुधवारला डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक कन्हान येथे सी एस लामा भन्ते यांचे हस्ते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचे मुख्य संचालन महार सैनिक जय पाटील यांच्या नेतृत्वात कन्हान, कामठी, नागपुरचे माजी महार सैनिकांनी पाचशे शुर महार विरांना मान वंदना आणि सलामी देऊन विनम्र अभिवादन केले.

महार बटालियनच्या शूर महार सैनिकांनी परेड करून एक एकाने पुष्पचक्र भीमा कोरेगाव शौर्य स्तंभा च्या प्रतिमेस अर्पित करून ५०० भीमा कोरेगाव महार सैनिकांना महार सैनिक जयवंत गडपायले, जय पाटील, विलास मेश्राम, सम्राट पगारे, पंजाबराव पाटील, पद्मचंद पंचभाई, उत्तम मेश्राम, अशोक बन्सोड, विश्व राज हाडगे, मुकेश सोनेकर, राजकुमार पाटील, नागसेन मानकर, दिलीप गेडाम, धनराज चोरपगार, प्रभाकर शिरसाट, धर्मशील सोंनडवले, चंद्रशेखर चहांदे, संजय सोनोने, संतोष शिरसाट, मोहन गावंडे, शिवपाल वाघमारे, रोशन मेश्राम, रमाकांत पानतावणे आदीनी पुष्प चक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली.

या प्रसंगी कन्हान पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील व समता सैनिक दलाच्या सिंधुताई वाघमारे, सुशील कळमकर, तुळ जाबाई रामटेके, प्रमिला घोडेस्वार, अनिता दुपारे, कल्पना फुलझले आदीनी सुध्दा पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

महार बटालियन सैनिक आणि समता सैनिक दल द्वारे भीमा कोरेगाव शौर्य दिवसाच्या स्मरणार्थ क्रांती ची मशाल प्रज्वलित करून अखंड १२ तास ठेऊन ५०० शुरवीर भीमा कोरेगाव महार पराक्रमी सैनिकांना अभिवादन करण्यात आले.

मशाल कार्यक्रमाचे आयोजन रॉबिन निकोसे व राजेंद्र फुलझले यांनी केले होते. या मानवंदना अंततः दोन मिनिट मौनधारण करून शोककुल बीगुल वाजवुन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महार सैनिक विलास मेश्राम द्वारे वर्ड ऑफ कमांड देऊन शूरवीर ५०० भीमा कोरेगाव महार सैनिकांना महार गान व सलामी देत श्रद्धांजली अर्पित केली.

यावेळी के.एस लामा भंतेजी द्वारे आयोजित सत्कार समारंभात महार बटा लियन चे महार सैनिक व समता सैनिक दल आणि उपासक, उपासिका तसेच सामाजिक कार्यकर्ता ला स्मृतीचिन्ह देत सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास उपासक भगवान नितनवरे, विनायक वाघधरे, दौलत ढोके, मनोज गोंडाणे, राजेश फुलझले, चेतन मेश्राम, आदित्य टेंभुर्णे, रोहित मानवटकर, नरेश चिमणकर, रतनदीप, पंकज रामटेके, अभिजीत चांदुरकर, नितेश मेश्राम, विवेक पाटील आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

**सर्वधर्म समभाव संघटनद्वारे पाचशे शुरवीरांना श्रद्धांजली**

सर्वधर्म समभाव संघटन कन्हान द्वारे भीमा कोरेगाव शौर्य दिवस निमित्य कार्यक्रमाचे आयोजन गांधी चौक येथे करण्यात आले. कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित संस्थेचे अध्यक्ष चंदन मेश्राम, नगरसेविका रेखा टोहणे , समजिक कार्यकर्ता प्रशांत मसार यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भीमा कोरेगाव शौर्य स्तंभा च्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात केली. राजन विनायवार पांडेजी, सदरे आलम, नगरसेवक राजेश यादव यांनी भीमा कोरेगाव शौर्य दिवसा वर उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दोन मिनटाचे मौन धारण करुन ५०० शुरवीरांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी उमेश यादव, दिपक तिवाडे, नितिन मेश्राम, अक्षय फुले, अविनाश हातागडे, कुंदन रामगुंडे सह आदि नागरिक उपस्थित होते.

## पार्टीसाठी पैसे न मिळाल्याने आत्महत्या

**नागपूर :** पार्टी करून नववर्ष साजरे करण्यासाठी आईने पैसे देण्यास नकार दिल्यावरून एका तरुणाने गळफास लावत आत्महत्या केली. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत सुरेंद्रगढ परिसरात घडली. पप्पू उर्फ संजय ठाकूर (32) असे मृताचे नाव आहे. पप्पू आई व लहान भावासोबत सुरेंद्रगढ परिसरात रहात होता. त्याचे लग्न झाले नव्हते. तो कोणता कामधंदाही करीत नव्हता. त्याला दारूचे व्यसनही होते. नववर्षाच्या पूर्वसंध्येला त्याने मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी आईकडे पैशांची मागणी केली. मात्र आईने पैसे देण्यास त्याला नकार दिला. सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास पप्पू घरी एकटाच होता. या दरम्यान त्याने गळफास लावून आत्महत्या केली. काही वेळाने आई घरी परतली असता ही घटना उघडकीस आली. अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## सुराबर्डी परिसरात वाघाची दहशत



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २ :

सुराबर्डी येथील अपारंपारिक नक्षल विरोधी अभियान प्रशिक्षण केंद्रात कर्मचाऱ्यांना बुधवार १ जानेवारी रोजी रात्री वाघोबाचे दर्शन झाल्यामुळे स्थानीक नागरिकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हि वार्ता गुरुवारी सकाळी सुराबर्डी परिसरात पसरताच या मार्गाने शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये आता दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

वाघोबाचा बंदोबस्त करण्याची मागणी सरपंच कविता आंबडकर, उपसरपंच मुकेश महाकाळकर, ग्रामपंचायत आधिकारी मनिष रावत, ग्रा.पं. सदस्य सुभाष तायडे, विनोद सोनवाने, कल्पना राऊत, दिपाली गुरनूले, सिमा येलेकर, ग्रामपंचायत कर्मचारी शेषराव कोहळे, अमोल आंबटकर आर्दीनी केली आहे.

## रस्त्यालगतची दुकाने पाच दिवसात हटवा

**न.प. प्रशासनाचे दुकानदारांना नोटीस**

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. २ :

कन्हान शहरातील रस्त्यालगतच्या दुकानदारांना नगर परिषद प्रशासनाने नोटिस देऊन पाच दिवसात हटविण्याचे आदेश दिले आहे. नगर परिषद प्रशासन च्या नोटीस मुळे दुकानदारांन मध्ये तीव्र संतापाची लाट उसळल्याने दुकानदारांनी खासदार, राज्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि नगर परिषद प्रशासना ला निवेदन देऊन नोटीस रद्द करुन स्थाई जागा देण्याची मागणी केली आहे.

रस्त्याचा कडेला दोन्ही बाजुला नागरिकांनी अनेक वर्षापासुन दुकाने लावली आहे. दुकानदार दुकानाच्या भरोश्यावर आपला परिवार, मुलांचे शिक्षण आणि इतर कामे करीत आहे. ग्रामपंचायतच्या कार्यकाळात दुकानदारांना स्थाई जागा मिळाली नाही. ग्रामपंचायतचे रुपांतर नगर परिषद मध्ये होऊन दहा वर्ष लोटुन गेली. मात्र नगर परिषद प्रशासन ने दुकानदरांना स्थाई जागा मिळवुन दिलेली नाही. कित्येकदा सामाजिक संघटनांनी आणि दुकानदरांनी स्थाई जागा देण्याची मागणी केली. लोकप्रतिनिधि आणि नगर परिषद प्रशासनाने याची दखल घेतली नाही. त्यामुळे जनतेने निवडुन पाठलेले नगरसेवक आणि नगरसेविका कोणाच्या दबावात प्रतिनिधित्व करतात? हा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक वर्षापासुन हिंदुस्तान लिव्हर कंपनीची जागा खाली पडली होती. त्या जागेवर रोजगार आणावा किंवा शहराच्या सर्वांगीण विकासाकरिता जागा उपयोगात आणावे अशी मागणी नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाकडे वारंवार केली. नगर परिषद प्रशासनाने हिंदुस्तान लिव्हर कंपनी ची जागा ग्रोमर वेंचर्स ला जाऊ दिली. त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकासा वर आता प्रश्न निर्माण झाले आहे.

साप्ताहिक बाजाराला आणि फुटपाथ दुकानदारांना स्थाई जागा नाही, बस स्टैंड नाही, खेळाचे मैदान नाही, मोठे हॉस्पीटल नाही, शुद्ध पाण्याची व्यवस्था नाही आणि जन उपयोगी सुविधा नाही आहे. तरी नगर परिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधि या कडे कानाडोळा करीत हिंदुस्तान लिव्हर कंपनी ची जागा ग्रोमर वेंचर्स ला का विकत घेऊ दिली? नगर परिषद सत्ताधारी पक्षाने, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांचा कडे जाऊन जागा मिळवण्याचे प्रत्यन का नाही केले ? असा प्रश्न नागरिकांच्या मनात सुरु आहे. अनेक वर्षापासुन बंद पडलेले उद्योग धंधे सुरु करण्यात आमदार, खासदार आणि स्थानिक राजकीय नेते अपयशी ठरल्याने शहरात बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. दुकानदार कसे तरी आपल्या परिवाराचे पालन पोषण करीत उपजीविका चालवत असुन प्रशासन राजकीय दबावात काम करुन दुकानदरांना वारंवार नोटीस देऊन त्यांना हटविण्याचे प्रयत्न करीत आहे.

सोमवारला रात्री नगर परिषद प्रशासनाने दुकानदारांचा दुकानावर पाच दिवसात दुकाने हटविण्याचे पत्र चिपकवल्याने दुकानदरांन मध्ये नगर परिषद प्रशासन विरोधात तीव्र रोष निर्माण झाला आहे. अश्या परिस्थिति मध्ये प्रशासनाने दुकाने हटवली तर प्रशासन आणि लोकप्रतिनिधि दुकानदारांचा परिवारांच पालन पोषण करणार काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. दुकानदारांनी खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार व राज्यमंत्री आशिष जयस्वाल, जिलाधिकारी विपिन इटनकर, नगर परिषद मुख्याधिकारी आणि संबंधित विभागाच्या अधिकार्यांना निवेदन देऊन दुकानदारांना दिलेले नोटीस रद्द करुन स्थाई जागा देण्याची मागणी केली आहे.

## जात पडताळणी समित्यांसाठी ४ अध्यक्ष

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

राज्य शासनाने लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या सर्वच मुलींना उच्च शिक्षण मोफत केले आहे. अभियांत्रिकीसह अन्य व्यावसायिक अभ्यास क्रमांसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र (व्हॅलिडीटी) अनिवार्य असते. मात्र, राज्यातील ३६ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांसाठी अवघे ४ अध्यक्ष हे पूर्णवेळ अध्यक्ष असून ३२ समित्यांचा कारभार प्रभारीवर सुरू आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नसल्याची धक्कादायक समोर आली आहे. समाजकल्याण विभागातंर्गत अनुसूचित जातीच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य असते.

त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गठित करण्यात आलेली आहे. समाजकल्याण विभागाअंतर्गत कार्यरत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षांसाठी महसूल विभागाकडून अधिकारी मिळतात. परंतु, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून उपजिल्हाधिकारी व तहसीलदार सेवाज्येष्ठता व पदोन्नतीचा तिढा अद्याप सुटलेला नाही. त्याची नियमावली तथा पदोन्नती, सेवाज्येष्ठतेची टक्केवारी ठरलेली असतानादेखील मागील पाच-सहा वर्षांपासून अनेक पदोन्नती मिळाली नसल्याचे विश्वसनिय सूत्रांनी सांगितले. त्यामुळे समाजकल्याण विभागाने वारंवार मागणी करूनही जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना पूर्णवेळ अध्यक्ष मिळालेले नाहीत.

दरम्यान, व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण मिळणार असून नागपूरसह राज्यातील सर्वच जात पडताळणी समित्यांकडे दररोज पाच- सहा हजारांपर्यंत अर्ज दाखल होत आहेत. पण, समित्यांच्या अध्यक्षांना अतिरिक्त जबाबदारी सांभाळावी लागते. नागपुरातील जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अध्यक्षांची पदोन्नती होउन त्यांना आएएसचा दर्जा मिळाला. त्यामुळे गेल्या चार महिन्यांपासून नागपूर जिल्ह्याला अध्यक्षच नाही. संपूर्ण राज्यात ४ पूर्णवेळ अध्यक्ष आहेत. नागपूरसह पूर्व जात पडताळणी समित्यांना अध्यक्षच नाही.

## आज क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

भारतातील प्रथम महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांची 194 वी जयंती आहे. कही हम भूल न जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत बसपा नेत्यांद्वारे 3 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता कॉटन मार्केट समोरील क्रांतीज्योतींच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात येईल.

बसपाच्या प्रदेश, जिल्हा, शहर, विधानसभा, सेक्टर व बूथ स्तरावरील आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते व हीतचिंतकांनी अभिवादन करण्यासाठी उपस्थित रहावे. असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले.

## स्नेहसंमेलन व्यक्तिमत्व विकासाचे माध्यम : खा. श्यामकुमार बर्वे

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २ :



क्रीडा स्पर्धा मधून विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना, परस्पर सहकार्य, आवड निर्माण होते. तर स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. अंगभूत गुणांचा विकास होतो. त्यामुळे शालेय जीवनात स्नेहसंमेलन ,क्रीडा स्पर्धा हे व्यक्तिमत्व विकासाचे एक उत्तम माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी यात सहभागी होऊन आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना चालना दयावी असे प्रतिपादन खासदार श्यामकुमार बर्वे यांनी केले.

लाव्हा येथील सोनबानगर मधील न्यु स्टार पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेजचे वार्षिक स्नेह संम्मेलन मानकर सभागृहात सोमवार ३० डिसेंबर रोजी पार पडले. त्यावेळी ते उद्घघाटन प्रसंगी बोलत होते. सर्वप्रथम खासदार शामकुमार बर्वे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम रागीट होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून जि.प. शिक्षण सभापती भारती पाटील, सरपंच ज्योत्सना नितनवरे, उपसरपंच रॉबिन शेलारे, काँगेस कमिटीचे जिल्हा महासचिव दुर्योधन ढोणे, मधुकर बर्वे, माजी सरपंच भिमराव लोखंडे, कृषी संचालक महेश चोखांद्रे, संस्था सचिव प्रकाश कोकाटे, काँग्रेस कमेटीचे वाडी शहर अध्यक्ष शैलेश थोराणे, स्वप्नील कोकाटे, योगेश कुमकुमवार, भीसे, निखिल कोकाटे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, सरस्वती पुजन व गणेश वदंना करून झाली. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभूषा करुन लोकनृत्य, देशभक्ती, नशामुक्ती,पर्य सामुहीक नृत्य, संगीत कला सादर केल्या.

संचालन मुख्याध्यापिका संगीता धानोरकर यांनी तर प्रास्ताविक संस्था सचिव प्रकाश कोकाटे यांनी केले. आयोजनासाठी संचालक स्वप्नील कोकाटे, शिक्षिका माधुरी ठाकरे, विद्या पटले, नेहा डोंगरे, मेघा माने, पुनम लुंगे, विनया शुक्ला, प्रणाली क्षिरसागर,जुली लोखंडे, अंजली चट्टे, नेहा वाघमारे, प्राची पाचकवडे, ऐश्वर्या मेश्राम, कर्मचारी वनिता लक्षणे, रेखा मेश्राम आर्दीनी सहकार्य केले.

## स्व.देवकीबाई बंग विद्यालयात आनंद मेळावा

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २ :



येथील स्व देवकीबाई बंग इंग्रजी माध्यम विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नवीन वर्षाचे औचित्य साधून हिंगणा येथील स्व. देवकीबाई बंग इंग्लीश मिडीयम हायस्कूल येथे विद्यार्थ्यांनी आणलेल्या विविध स्वादिष्ट पकवानांचे स्टॉल लावून आनंद मेळावा साजरा करण्यात आला.

संस्थेचे कोषाध्यक्ष महेश बंग यांच्या हस्ते आनंद मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या उपाध्यक्षा अरुणा बंग व शाळेचे मुख्याध्यापक नितीन तुपेकर प्रामुख्याने उपस्थित होते.

या मेळाव्यात स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी विविध फूडचे स्टॉल लावून व्यवसायिक ज्ञान कृतीतून मिळविले. मेळाव्यात विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मेळाव्याच्या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## वाडीत शौर्य दिनानिमित्त भीमसेनेची विजयी रॅली

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २ :

भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी वाडी येथे अभिवादन रॅली काढून विजयोत्सव साजरा करण्यात आला. भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष रोशन सोमकुवर यांच्या पुढाकाराने या रॅलीची सुरवात वाडी अमरावती महामार्ग स्थित डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रांगणातून करण्यात आली.यावेळी मान्यवरांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर,तथागत गौतम बुद्ध,सम्राट अशोक यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले व सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. माजी जि. प. सदस्य दिनेश बन्सोड, रोशन सोमकुवर यांनी मशाल प्रज्वलित करून रॅलीला सुरुवात केली. रॅलीत महापुरुष व घोड्यावर स्वार शूरवीर महार सैनिकांची वेशभूषा धारण केलेले युवक आकर्षणाचे केंद्र ठरले.यावेळी फटाक्याची आतिश बाजी करून विजयोत्सव साजरा करण्यात आला. विजयी रॅलीत माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, सामाजिक कार्यकर्ते नंदू सोमकुवर,अनिल पुंड, ईश्वर उके, भीमराव शेंडे, दिलीप भोरगडे, वसंता मेश्राम आदींनी सहभागी होऊन शुभेच्छा दिल्या. ही अभिवादन रॅली डॉ.आंबेडकर नगरच्या विविध चौकात ढोल ताशाच्या गजरात वाजत-गाजत भ्रमण करीत व बुद्ध विहाराला भेटी देत पुन्हा अमरावती महामागानें डॉ.आंबेडकर पुतळा प्रांगणात पोहचली. रॅलीच्या आयोजनाकरीता सुरज वानखेडे,चंदू सोनपिंपळे, शुद्धोधन सोनवणे, सारीपुत्र वानखेडे, निखिल भरतवाडे, सिद्धार्थ खोब्रागडे,रितेश सोमकुवर, निशांत लोणारे, आनंद वानखडे,सोनू मेश्राम, वासू सरोदे देवचंद नाईक, अमित रंगारी, राकेश रामटेके, अवि राउत, राजेश खोब्रागड़े,अंकुश रामटेके, गुणवंत सोमकुवर, प्रवीण शिंगाडे, देविदास मसराम ,दिपाली मेश्राम,संगीता नंदागवळी, बबीता सोमकुवर, मनीषा राऊत, बेबी वानखेड़े, कमला भरतवाडे,माया कांबळे, शशिकाला थोरात, ममता मडके, सविता घेवंदे, रेखाताई नाईक, पुष्पा लोणारे आदींनी सहकार्य केले.


**महसूल विभाग**
**तहसिलदार, कामठी यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्रमांक :- ०७१०९-२९५००९ Email ID tahsildarkamptee@gmail.com
प्रस्तु-४ ना.तह. कामठी/कावि. ३३४-२०२४ दिनांक ९/१२/२०२४

वाचा - १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ २. जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ ३. भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४. मा. जिल्हा दंडाधिकारी यांचे कडील आदेश क्रमांक अ.का./डी-१/ जन्म मुत्यु आदेश / कावी १५८/२०२३, दि.११.०५.२०२४
५. ५. अर्जदार श्री/ श्रीमती नत्थू गंगाराम बरडे रा. धारगांव (पावनगांव) ता. कामठी, नागपुर यांचा अर्ज दि. १०/१०/२०२४ प्राप्त दि.१५/१०/२०२४

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार, श्री/श्रीमती नत्यु गंगाराम बरडे रा. धारगांव (पावनगांव), ता. कामठी जि. नागपुर यांनी या कार्यालयात त्यांच्या जन्माच्या नोंदणीसाठी महाराष्ट्र जन्म/मुत्यु अधिनियम १९६९ चे कलम ११(२) व (३) अन्वये जन्माची नोंद ग्रामपंचायत धारगांव (पावनगांव), ता, कामठी यांचे दप्तरी घेण्याकरीता आदेशीत करणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहु अर्जदार, श्री/श्रीमती नत्थु गंगाराम बरडे रा. धारगांव (पाबनगांव), ता. कामठी जि. नागपुर यांचा जन्म दिनांक. २५/०५/१९५५ रोजी झालेला असल्याचे अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, कामठी उपरोक्त वाचा क. १. आणि २ नुसार व ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणत्याही हितसंबंधाचे काही आक्षेप/उजर/हरकती असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह नायब तहसिलदार दंडाधिकारी, कामठी यांच्या न्यायलयात स्वताःया कार्यालयत जातीने / वकील मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

| अनु.क्र. | जन्म व्यवतीचे नाव | अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १. | नत्यु गंगाराम बरडे रा. धारगांव (पावनगांव), ता. कामठी जि. नागपुर | स्वतः |

स्वा/-
(आर.एच.बमनोटे)
नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, कामठी

**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर, यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर.
Email: www.tahsildarngpcity@gmail.
Ph No. 0712-2561975
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/प्र.क्र. २५१/कावि -क्यू/२०२४
दि.:१३/१२/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ दिनांक १५.१०.२०२३ ५) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका /डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि १५८/२०२४ दिनांक ११.०५.२०२४ ६) मोहम्मद शाहीद अब्दुल रहीम, वय-२०, रा. मेहबुबपुरा टीपुसुल्तान चौक, नागपूर यांचा अर्ज दिनांक ०३/१०/२०२४

ज्याअर्थी अर्जदार मोहम्मद शाहीद अब्दुल रहीम, वय २०, रा. महबुबपुरा टीपुसुल्तान चौक, नागपूर यांनी वडिलांच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू वडिल नामे अब्दुल रहीम S/o अब्दुल रऊफ याचा जन्म दिनांक ०१/०७/१९७७ रोजी (राहत्या घरी) मेहबुबपुरा टीपुसुल्तान चौक, नागपूर झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २,३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

सुनील साळवे
नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर

**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्यमान श्री भोजराज बडवाईक
नायब तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय

प्र.क्र. / एम आर सी-८१/२०२४
मौजा बोंदरी ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी अशोक बारकु खोब्रागडे राह. बोंदरी ता. रामटेक जि. नागपूर यांनी आजोबा नामे बाज्या फात्या खोब्रागडे यांचा मृत्यु दिनांक १५.०९.१९७० रोजी मौजा बोंदरी ता. रामटेक जि. नागपूर येथे झाला असून मृत्युची नोंद सचिव, ग्रामपंचायत कान्द्री येथे केली नाही. त्याबाबत सचिव, ग्रामपंचायत कान्द्री यांनी दिनांक १०.१०.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे बाज्या फात्या खोब्रागडे यांचा मृत्यु दिनांक १५.०९.१९७० बाबत सचिव, ग्रामपंचायत कान्द्री येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद बाज्या फात्या खोब्रागडे यांचा मृत्यु दिनांक १५.०९.१२७० बाबत सचिव, ग्रामपंचायत कान्द्री येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक ०७/०१/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ३०/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक :-३०/१२/२०२४

(भोजराज बडवाईक)
नायब तहसिलदार, रामटेक

**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्यमान सुनिल साळवे नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर शहर, यांचे कार्यालय, जिल्हा नागपूर.
Email: www.tahsildarngpcity@gmail.
Ph No. 0712-2561975
क.ली/प्रस्तु-२/तह.नाग (शहर)/प्र.क्र. २३५/कावि -९/२०२४
दि.:०८/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ दिनांक १५.१०.२०२३ ५) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका /डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि १५८/२०२४ दिनांक ११.०५.२०२४ ६) इशा सुरेश अंबादे, वय-२६, धंदा-खाजगी, रा.बाबा बुद्ध नगर, वैशाली नगर, नागपुर यांचा अर्ज दिनांक ०३/१०/२०२४

ज्याअर्थी अर्जदार इशा सुरेश अंबादे, वय-२६, धंदा-खाजगी, रा.बाबा बुद्ध नगर, वैशाली नगर, नागपुर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू नामे इशा सुरेश अंबादे यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९९८ रोजी राहात्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २,३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह नायब तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

सुनील साळवे
नायब तहसीलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर

**-: जाहिरनामा :-**

कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९६३/२०२४
दि.:२३/१२/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५ /२०२३ ५) सचिन राजेन्द्रप्रसाद कनोजिया वय ४५ वर्ष यांचा अर्ज दिनांक २७/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार सचिन राजेन्द्रप्रसाद कनोजिया वय ४५ वर्ष रा. वार्ड नं. ५ हॉऊस नं. १३६/१२१, दुर्गा चौक कामठी, नागपूर यांनी त्यांच्या बहिणीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांची बहिण नामे कविता हिरा कनोजिया यांचा जन्म दिनांक १५/०१/१९७९ रोजी नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

**जाहीरनामा**

कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालय, मौदा
Phone No-07115-281128
Mail Id: tahesilofficemoud@gmail.com
क्र. प्रस्तु-३/तह-मौदा/कावि-६६६/२०२४
दिनांक -१८/१२/२०२४

वाचा - १) जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ २) जन्म मत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा - २०२३ (२०२३ चा २०) च्या खंड -१ आणि उपखंड -२ ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दि. ११.०८.२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्र. अका/डि-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी -१/जन्म-मृत्यु आदेश/कावि - १५८/२०२३ दिनांक ११/५/२०२४ अन्वये ६) श्री सागर घनश्याम बादुले रा. वाकेश्वर ता. मौदा जि. नागपूर

ज्याअर्थी, अर्जदार श्री सागर घनश्याम बादुले रा. वाकेश्वर ता. मौदा जि. नागपूर यांनी गिरजा जागो बादुले यांच्या ग्रामपंचायत वाकेश्वर कार्यालयात त्यांचे मृत्युची नोंद नसल्याने मृत्युची नोंद ग्रामपंचायत वाकेश्वर दप्तरी घेण्याकरीता निर्देशित करणे कामी अर्ज सादर केला आहे.

सदरहु गिरजा जागो बादुले यांचा मृत्यु दिनांक १६/०९/१९८१ ला मौजा वाकेश्वर येथे झाला असे अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना मृत्यु प्रमाणपत्र शासकिय तथा खाजगी कामाकरीता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जा मध्ये नमुद केले आहे.

त्या अर्थी , मी कार्यकारी दंडाधिकारी मौदा उपरोक्त वाचा क्र.१ आणि २ नुसार व ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारांनी असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्युबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देण्याकरीता व गृह चौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावीत आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारासह कार्यकारी दंडाधिकारी मौदा यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून २१ दिवसाचे आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्युबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमीत करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी,
मौदा

# शिक्षक व विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतच दडले असते यशस्वी जीवनाचे बीज : डॉ. दिलीप चांडक

## बी. आर. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे नूतन वर्षाभिनंदन

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २ :

आजच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळत आहे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. शाळा ही केवळ शिक्षणाचेच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, आणि विविध स्पर्धा यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सृजनशीलता, आणि संघभावनेचा विकास होतो. शिक्षक, पालक, आणि शाळा प्रशासन यांचा समन्वय या कार्यक्रमाच्या यशामागे महत्त्वाचा आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थी जीवन समृद्ध होते. शिक्षक विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेताना त्यांच्या कल्पकता आणि नाविन्याचा प्रत्यय येतो. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांमधील सुप्त कलागुणांना सुद्धा स्नेहसंमेलनातून वाव मिळालेला आहे, असे विचार बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय काटोलचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक यांनी व्यक्त केले.

बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय काटोल येथे नूतन वर्षाभिनंदन कार्यक्रम गुरुवार 2 जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते.

सीआयडी नागपूरचे अधिकारी निलेश डांगरे, हनुमान व्यायाम शाळा अमरावतीचे प्राध्यापक डॉक्टर संजय तिरतकर, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक भुतडा, सचिव प्रकाश नबीरा, कोषाध्यक्ष डॉ. ओमप्रकाश अग्रवाल, सहसचिव संकेत चांडक, संचालक नरेश घोडे, प्रतीक खोना, गिरीश



लड्डा, चेतन कडू, प्राचार्य विजय राठी, प्राचार्य अरुणा पवार, उपप्राचार्य वंदना काळे,उमराव बेहनिया, निकेश बनसोड होते.

प्राचार्य विजय राठी यांच्या मार्गदर्शनाखाली स्पोर्ट व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रत्येक ॲक्टिव्हिटीमध्ये 100 मुलं आणि मुली चा समावेश होता. डंबेल्स -सागर ढोके,कौस्तुभ पवार यांच्या नेतृत्वात, घुंगरूकाठी -रेखा जोगेकर, पराग करांडे यांचे नेतृत्वात एरोबिक्स- निरुपमा लांडे, लीना सावरकर यांचे नेतृत्वात टिपरी नृत्य- नयना दूधकवडे यांच्या नेतृत्वात, लेझीम- हर्षाली थोटे ,प्रवीण चौधरी, रूपाली तायडे यांचे नेतृत्वात. आदिवासी नृत्य- भास्कर शिरसाट यांचे नेतृत्वात. कराटे- भोजराजन चंदन, मुकेश ठाकरे यांच्या नेतृत्वात. पिरॅमिड- फरीम शेख यांच्या नेतृत्वात. बांबू ड्रिल- नीता धुर्वे, सुवर्णा ठाकरे यांच्या नेतृत्वात. लाठी काठी- संतोष धांडे यांच्या नेतृत्वात. डफली- आत्माराम गायकवाड यांचे नेतृत्वात.

माझं गाव माझा देश, "दहशतवादी हल्ला" शंभर मुलं आणि मुलींची नाटिका राधा चौहान, माधवी खिंची यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आली. ही नाटिका विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. नागपूरचे सी.आय.डी. निलेश डांगरे म्हणाले की, बनारसीदास रुईया हायस्कूल ही विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणारी संस्था असून येथून शिकणारा विद्यार्थी नावलौकिक मिळविण्यास सक्षम असतो. अतिथीचे सत्कार आणि प्रास्ताविक प्राचार्य विजय राठी यांनी केले. अतिथीचा परिचय आणि स्वागत उमराव बेहनिया यांनी केले. कार्यक्रमाची संचालन प्राध्यापक अजय खडसे, भोजराजन चंदन यांनी केले. निकेश बनसोड यांनी आभार व्यक्त केले.

## रेल्वे सप्ताह पुरस्कार सोहळ्यात नागपूर विभाग चमकला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ६९ व्या रेल्वे सप्ताह पुरस्कार सोहळ्यात सात प्रतिष्ठित शिल्ड आणि ट्रॉफी जिंकून आपली ऑपरेशनल उत्कृष्टता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण केंद्राच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमात रेल्वेच्या कामकाजातील विविध पैलूंमध्ये विभागाचे असाधारण योगदान आणि कामगिरीचा गौरव करण्यात आला. महाव्यवस्थापक धरम वीर मीना यांच्या हस्ते, विभागीय रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल, नागपूर विभाग यांच्या नेतृत्वाखाली शिल्ड विजेत्या संघाला पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यांच्यासमवेत निधी अग्रवाल उपस्थित होत्या. विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि विभाग प्रमुख देखील उपस्थित होते, या उत्कृष्ट कामगिरीसाठी नागपूर विभागाला आंतरविभागीय कार्यक्षमता शिल्ड, सर्वोत्कृष्ट उद्यान देखभाल ट्रॉफी, लेखा ट्रॉफी, यांत्रिकी ट्रॉफी आणि स्वच्छता ट्रॉफी यासह अनेक मोठे पुरस्कार मिळाले.

हे पुरस्कार नाविन्यपूर्ण, दर्जेदार सेवा आणि ऑपरेशनल उत्कृष्टतेसाठी विभागाची वचनबद्धता अधोरेखित करतात.वैयक्तिक सन्मान वरिष्ठ डी.एफ.एम. विवेक होके यांना लेखा शिल्ड प्रदान करण्यात आली. वरिष्ठ डी.एम.ई. मोहित मांडलेकर यांना यांत्रिक ढाल देण्यात आली .

डी.ई.ई/टी.आर.एस. एम.ई. एल.पी.एल. राजपत्रित अधिकारी मिस आरुषी रावत यांना त्यांच्या उत्कृष्ट योगदानाबद्दल गौरविण्यात आले. या व्यतिरिक्त, बारा वैयक्तिक कर्मचारी सदस्यांना त्यांच्या अनुकरणीय सेवेसाठी वाखाणले गेले.उ जे विभागाचे कौशल्य जोपासण्यावर आणि उत्कृष्टतेची संस्कृती वाढवण्यावर लक्ष केंद्रित करते.शील्ड घेऊन नागपूर स्थानकावर परतल्यावर विभागीय रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल, यांचे विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि जल्लोषात स्वागत केले.

## विज्ञान प्रतिभा शोध परीक्षेत जनता हायस्कूल खैरगावचे विद्यार्थी यशस्वी



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड , दि. २ :

कौन्सिल ऑफ सायन्स म्युझियम सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली आणि राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान भारती आयोजित शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण एनसीईआरटी नोव्हेंबर २०२४ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थी विज्ञान मंथन डिजिटल सायन्स परीक्षेत जनता हायस्कूल खैरगाव ता. नरखेड जि नागपूर येथील वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी गुणांनूक्रमे शालेय मेरिट सुमाजिया अक्तर सैय्यद, कश्यप मुस्ताका पठाण, प्रीती नरेश बनाईत ,यांच्यासह एकूण २६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकाविला या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अनिल साठोणे, पर्यवेक्षिका सुषमा साठोने, व शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## सितापुर (पवनी) येथे गोवारी शहीद स्मारकाचे भूमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २ :

१४ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आपल्या न्याय व हक्काच्या मागणीकरिता काढलेल्या मोर्च्यावर लाठीचार्ज मध्ये शहीद झालेल्या गोवारी समाज बांधवांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सितापुर(पवनी) ता.रामटेक येथे शहीद स्मारकाचे भूमिपूजन काल दि.०१ /०१/२०२५ ला आदिवासी गोवारी(गोंड गोवारी) फाऊंडेशन, रामटेकचे सितापुर शाखेचे अध्यक्ष राजेंद्र भोंडे यांचा हस्ते पार पडले.

यावेळी गोवारी समाजातील ११४ शहीद बांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भूमिपूजन समारंभाला प्रामुख्याने आदिवासी गोवारी(गोंड गोवारी) फाऊंडेशन, रामटेक चे उपाध्यक्ष मनोहर सोनवाने,सदस्य



रवींद्र कोहळे,बाळू सोनवाने,ग्राम पंचायत सदस्य सैलेश उईके,सतीश वाडीवे, पोलीस पाटील रमेश वलोकर, शाखा उपाध्यक्ष अनिकेत सोनवाने, सचिव मंगेश दुधकवरे, कोषाध्यक्ष आश्विन दुधकवरे,सुनील नेवारे(पीपरीया), संतोष कोहळे (घोटी), मनोज ठाकरे, देवचद दुधकवरे, भावराव भोंडे, शुभम शेंद्रे, विजय दुधकवरे, ईश्वर दुधकवरे, संजय सोनवाने, बाळकृष्ण दुधकवरे, देवचंद भोंडे, उमेश दुधकवरे,गणेश राऊत, अभिषेक सोनवाने, देशराज दुधकवरे, सचिन दुधकवरे, वैशाली शहारे, सीमा नेवारे, मनीष दुधकवरे, कांता दुधकवरे, बनु भोंडे, अनिता ठाकरे, गीता राऊत, प्रतिभा दुधकवरे, लक्ष्मी सोनवाने, पूनम दुधकवरे, सरिता दुधकवरे, सीता भोंडे, मेघा भोंडे,शालू भोंडे, अशोक ठाकरे, बापूराव अंबाडारे यांचा सह गावातील गोवारी समाजातील महिला व पुरुष वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे नवीन व्यवस्थापक दीपककुमार गुप्तांनी पदभार स्वीकारला

**नागपूर :** दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे नवीन व्यवस्थापक दीपककुमार गुप्ता यांनी ३० डिसेंबरला आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या भांडवलावर ते नागपूर विभागातील रेल्वे सेवा अधिक चांगली करतील, अशी अपेक्षा आहे. गुप्ता भारतीय रेल्वेत १९९६ पासून सेवा देत आहेत. त्यांनी रेल्वेत सहायक कार्मिक अधिकाऱ्याच्या रूपात जबलपूरमध्ये सेवेला प्रारंभ केला होता. त्यानंतर त्यांनी रेल्वे भर्ती बोर्ड भोपाळचे सचिव, मुख्य कार्मिक अधिकारी बिलासपूरसह रेल्वेच्या विविध ठिकाणी महत्त्वपूर्ण पदावर कार्य केले.

## मैत्री परिवारचा प्रणय अग्गुवार ठरला "बे एके बे चॅम्पियन"




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

अग्रेसर फाऊंडेशनतर्फे आंतरराष्ट्रीय गणितीय दिवसाच्या निमित्ताने सेवासदन हायस्कुल येथे नुकत्याच पार पडलेल्या "बे एके बे" ही गणीत स्पर्धेत मैत्री परिवार संस्थेचा विद्यार्थी प्रणय अग्गुवार याला "बे एके बे टेबल चॅम्पियन फ्रॉम नागपूर" ह्या शीर्षकाने सन्मानित करण्यात आले.

प्रणय हा टिळक विद्यालय धंतोली येथील मध्यामिक शाळेचा विद्यार्थी आहे. त्याने या स्पर्धेत वर्ग आठ ते दहा गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत नागपुरातील एकूण 30 शाळांचे सुमारे चार हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. बक्षिस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणितज्ञ सुरेश बोरगावकर होते तर केशवनगर हायस्कूलचे मुख्याध्यापक मिलींद भाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. मैत्री परिवार संस्थेचे पदाधिकारी तसेच, टिळक विद्यालय माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सपना कुरळकर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकांनी प्रणयचे कौतुक केले.

## बाबासाहेब आंबेडकर कन्वेंशन सेंटर येथे लोककला महोत्सव संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

बाबासाहेब कन्वेंशन सेंटर येथे लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाहीर अलंकार टेंभुर्णे यांनी महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. लोककलेचे जतन व संवर्धन व्हावे हाच एकमेव दात उद्देश ठेवून लोककला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. लोककला हीच आपली खरी संस्कृती आहे व यातूनच सुसंस्कृत समाज घडवायची आहे. लोककला म्हणजे लोकांनी लोकांकरता लोकांकडून निर्माण केलेली कला म्हणजे लोककला होय. आपल्या संत व महापुरुषांनी सुद्धा ह्याच लोककलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करून अनिष्ट रूढी परंपरा यावर जोरदार हल्ला चढविला आहे व समाजाला एक चांगला व सनमार्ग दाखविला आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमादरम्यान शाहीर टेंभुर्णे गुरुजी सार्वजनिक वाचनालयतर्फे व मॉइल इंडिया लिमिटेड काटोल रोड द्वारा प्रायोजित ढोलकीच्या तालावर व घुंगराच्या बोलावर या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. जय भीम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती रामटेक तर्फे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या महामानवास आपल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून मानवंदना द देण्यात आली. तर दि लॉर्ड अशोका बॅकवर्ड मल्टीपर्पस सोसायटी तर्फे लोककलेचा दरबार भरवला. तसेच चैताली भजन दंडार मंडळ यांनी दंडार सादर केली तर शारदा बहुउद्देशीय महिला मंडळ यांनी लोकनृत्य सादर केले त्याचप्रमाणे करंट झाडीपट्टी कलाकार संस्था यांनीलोककलेचा जलसा यावर कार्यक्रम सादर केले तर शेवटी संत गाडगे बाबा ग्रामस्थ संस्था नरखेड यांनी लोककलेला मुजरा करून कार्यक्रमाची सांगता केली. शेवटी संस्थेचे अध्यक्ष अलंकार टेंभुर्णे यांनी सर्व संस्थांचे व कलाकारांचे आभार व्यक्त केले. जय भीम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती रामटेक शाहीर टेंभुर्णी सार्वजनिक वाचनालय रामटेक अशोका बॅकवर्ड मल्टीपर्पस सोसायटी रामटेक यांनी आयोजनाची मुख्य भूमिका बजावली.

## महात्मा फुले विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २ :




सुराबर्डी येथील महात्मा फुले विद्यालय व तुकारामजी पिसे कनिष्ठ महाविद्यालयात चेतना परिवार संस्था, खडगाव तर्फे विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करुन मोफत औषधे देण्यात आली. आरोग्य तपासणी करीता चेतना परिवार संस्थेतर्फे अजय आदमने, महेश फाटक, डॉ. इंगळे, डॉ. नाईक, पल्लवी फडणवीस, रोहिणी भुसारी, प्रशांत कोल्हटकर आदींनी सहकार्य केले. प्रास्ताविकतेमधुन आरोग्य विषयी माहीती मुख्याध्यापक विजय पिसे यांनी दिली.

## गोधनीनगरात स्वच्छ भारत अभियान

**नागपूर :** मानव कल्याण सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्था नागपूर, नूतनवर्षाच्या प्रारंभी जानेवारीला सकाळी ७ वाजता स्वच्छ भारत अभियान कार्यक्रम गोधनीनगरात आयोजित करण्यात आला. संत गजानन महाराज मंदिर समितीचे पदाधिकारी तसेच कलेक्टर कॉलोनी परिसर, वेंकटेश कॉलोनी, नागमंदिर बस्ती, गोधनी रेल्वे परिसरातील युवावर्गासमेवत महिला व पुरुषांनी श्रमदानात सहभाग नोंदविला.

मानव सामाजिक व सांस्कृतिक बहुउद्देशीय संस्थेद्वारे स्वच्छतेबद्दल नागरिकांनी जागरुक असावयास हवे, असे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या द्वारे सर्वांनाच प्रेरणा या अभियानात प्रेरणा मिळते. कुठल्याही राष्ट्रहिताच्या कार्यात आपल्या घरापासूनच सुरूवात करावयास हवी, असे ही संस्थेतर्फे सांगितल्या गेले. यावेळेस प्रामुख्याने गजानन महाराज मंदिर समितीचे सचिव किशोर राऊत, सात्विक यादव, अनिल चव्हाण, कमलेश सिंह ठाकुर, रोहीत गाले, नगर पंचायतचे स्वच्छादूत तसेच नागरिकांनी सहभाग घेतला.

## शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह भ्रष्टाचारावर नियत्रंण ठेवणार का?

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २ :

दिव्यांग कल्याण विभागातील सचिव सचिंद्र प्रताप सिंह यांची शिक्षण आयुक्त म्हणून नियुक्ती झालेली आहे. शिक्षण आयुक्त म्हणून काम पाहणारे सुनील मांढरे यांची कृषी विभागात आयुक्त म्हणून बदली झाली आहे.

विदर्भ दिव्यांग शाळा-कार्मशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षकांना सातव्या वेतन आयोगातील हप्ते अदा करण्यात झालेला भ्रष्टाचार, दिलेली निवेदने व तीन महिने पासुन प्रलंबित नियमित वेतनाबाबत नागपूर विधिमंडळ अधिवेशन काळात १९ डिसेंबर रोजी सचिंद्र प्रताप सिंग यांची भेट घेतली होती.

त्यावेळी शिक्षक संघाचे पुरावे तपासून तातडीने नागपूर विभागातील समाज कल्याण अधिकारी यांची तात्काळ बैठक बोलावून समज दिली होती.प्रथम नियमित वेतन ही भूमिका घेतली आहे, त्याप्रमाणे कार्यवाही सुरू झाली आहे.

खाजगी शाळा शिक्षक संघाने विधिमंडळ अधिवेशन काळात, शिक्षण विभागातील भ्रष्टाचारावर दिनांक १६ डिसेंबर ला शिक्षण विभाग " तुम्ही कितीही प्रयत्न करा, आम्ही भ्रष्टाचार करणारच " या विषयावर भ्रष्टाचार पुरावे देऊन आंदोलन केले होते.

हे निवेदन मुख्यमंत्री व प्रधान सचिव, विधानपरिषद तालिका सभापती निरंजन डावखरे यांना दिले.सहाय्यक सचिव तुषार महाजन व सहाय्यक संचालक श्रीराम पानझडे यांचे सोबत अनुकंपा नियुक्ती, प्रलंबित अनुकंपा नियुक्ती शालार्थ आयडी, शालार्थ आयडी मध्ये तेच तेच कागद पुन्हा-पुन्हा मागवुन अनुकंपा विधवा शिक्षिका कुटुंब यांना देण्यात येणारा त्रास,उप शिक्षणाधिकारी निकिता ठाकरे,यांचेकडे अधिक्षक वेतन पथक माध्यमिक चंद्रपूर पदांचा कार्यभार असतांना लोकमान्य विद्यालय, वरोरा येथील नियमबाह्य शिक्षकेतर कर्मचारी मान्यता यांचे वेतन अदा करण्यात आले आहे.

शिक्षण उपसंचालक नागपूर यांची चुकीची भुमिका, दिव्यांग उमेदवार पदोन्नती बाबतीत शिक्षण विभाग धारणा पक्की करणे,शिक्षण व आरोग्य विभागाच्या निर्देशनातून कोरोना-२०१९ सर्वेक्षणात मयत पावलेल्या कोरोना योद्धा सानुगृह अनुदान ५० लक्ष रुपये मिळालेले नाही.

नागपुर विभागातील, नागपूर प्राथमिक मयत शिक्षक संजय कृपाल नागपूर, माध्यमिक विभाग नागपूर मयत रामदास काकडे तसेच माध्यमिक विभाग जिल्हा गडचिरोली मयत दीपक सोमनकर, बोमनवार हायस्कूल चामोर्शी जिल्हा गडचिरोली यांच्या वारसांना अनुग्रह अनुदान मिळणे, नागपूर प्राथमिक वेतन पथक कार्यालयातील भ्रष्टाचार प्रकरणावर चर्चा केली परंतु प्रत्यक्षात कार्यवाही नाही.

सचिंद्र प्रताप सिंह यांची शिक्षण आयुक्त नियुक्ती ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शिक्षण विभागातील भ्रष्टाचारावर जबरदस्त दणका होईल काय, सचिंद्र प्रताप सिंह, शिक्षण आयुक्त भ्रष्टाचारावर चर्चेत तयारी दाखवल्यास पुराव्यासह प्रकरणे मांडण्यात येईल, अशी माहिती खाजगी शाळा शिक्षक संघाचे प्रमोद रेवतकर, विजय नंदनवार, तेजराज राजूरकर, पुरुषोत्तम टोंगे, रविंद्र जेनेकर, ज्ञानेश्वर वाघ, जयंत पंचबुद्धे,प्रेमलाल मलेवार, अरूण मोखारे, होमचंद वंजारी, लोकपाल चापले, सिद्धार्थ कांबळे,मोहन परसोडकर, दिलीप निखाडे,रहमत्तुलाह खान,मोरेश्वर मौदेकर,पवन नेटे यांनी पत्रात केले आहे.

## तिडके महाविद्यालयात तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २ :

श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक येथे दिनांक ३१ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ यादरम्यान भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त महाविद्यालय व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे वित्त व नियोजन कृषी, मदत व पुनर्वसन विधी व न्याय तथा कामगार राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांच्या हस्ते पार पडले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाचे सार शब्दांकित केलेल्या उद्देश पत्रिकेच्या प्रतीकात्मक प्रतिमेचे आम्ही भारतीय नागरिक म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आपल्या प्रतेकाच्या श्वासा मध्ये ग्रामोन्नतीचा दिवा पेटविणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गोंदिया शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवणारे स्वर्गीय मनोहरभाई पटेल यांच्या प्रतिमेचं दीपप्रज्वलन व माल्यार्पण करून करण्यात आले. तद्वतच IQAC चे समन्वयक डॉ. श्रीकांत भोवते सरांनी भारतीय संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी संविधानपीठावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे उपस्थित होते. या समवेत माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष संजय खंडेलवाल, उपाध्यक्ष धर्मेश भागलकर, सचिव, संजय बोरकर, सदस्य, रवींद्र नवघरे, टक्कामोरे, महाविद्यालयाचे माजी प्रभारी प्राचार्य मनोज तेलरांधे, महेंद्र लोधी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य आयोजक श्रीकांत भोवते यांनी केले.

या तीन दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेची सुरुवातील रामटेक तालुक्यातील सोळा वषार्खालील मुली व मुलं यांची कबड्डी आणि क्रिकेट स्पर्धा घेण्यात आली यामध्ये जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय बोथिया पालोरा, नंदीवर्धन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय नगरधन, जागृती आश्रम शाळा नगरधन, स्वर्गीय इंदिरा गांधी हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय नगरधन, जनप्रभा कनिष्ठ महाविद्यालय भोजपूर, श्री नरेंद्र कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक, व श्री स्वामी सीताराम महाराज हायस्कूल, भोंडगी, श्री समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ऐरोली, राष्ट्रीय आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय रामटेक, श्री ज्ञानदीप कॉन्व्हेंट व कनिष्ठ महाविद्यालय शितलवाडी, मातोश्री काशी देवी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, मुसेवाडीआदीं तालुक्यातील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. यांचे संयोजक म्हणून शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ.विवेक साहू आणि प्रा.किशोर धांडे यांनी काम पाहिले. उद्घाटकीय महोत्सवाचे आभार प्रा. संतोष जाधव यांनी केले.

# विदर्भ साहित्य संघाचे राज्यस्तरीय व वाड्:मय पुरस्कार जाहीर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या वाडःमय पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. १४ जानेवारीला विदर्भ संघाच्या वर्धापन दिन समारंभात पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल. वि.सा.संघाचा सर्वोत्कृष्ट शाखा पुरस्कार पुसद शाखेला देण्यात येईल.

विदर्भ साहित्य संघाकडे जुन ते जुलै २०२३-२४ या काळात प्रकाशित झालेल्या साहित्य कृतींमधून विदभार्तील प्रसिद्ध लेखकांसह नवोदित लेखकांच्या पुस्तकांना पुरस्कृत करण्यात येत आहे. तसेच पाच राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. अनुवाद पुरस्कार दीपक यांच्या सैय्यद हैदर रक्षा (एका प्रतिभावंत चित्रकाराचा प्रवास), आशा सावदेकर स्मृती साहित्य समीक्षा पुरस्कार श्रीनिवास हेमाडे यांच्या तत्वभान या ग्रंथाला व कविवर्य श्रीधर शनवारे स्मृती पुरस्कार घेतल.

स्टेअरिंग हाती या डॉ.पद्मरेखा धनकर यांच्या कविता संग्रहाला, डॉ. मा. गो. देशमुख स्मृती राज्यस्तरीय संतसाहित्य/ साहित्यशास्त्र लेखन पुरस्कार डॉ. अलका चिडगोपकर यांच्या मध्ययुगीन संत कवयित्रींची काव्यधारा ग्रंथास तसेच स्व. गोपाळराव मुकुंदराव देशपांडे (सोनाटकर) स्मृती संपादन पुरस्कार सुधीर रसाळ आणि वसंत पाटणकर यांच्या वाङ्मयीन युगांतर आणि श्री.पु.भागवत या ग्रंथास, ज्येष्ठ साहित्यिक पु.य.देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार अशोक पवार यांच्या गावखोरीला, आप्पासाहेब खापर्डे स्मृती आत्मकथन पुरस्कार विनया खडपेकर, कुसुमनिल स्मृती समीक्षा पुरस्कार संजय आर्वीकर, शरदचंद्र स्मृती कविता लेखन पुरस्कार सुनिता झाडे, वा.कृ. चोरघाडे कथा लेखन - प्रमोद ना.बोरसरे यांच्या (पाचोळा), रा.खु.देशपांडे स्मृती शास्त्रीय लेखन पुरस्कार अंजली चिपलकट्टी (माणूस असा का वागतो), वा.ना.देशपांडे स्मृती ललित लेखन पुरस्कार डॉ.लिना निकम (अवघा तो शकुन), नाना जोग स्मृती नाट्यलेखन पुरस्कार अरविंद विश्वनाथ (अर्ज मोठा नामी), बा.रा. मोडक स्मृती लेखन पुरस्कार सुरेश वांदिले (१६९५ स्मार्ट रोबो एआय आणि औरंगजेब, प्रिती वडनेरकर (सुटीतल्या गोटी), डॉ. वा.वि.मिराशी स्मृती वैचारिक वाङ्मय पुरस्कार मिलिंद किर्ती (सहमतीची हुकुमशाही), के.ज. पुरोहित पुरस्कृत शांताराम पुरस्कार श्रीकांत बोजेवार (पती की अग्नीपरीक्षा), कविवर्य ग्रेस युगवाणीतील सर्वोत्कृष्ट लेखनासाठीचा पुरस्कार डॉ. प्रमोद मुनघाटे (झाडीपट्टी रंगभूमीः परंपरा आणि परिवर्तन), नवोदित लेखकांमध्ये इंदापवार यांच्या कथासंग्रहाला (नदी वाहते आहे), गजानन शिले (थकीत एकूण गोषवारा), हरिकिशन अग्रवाल स्मृती पुरस्कार पत्रकार राकेश भिलकर, वि.सा.संघाचा शतकोत्तर द्वितीय वर्ष पुरस्कार दिलीप माजगांवकर (वाणी आणि लेखनी), राजन लाखे पुरस्कृत सर्वोत्कृष्ट शाखा पुरस्कार विसासंघाच्या पुसद शाखेला देण्यात येईल. विशेष पुरस्कार डॉ.राधा मंगेशकर (कहें मीरा सूर कबीरा) या साहित्यकृतीला आला आहे.

# अजमेर उर्ससाठी नागपूर विभागातून विशेष गाड्या

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :



813 व्या उर्स-ए-शरीफ उत्सवादरम्यान अतिरिक्त गर्दी हाताळण्यासाठी, रेल्वे प्रशासनाने 2 आणि 3 जानेवारी 2025 रोजी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्यांचे संचालन पुढीलप्रमाणे असेल. ट्रेन क्रमांक ०७११९/०७१२० तिरुपती - मदर जं. - तिरुपती स्पेशल एक्स्प्रेस गाडी क्रमांक ०७११९ तिरुपती - मदर जं. विशेष एक्सप्रेस ही ट्रेन 2 जानेवारी 2025 रोजी तिरुपती स्थानकावरून सकाळी 7:00 वाजता सुटेल आणि 3 जानेवारी 2025 रोजी सकाळी 7:30 वाजता नागपूरला पोहोचेल. 4 जानेवारी 2025 रोजी सकाळी 5:15 वाजता आई जंक्शन येथे होणार आहे. पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१२० मदर जं. - तिरुपती स्पेशल एक्सप्रेस ही ट्रेन 9 जानेवारी 2025 रोजी मातेला पोहोचेल. ती पहाटे ४:०० वाजता स्थानकातून निघून त्याच दिवशी दुपारी १२.५५ वाजता नागपूरला पोहोचेल. 10 जानेवारी 2025 रोजी रात्री 11:00 वाजता तिरुपतीला पोहोचेल. थांबेः रेनिगुंटा, कडप्पा, येरागुंटला, तडीपात्री, गूटी, धोन, कुरनूल टाउन, गडवाल, महबूबनगर, शादनगर, काचीगुडा, मौला-अली गेट केबिन, चेर्लापल्ली, काझीपेठ, पेड्डापल्ली, मंचेरियाल, बल्लारशाह, चंद्रपूर, चंद्रपूर, चंद्रपूर, नागपुर केबिन, भोपाळ, संत हिरडाराम नगर, उज्जैन, फतेहाबाद, रतलाम, मंदसौर, नीमच, चित्तोडगड, भिलवाडा, बिंजाई नगर आणि नसीराबाद. 1 एसी 2-टायर, 8 एसी 3-टायर, 9 स्लीपर, 2 जनरल, 2 गार्ड ब्रेक व्हॅन, एकूण 22 डबे.

ट्रेन क्रमांक ०७१८५/०७१८६ तिरुपती - अजमेर - तिरुपती स्पेशल एक्सप्रेस ट्रेन क्रमांक ०७१८५ तिरुपती - अजमेर स्पेशल एक्सप्रेस ही ट्रेन तिरुपती स्टेशनवरून 3 जानेवारी 2025 रोजी सकाळी 10:25 वाजता सुटेल आणि 4 जानेवारी 2025 रोजी सकाळी 6:05 वाजता नागपूरला पोहोचेल. 5 जानेवारी 2025 रोजी पहाटे 2:00 वाजता अजमेरला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१८६ अजमेर - तिरुपती स्पेशल एक्सप्रेस ही ट्रेन 10 जानेवारी 2025 रोजी अजमेर स्थानकावरून रात्री 11:20 वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री 10:10 वाजता नागपूरला पोहोचेल.

12 जानेवारी 2025 रोजी दुपारी 4:15 वाजता तिरुपतीला पोहोचेल.

थांबेः रेनिगुंटा, गुडूर, नेल्लोर, ओंगोले, चिरळा, बापटला, तेनाली, विजयवाडा, कोंडापल्ली, खम्मम, महबूबनगर, वारंगल, मंचेरियल, सिरपूर कागजनगर, बल्लारशाह, चंद्रपूर, सेवाग्राम, नागपूर, आमला, झुंझारपूर, संदरपूर, नागपुर, बी. उज्जैन, फतेहाबाद, रतलाम, मंदसौर, नीमच, चित्तोडगड, भिलवाडा, बिंजाई नगर आणि नसीराबाद. रचनाः 6 एसी 3-टायर, 2 इकॉनॉमी, 6 स्लीपर, 3 जनरल, 2 गार्ड ब्रेक व्हॅन, एकूण 19 डबे.

# एनआयटी ग्राउंड येथे फुटबॉल टुर्नामेंटचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

श्री फुटबॉल क्लब तर्फे मोहन मते यांच्या वाढदिवसानिमित्त ओमकार नगर एनआयटी फुटबॉल ग्राउंड येथे फुटबॉल टूर्नामेंटचे आयोजन दिनांक 25 ते 29 पर्यंत करण्यात आले होते.

टूर्नामेंट मध्ये व-12 आणि व-15 च्या टीम ने भाग घेतला होता. टूर्नामेंट फायनल मॅच २९/ १२/ २०२४ ला खेळ्ला गेला व- १२ आणि व-१५ दोन्ही वयोगटात किक सॉकर कोराडीने विजय पटकावले आणि टूर्नामेंट मध्ये नागपूर आणि नागपूर बाहेरील एकूण 36 टीमने सहभाग घेतला होता.

या कार्याचे आयोजन योगेश देवीकर, राकेश भांगे, प्रशांत धरणे, देवेश नेवारे, हिमांशु पाल, प्रियांशु पाल, हुमांश देवीकर, यांचे योगदान होते टूनार्मेंटचे मुख्य अतिथी प्रभाग क्रमांक ३४ च्या नगरसेविका मंगला शशांक खेकरे, महावीर मोटे, संतोष फूड, देवीकर साहेब, शंकर धरणे व इतर सहभागी होते.

# महारेरा परीक्षा पुढे ढकलण्याची रियल इस्टेट सल्लागारांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

रिअल इस्टेट सल्लागार वेलफेअर युनियनच्या वतीने महारेराकडे ४ जानेवारी २०२५ रोजी होणारी रिअल इस्टेट एजंट परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती करण्यात आली आहे. युनियनने सांगितले की, परीक्षेच्या तयारीसाठी केवळ ४ दिवसांचा कालावधी देण्यात आला असून, हा वेळ अपुरा आहे.

३१ डिसेंबर २०२४ रोजी महारेराकडून ही परीक्षा जाहीर करण्यात आली, मात्र नववर्षाच्या सुट्ट्यांमुळे आणि कमी कालावधीत परीक्षेची तयारी करणे अनेक सल्लागारांसाठी कठीण झाले आहे. या कालावधीत बरेच सल्लागार कुटुंबीयांसोबत प्रवासात आहेत किंवा पूर्वनियोजित कामांमध्ये व्यस्त आहेत. युनियनने या परिस्थितीत सल्लागारांना होणाऱ्या अडचणींबाबत चिंता व्यक्त केली आहे. परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास सल्लागारांना पुन्हा अर्ज आणि शुल्क भरावे लागेल, ज्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होईल. याशिवाय, परीक्षेसाठी कमी वेळ मिळाल्यामुळे बऱ्याच सल्लागारांना त्यांच्या व्यावसायिक प्रगतीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "परीक्षेची तयारी करण्यासाठी किमान १५ दिवसांचा कालावधी दिला गेला पाहिजे. सल्लागार हे रिअल इस्टेट व्यवसायाचा महत्त्वाचा घटक आहेत. त्यांचा आदर राखून त्यांना परीक्षेसाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. युनियनने महारेराकडे ४ जानेवारी २०२५ रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलून १५ दिवसांनंतर घेण्याची मागणी केली आहे, सल्लागारांना अभ्यासासाठी आणि परीक्षेत सहभागी होण्यासाठी समान संधी मिळेल. महारेराकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी सल्लागारांना अपेक्षा आहे.

# गायत्री महायज्ञात ५ हजार भाविकांचा सहभाग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :



मारुती देवस्थान ट्रस्ट रामदासपेठ आणि अखिल विश्व गायत्री परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रामदासपेठ येथील गायत्री तीर्थस्थळावर आयोजित पाच दिवसीय गायत्री महायज्ञाची पूणार्हुती साकार झाली. यात पाच दिवसीय गायत्री महायज्ञात एकूण 5 हजार, तर पावन प्रज्ञा पुराण कथा श्रवणात 8 हजार भाविकांचा सहभाग असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

बुधवारी सकाळी चार टप्प्यात 1200 भाविकांनी यज्ञात आहुती समर्पित केली. यात सत्यनारायण नुवाल, जीवन अग्रवाल, गिरीश व्यास, सतीश बंग, धनराज टावरी व सतीश रावल यांचा सहभाग होता. यज्ञाच्या पूणार्हुतीनिमित्त यज्ञोपवित, अन्नप्राशन, नामकरण, जन्मदिन आदी संस्कार व यज्ञ दीक्षा सोहळा झाला. त्यानंतर महाआरती आणि महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता झाली. चार दिवसीय पावन प्रज्ञा पुराण कथेचे प्रवचन पं. श्यामबिहारी दुबे यांनी रसाळ वाणीद्वारे केले व त्यास भाविकांचा प्रतिसाद देखील लाभला. कथावाचनाचा समारोप मंगळवारी सायंकाळी 1008 दिव्यांच्या दीपयज्ञाने झाला. त्याचवेळी 30 बाय 20 फुटाची भारतमातेची भव्य रांगोळी साकारण्यात आली त्यावर दिव्यांची कल्पक रचना करून दीपयज्ञ साजरा करण्यात आला. सोहळ्याचा मुख्य भाग गायत्री महायज्ञ पाच दिवसांचा होता.

त्यात एकूण 5 हजार भाविकांचा सहभाग होता. महायज्ञ पूणार्हूतीनिमित्त आयोजित महाप्रसादाचा लाभ 2 हजार भाविकांनी घेतला. गायत्री महायज्ञाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती, वागणूक संस्कार, घरगुती संस्कार, सामाजिक कर्तव्य आदींची माहिती देण्यात आली. समाजात सुसंस्कार रुजावेत यासाठी गायत्री परिवारातर्फे हे आयोजन देशातील विविध शहरांमध्ये करण्यात येते. यावेळी हे शिवधनुष्य मारुती देवस्थान ट्रस्ट रामदासपेठ यांनी यशस्वीरित्या पेलले असल्याचे दिसून आले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक पत्की, विनय दाणी, दीपक हेडा यांच्या नेतृत्वात नरेंद्र आसरकर, आशिष नाईक, बागेश महाजन, श्रीकांत पळशीकर, शोभा आपटे, लता जोशी, मुक्ता दाणी, अश्विनी वाघमारे, विवेक गुप्ता, पांडुरंग सुरंगे, शशी देशकर यांनी परिश्रम घेतले.

# थकबाकीमुळे वीज कनेक्शन तोडलेल्या ग्राहकांसाठी अभय योजनेला मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजना 2024 ला ग्राहकांच्या मागणीनुसार 31 मार्च 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी केले.

राज्यातील महावितरणच्या 31 मार्च 2024 पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी 1 सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी 30 नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर 31 डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन ही योजना 31 मार्च 2025 पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र 31 मार्च 2025 नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील 93,848 वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून 130 कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना 57 कोटी 36 लाख रुपयांचे व्याज व 2 कोटी 12 लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे.

रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे. अभय योजनेत मूळ बिलाच्या 30 टक्के रक्कम भरून उर्वरित 70 टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रँचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

## महानगरपालिकेचे ११ कर्मचारी सेवानिवृत्त

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर दि. २ :

नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत ११ कर्मचारी मनपा सेवेतून मंगळवारी (ता.३१) निवृत्त झाले. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये सहायक आयुक्त सर्वश्री श्याम कापसे, नरेंद्र बावनकर, विधी अधिकारी अजय माटे यांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जनसंपर्क विभागाचे श्री. अमोल तपासे, साप्रविचे प्रमोद शेंडे उपस्थित होते. मनपाच्या कर व कर आकारणी विभागामध्ये कार्यरत राजस्व निरीक्षक गजेंद्र ठाकुर यांच्यासह कर संग्राहक विजय लिल्हारे, सहायक शिक्षक राकेश दुम्पलवार, मंसाराम डहाके, सहायक शिक्षिका चित्रा नगराळे-वाघमारे, हिना चौधरी, राजेश्री हिंगमिरे, चारुलता साजने, स्वच्छता जमादार चंद्रशेखर मानवटकर, मजदूर निलकंठ पिल्ले व रेजा कलाबाई तईकर या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा मनपाच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# वादात सापडलेल्या एमपीएससीच्या परीक्षेची उत्तरतालिक जाहीर

**नागपूरः** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने २५ डिसेंबर रोजी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त व तत्सम, गट-अ व सहाय्यक संचालक, संशोधन अधिकारी, प्रकल्प अधिकारी, गट- अ पदासाठी सरळ सेवेअंतर्गत भरती प्रक्रियेसाठी परीक्षा घेण्यात आली. २५ डिसेंबर रोजी नाताळनिमित्त सार्वजनिक सुट्टी असतानाही परीक्षा घेण्यात येत असल्याने काही उमेदवारांनी नाराजीचा व्यक्त केली होती. परंतु अखेर ही परीक्षा घेण्यात आली असून यांची उत्तरतालिक जाहीर करण्यात आली आहे. जा.क्र.०२३/२०२३ सहायक आयुक्त (समाज कल्याण) व जा.क्र. १३२/२०२३ सहायक संचालक/ संशोधन अधिकारी/प्रकल्प अधिकारी चाळणी परीक्षेची उत्तरतालिका आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. हरकती सादर करण्याकरीता ६ जानेवारी २०२५ पर्यंत वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. एमपीएससीच्या वतीने विविध परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीमुळे रखडलेल्या परीक्षांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. एमपीएससीच्या बहुतांश परीक्षा या रविवारी होतात. समाज कल्याण विभागातील दोन्ही संवर्गासाठी घेण्यात येणारी ही परीक्षा दुपारी अडीच ते साडेतीन या वेळेत मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर या केंद्रांवर घेण्यात आली. त्यामुळे नाताळ सणाच्या दिवशी होणारी परीक्षा आयोगाने दुसऱ्या तारखेला घ्यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

# वाहकांच्या चांगल्या वर्तणुकीमुळे आपली बसची प्रतिमा उंचावेल : आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी




## आपली बस वाहकांच्या प्रशिक्षणाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २ :

आपली बस सेवेमध्ये वाहकांची भूमीका अत्यंत महत्वपूर्ण आहे. वाहकांचा थेट संबंध प्रवाश्यांशी येतो. अशावेळी वाहकांची चांगली वर्तणूक आणि प्रवाश्यांशी सुसंवाद यामुळे वाहतूक सेवा चांगली होऊ शकते. महापालिकेच्या माध्यमातून देण्यात येत असलेल्या प्रशिक्षणामुळे वाहकांच्या कामात बरीच सुधारणा होईल आणि वाहकाच्या चांगल्या कामामुळे आपली बसची प्रतिमा उंचावेल, असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांनी व्यक्त केला.

मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहामध्ये मनपा परिवहन विभागाद्वारे चलो मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून दहा दिवसीय आपली बस सेवा वाहक प्रशिक्षणाचे गुरुवारी (ता.२) मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे, श्रम अधिकारी अरुण पिपरूडे, यांत्रिकी अभियंता योगेश लुंगे, लेखा अधिकारी विनय भारद्वाज, सहायक समीर परमार, ऑपरेशन मॅनेजर राजीव घाटोळे, चलोचे टीम लिडर नीतेश पटेल, ऑपरेशन मॅनेजर मन यादव, सचिन गाडबैल आदी उपस्थित होते.

मनपाच्या आपली बस सेवेमध्ये सुसूत्रता आणणे, प्रवासी संख्या वाढविणे आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अशा विविध उद्दिष्टांच्या अनुषंगाने आपली बस सेवेतील सर्व चालक वाहकांचे टप्पेनिहाय प्रशिक्षण २ ते १५ जानेवारी या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे. सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते सायंकाळी ४ अशा दोन सत्रांमध्ये प्रत्येकी ५० वाहकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी म्हणाले, येत्या काळात महानगरपालिकेच्या आपली बस सेवेमध्ये तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर वाढविण्यावर भर आहे. यापुढे ऑनलाईन तिकीट, यूपीआय पेमेंट पद्धतीचा अवलंब आपली बस सेवेमध्ये करण्यात येणार आहे, असे आयुक्तांनी सांगितले. आपली बस सेवेतील सर्व प्रकारच्या बसेसची माहिती वाहकांना असणे आवश्यक असावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

वाहकाने नियमित गणवेश वापरणे, प्रवासांशी कसे बोलले पाहिजे, विनातिकीट प्रवास होऊ नये अशा विविध बाबींकरिता हे प्रशिक्षण अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांनी सर्व गोष्टी शिकून घ्याव्यात व त्याची अंमलबजावणी आपल्या जीवनात करून घ्यावी, असेही डॉ. अभिजित चौधरी यावेळी म्हणाले. वाहकांकरिता प्रशिक्षण आयोजित केल्याबद्दल त्यांनी परिवहन विभागाचे अभिनंदन केले. या प्रशिक्षणामुळे वाहकांच्या कामात चांगली सुधारणा होईल, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल म्हणाल्या की,आपली बस सेवेतील वाहकांना प्रशिक्षण देणे ही अत्यंत चांगली बाब आहे. परिवहन विभागाचा तोटा कमी करण्याचा मनपाचा मानस आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणे आपल्या कामाला न्याय दिल्यास या समस्यांवरही मात करता येईल, असे त्या म्हणाल्या.

आपली बस चालविताना ज्या समस्या येतात त्या सोडविणे आणि ज्या सुधारणा करणे गरजेचे आहे, त्या बाबतीत सर्व प्रशिक्षण वाहकांना दिले जाणार आहे. प्रशिक्षणामुळे कामात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. लवकरच ऑनलाईन पेमेंटवर भर दिला जाणार असून पुढे होणाऱ्या नव्या बदलासाठी सर्वांनी तयार असावे, असेही आवाहन आंचल गोयल यांनी केले. प्रास्ताविकमध्ये परिवहन व्यवस्थापक विनोद जाधव यांनी प्रशिक्षणाची पार्श्वभूमी विषद केली. त्यांनी सांगितले की, १० दिवसांचे या प्रशिक्षणामध्ये प्रति दोन बॅच नुसार प्रत्येकी ५० वाहकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. यात वाहकांचे कार्य आणि जबाबदारी सांगितले जाईल. शिवाय प्रशिक्षणात आपली बस आगार, बस मार्ग, बस प्रकार व वाहकाचे वर्तन इतर माहिती दिली जाणार आहे. चांगले काम करणाऱ्यांचा सत्कार करण्यात येईल. प्रशिक्षणार्थ्यांमधून चांगले प्रशिक्षक निवडले जातील आणि त्यांना पुढे मास्टर ट्रेनर केले जाईल. शिवाय प्रत्येक वाहकांची प्रोफाईल तयार करण्यात येणार आहे. त्यांची उपस्थिती, कामाची माहिती चांगले काम याची सर्व माहिती या प्रोफाईलमध्ये असणार आहे, असेही विनोद जाधव यांनी सांगितले.

प्रशिक्षणाच्या सुरूवातीला चलोचे ऑपरेशन मॅनेजर मन यादव, डेपो मॅनेजर अभिजीत देवतळे व हेमंत चौधरी यांनी सादरीकरणाद्वारे वाहकांना आवश्यक माहिती दिली.

## २.८७ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर :** भाजीपाला खरेदी करण्यासाठी कुटुंबासह बाजारात जाणे एका व्यक्तीला चांगलेच महागात पडले. अज्ञात आरोपीने घरफोडी करून रोकड व दागिन्यांसह एकूण 2 लाख 87 हजार 900 रुपयांचा माल चोरून नेला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत भांडेवाडी परिसरात घडली. पोलिसांनी गौतम लिखिराम वर्मा (55) रा. जय अंबेनगर, भांडेवाडीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदविला आहे.

बुधवारी पहाटे 4.45 वाजताच्या सुमारास लिखिराम हे कुटुंबासह घराला कुलूप लावून भाजीपाला खरेदी करण्यासाठी कळमना बाजारात गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटात ठेवलेली 1.73 लाखाची रोकड, सोन्याचांदीचे दागिने व घराच्या रजिस्ट्रीचे मुळ कागदपत्र असा एकूण 2,87,900 रुपयांचा माल चोरी करून फरार झाला. 6.30 वाजताच्या सुमारास वर्मा कुटुंब घरी परतले असता घराचे कुलूप तुटलेले दिसले. आतमध्ये जाऊन पाहिले असता सर्व सामान अस्तव्यस्त पडून होते. कपाटाचे दार उघडे होते आणि त्यातील मुद्देमाल गायब होता.